

# माणूस

१८ मे १९६८ । चाळीस पैसे



चौथी सचित्र आवृत्ती

□□

# राजा शिवछत्रपति

□□

ब. मो. पुरंदरे

□□

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□□

राजहंस प्रकाशन
पुणे

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : सातवे : अंक : एकावन्नावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ निर्मला पुरंदरे

स. न. मे ६

आपले 'श्री कैलास ते सिंधुसागर' संचलन व्यवस्थित पार पडले हे वाचून आनंद झाला. केवळ राष्ट्रीय सद्‌भावनेच्या पोटी आपण ही अभिनव यात्रा केलीत याबद्दल अभिनंदन. पक्ष, सरकार, भांडवल यापैकी कशाचाच पाठिंबा नसताना केवळ आत्मविश्वासाने आपण पुढे पाऊल टाकलेत आणि खऱ्याखुऱ्या भारतीयांनी आपल्याला उत्स्फूर्तपणे पाठिंबा दिला. भविष्यकाळातही हा जागृत नवमहाराष्ट्र आपल्याला बाजुला टाकणार नाही अशी आशा वाटते.

वा. दा. आठलेकर, वास्को

स. न. मे, ३

"अलिकडे 'माणूस' पूर्वी प्रमाणे निघत नाही. त्यात वाचण्यासारखे काहीच नसते. 'माणूस' घेतल्यावर अपेक्षापूर्तीऐवजी अपेक्षाभंग व निराशाच पदरी पडते."– वाचकांची स्पष्ट प्रतिक्रीया कळवत आहे.

सु. पु. फडणीस, जळगाव

स. न. मे, ७

'मॉटीज डबल' रंजक वाटली.

अनिल हवालदार, मुंबई

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण,
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.




पाच वर्षांमागची एक रात्र आज अवचित पुन्हा दाटून आली आहे.

पार्ल्याच्या टिळक मंदिराचे सभागृह गानलुब्धांनी कसे तुडुंब भरले आहे. उच्चासनावर एक स्थूल, वयस्क, मर्दानी देह काहीशा अपंगपणे पण तरी एका खुषीत आणि मस्तीत मांडीवरचे स्वरमंडल छेडीत बसला आहे. मागे साथीदार. कोपऱ्यात कुबडया टेकून ठेवलेल्या.

...तंबोरे बोलू लागतात. स्वरमंडल झंकारू लागते. भरदार मिशा कुरवाळीत उच्चासनावरचा तो अजस्त्र अस्ताव्यस्त देह मस्तीतच सभोवतालच्या श्रोत्यांना एक कुर्निसात करून विनम्र हिंदीत काहीशा लुळया शब्दांत म्हणतो, तब्बेत बरी नसल्याकारणाने फार दिवस सेवेला आलो नाही. अद्याप तब्बेत नादुरुस्तच आहे. पण कोशिशपूर्वक आज गाणे रुजू करणार आहे. ही संधी दिलीत याबद्दल मी आपला फार फार ऋणाईत आहे.

आणि सलामीचा 'भीम' संथपणे, स्वर कसून आळवला, भरला, विस्तारला जाऊ लागतो. पतियाळा घराण्याचे महापुरुष बडे गुलामअली दीर्घकालीन व्याधीग्रस्ततेनंतर साक्षात गाऊ लागतात. मागे त्यांचा पुत्र आणि शिष्य मुन्वरअली आपला तयार, लवचिक गळा त्यांच्या



# बैठक

# रातराणी । रातराणी

## विजय तेंडुलकर

टाळ्या जणू म्हणत असतात..... गुलामअली झिंदाबाद......झिंदाबाद, आणि बड्या खुषीने स्वरमंडल कुरवाळीत हा ठुमरीचा बादशहा आपल्या हातखंडा ठुमरीला जागवतो. 'कटेना बिरहाकी रात......सखी जोवन जात.............

दिमतीला देतो. एकसे एक बुलंद अशा दोन कंठांनी रागाचा ठाशीव, उत्स्फूर्त विस्तार होऊ लागतो. सभागारात गर्दीने बसलेले, सभागाराच्या सज्जात जागा सापडेल तेथे उभे राहिलेले उत्सुक श्रोते अनिश्चित मन:स्थितीत कानात प्राण आणून ऐकत असतात. हा भीमकाय वयोवृद्ध गंधर्व पक्षघाताच्या भयानक दैवी आघातानंतर पुन्हा पूर्वीसारखाच गाऊ शकेल ? पूर्वीच्या चपळाईने आणि लालित्याने याचा अजोड गळा आता फिरू शकेल ? मुन्वर तर नव्या दमाचा. त्यात बापाची तालीम. तो तेज गाणारच. पण गुलामअलींचे काय ?

आरंभ जरा बेअंदाजच भासतो. स्वर कंठात फुलताफुलता मध्येच दगाबाज होऊन जडावतो, फिरत सराईत रेखीवपणे होत नाही, शब्द घसरता उमटतो. तरीही किती झाले तरी बडे गुलामअली म्हणजे बडे गुलामअलीच. गळा तापत जातो. आता, आरंभी गुलामअलींच्या काहीशा सैल आणि स्थूल स्वरांना आपल्या गोळीबंद गळ्याचा भराव देणारा मुन्वर हळूहळू मागे जातो आणि खांसाहेबांचे स्वरमंडल आणि कंठमंडल जारीने, जोमाने आणि जवळपास पूर्वीच्याच आत्मविश्वासाने बैठकीच्या केंद्रभागी झंकारू लागते. भीमपलासाची भव्य, चैतन्यमयी इमारत श्रोत्यांसमोर क्रमशः उभी राहते. ही

पूर्वीइतकी चिरेबंदी नाही, ही उणीव.

पुढची द्रुत लयीतली चीज संपते आणि हर्षाच्या नि कृतज्ञतेच्या टाळ्यांचा एकच शिडकावा बैठकीत होतो. आहे, पंगुत्वाच्या वज्राघातातूनही हा मोठा कलावंत, जर्जर शरीराने का होईना, आपल्या कलेनिशी पुष्कळच शाबूत बाहेर आला आहे. टाळ्या जणू म्हणतात, गुलामअली झिंदाबाद गुलामअली झिंदाबाद...

गुलामअली बड्या खुषीने स्वरमंडल कुरवाळीत या हर्षित बैठकीचा आस्वाद घेतात.

आणि पुढच्या बुजुर्ग चहात्यांच्या फर्माइशीवरून, दीर्घ विरहानंतर, हा ठुमरीचा बादशहा आपल्या हातखंडा ठुमरीला जागवतो, 'कटेना बिरहाकी रात'...

ओहोहाहो .. केव्हा तरी विषण्णतेने वाटले होते विरहाची ही तडपनवाली, अवीट, रम्य, धुंद रात्र पुन्हा कधीच कानी येणार नाही. गुलामअलींची लाडकी पंजाबी ठुमरी त्यांच्या गळ्यावाटे पुन्हा बोलणार नाही. त्यांच्या कंठातली ती कोमलांगी, उसासती, उमासती, आवेगांनी अंग अंग फुलून येणारी आणि उरी फुटू पाहणारी, रागाने-अनुरागाने क्षणमात्र तळपून पुढल्याच क्षणी खोल खोल औदासीन्यात जाऊन रुतणारी, गळाभर स्फुंदणारी, अंग अंग रोमांचित होऊन जळणारी बिरहन सर्वकाळ मुकीच राहणार. पण नाही. दैव कठोर असले तरी ते निर्घृण झाले नाही. त्यालाही या अशरीरी सुकुमार बिरहनीचे प्रेम असेल ! पाहा ही पुन्हा सजग झाली या पर्वतप्राय देहातून, गरगरीत गळ्यातून ही अतिकोमल ओली ओली वेदना पूर्वीच्याच जीवघेण्या कारुण्याने स्रवू लागली, लवू लागली, उचंबळू लागली...बिरहाकी रात... कटेना बिरहाकी रात सखी जोबन जात .

अंगावर शहाऱ्यांमागून शहारे येताहेत. स्वरमंडलाबरोबर उभे अस्तित्व अंतर्बाह्य झंकारून उठते आहे. कारुण्याच्या आणि तारुण्याच्या या चिंब करणाऱ्या कोसळत्या वर्षावात समोरचा हडसभडस, मिशाळ, वयोवृद्ध, पांगळा चेहरा जसा काही दिसेनासा झाला आहे. उच्चासनावरचा या वेड्याबगड्या चेहऱ्याखालचा जड, बेडौल, बेढब देह या उन्माद–धारांत विरघळून जातो आहे. कुबड्यांचे मोहरले आम्रवृक्ष बनताहेत आणि त्यांवर कोकिळ कुहूकुहूच्या धुंद, आर्त विराण्या गाताहेत. अरे अरे ! हा इथे साक्षात वसंत फुलला, मोहरला आहे, यौवनाचा उतट बहर ओसंडून चालला आहे, रात्र सरत नाही, प्रियकर जवळ नाही – केवढा दैवदुर्विलास ! केवढा असह्य ताप, केवढा असह्य मुका मार बिरहाकी रात ..कटेना बिरहाकी रात ..जोबन जात

एकाच विरहाच्या केवढ्या तऱ्हा ! सातच स्वरांचे लाख विभ्रम ! चकित करणारे, झुलणारे, खुलवणारे, घायाळ करणारे ..एकेक जागा काळजाचा लचका काढणारी बिरहाकी रात बिरहाकी रात ..

वाहाव्वा, बहोत अच्छा, ओहोहोच्या मुक्त सरी श्रोतृसमुदायातून या विरहाच्या

तडफडीवर एकसारख्या कोसळत आहेत. खांसाहेबांच्या तोडीस तोड मुन्वरचा गळा गहजब करून राहिला आहे. मध्येच धुंद खांसाहेब खुषीने अंग अंग फुलून आपल्या मुलालाच उत्स्फूर्त दाद देते होतात, आप बडेही सुंदर गा रहे हैं ! श्रोते या दिलदार कौतुकालाही दाद देतात. खांसाहेब गाता गाता मध्येच म्हणतात, देखो जनाब, ज्याला ठुमरी गाता येत नाही त्याला गाताच येत नाही. त्याचे गाणे व्यर्थ ! ठुमरी कशीही गा, कितीही गा, लेकिन उसमें ठुमरी' चाहिये, ही अशी...लगेच स्वरातला मिठ्ठास, जीवघेणा दर्द...कटेना विरहाकी...रात...आणि मध्येच रेकून ..अरे कटेना–विरहाकी–रात ! नहीं नहीं, यह ठुमरी होही नहीं सकती...मोठ्ठा, दिलखुलास हशा. आणि पाठोपाठ स्वरमंडलाच्या झंकारत्या स्वरराजींवर घरंदाज, अव्वल ठुमरीचे काही गोजिरवाणे, मुरडते, लाडिक लाडिक रंगीबेरंगी प्रत्यय...

टाळयांच्या प्रचंड जल्लोषात ही रंगलेली अपूर्व ठुमरी कधीतरी संपते.

डोळयांत पाणी उभे असते.

गात्रांत अनिवार वेहोषी भरलेली असते– काळजात बेचैनी.

कुठे आहे ती बैठक, तो श्रोतृसमुदाय, आणि तो गाणारा ?

ओक्यावोक्या दालनात आम्ही तिघे–चौघेच निश्चल, निःस्तब्ध बसलेले असतो. कोपऱ्यात टेप-रेकॉर्डर मुका मुका फिरत असतो.

'सबरंग' वडे गुलाम अली गेले.

आम्ही सारेच या विचारासरशी एकदमच एकमेकांकडे पाहतो--नजरात एकच भाव; छे छे, गुलामअली गेले नाहीत. या नावाचे एक व्याधिजर्जर, वृद्ध, बोजड शरीर निसर्गक्रमाने गेले. गुलामअली नामक चैतन्य आहे, राहील. या दुनियेत संगीत आहे तोवर गुलामअली नामक स्वर आणि ठुमरी चिरकाळ टिकणार हे काय कोणी सांगायला हवे ? ¤

# २

# य क्ष न ग री

उसळत्या कारंजांच्या वाटेने येऊन या तीन पावलांच्याच महालात जपून पाऊल टाका. कारण बाजूलाच शय्या आहे. तिच्यावर झिरझिरीत शुभ्र मच्छरदाणी आहे. मंद निळया प्रकाशात मच्छरदाणीच्या आत या शय्येवर एक राजसबाळी गाढ झोपून एखादा परिकथेतला राजकुमार पाहताना धूसरशी दिसते. ओहोहो ! वाटते आहे की आत्ता कुशी वळेल ! तिचा श्वासोच्छ्वासदेखील ऐकू येतोसे क्षणभर वाटेल–

आणि एकदम लक्ष मच्छरदाणीपलीकडे

जाईल. तिथे अंधारातून एक–दोन–तीन–चार–पाच–सहा आणि सात...सात वेडे-वाकडे गोजिरवाणे चेहरे, श्वास आवरून, डोळ्यात प्राण एकवटून या देवाघरच्या सुंदर कळीला न्याहाळताना, तिच्यावर पहारा देताना दिसतील. ओळखा कोण ते ! हे सात बुटके. आणि मच्छरदाणीत आहे ती त्यांची लाडकी हेमांगिनी.

इथून सध्या मुंबईत क्रॉस मैदानात चालू असलेल्या यक्षनगरीचा आरंभ होतो. मुख्यत: ज्या पोरांसाठी ही मांडली आहे ती इथूनच या नव्या जत्रेवर खूप होत जातात. एखादे पोर तर न राहवून मच्छरदाणीत पटाक्‌दिशी हात खुपसते. गाढ झोपलेले कुणी पाहण्याचे ते वय नसते ना ! त्याला या सुंदर, जरा मोठाड पोरीला जागे करायचे असते; निदान तिचे खरेपण अजमावयाचे असते.

बाजूला बसलेला ‘ अटेंडंट ’ म्हणतो, हां ! पोर घाबरून हात मागे घेते आणि मोठ्यांमागून या तीनच पावलांच्या महालाबाहेर दुसऱ्या बाजूच्या यक्षनगरीत घाईघाईने उतरते.

इथे येताना मोठ्यांना या यक्षनगरीतल्या ‘ यक्षा ’ची एक अट पाळावी लागते. आपले प्रौढपण उतरून ठेवून मगच या नगरीत प्रवेश करायचा. जल–महालातली हेमांगिनी मातीची आहे का चिंध्यांची इथून चिकित्सेला सुरुवात झाली की शाप मिळालाच– वेळ वाईट जाण्याचा शाप ! मग इथे फक्त भेळपुरीच तेवढी आपली. फार तर संसारोपयोगी उपकरणांचे महागडे स्टॉल्स. (यक्षनगरीत देखील ते बेटे आहेतच, अं !) इथे प्रत्येकाने सारे काही छोटे होऊन पाहायचे.

उदाहरणार्थ आत शिरल्यावर उजव्या हाताकडे एका हलत्या चित्रांच्या स्टॉलची जाहिरात म्हणून दांडीला झोके घेणारे रंगीबेरंगी कपड्यातले कसरतबाज माकड. सगळे प्रदर्शन पाहून पाहून त्याला तोंडपाठ झाल्यासारखे ते, प्रदर्शन पाहण्याला धावणाऱ्या गर्दीसमोर दांडी धरून निवान्त एकदा असे, एकदा तसे, झुलत असते. मधूनच एखादी उंच उशी घेते किंवा कोलांटी मारते. पुन्हा पहिल्यासारखे झोके घेत राहते. मोठे राहून पाहू लागले तर मिनिटभरात वाटेल, हॅं ! हाऊ मोनो-टोनस ! (म्हणजे आमच्यासारखे एकसुरी, त्याच त्याच गोष्टी निरर्थकपणे पुन: पुन्हा करणारे. मग हे ‘ हॅं: ! ’ कशाला ?) पण लहान झाले की या सुखी जीवात आपलाही जीव बघता बघता रमतो. मनाने आपण त्याच्या सुखात भागी घेतो. तशा मनचाहे झुल्या, उश्या आणि कोलांट्या घेतो. काही कुणाचे आपण लागते नाही ! झक्क वाटते. किंचित्काळ प्रदर्शनाचा आणि सगळाच कल्लोळ विसरायला होते. इतक्याच निरर्थकपणे बालवयात घालवलेले छान दिवस मनात झोके घेऊ लागतात. कुठे, न पडणाऱ्या चिंचांसाठी आणि कैऱ्यांसाठी अधांतरी दगड भिरका-वीत राहा, कुठे जिन्याच्या लाकडी कठड्यावरून घसरत वरखाली करीत बैस, कुठे एखाद्या सैनिक–गीताच्या तालावर प्रथम पाढे, मग बाराखड्या आणि शेवटी काहीही अरबट चरबट ओरडत दाराच्या चौकटीच्या आढ्याला झोके घे... कस ले



## मूर्खांचे नंदनवन

म्हणून वेव नव्हते, टोचण्या नव्हत्या, क्षिती नव्हती. असेच निर्वेध, दिलचस्प आयुष्य. हूं... चला पुढल्या स्टॉलकडे– बाजूने, पाठुंगळी चार पाच छोटी मोठी माणसे घेऊन रिकी–रिकी चाललेल्या उंटाप्रमाणे. नाहीतर पाचपंचवीस माणसे लीलया वाहात शिट्टचा फुंकीत गर्दीतून पळत उधळत जाणाऱ्या छोटया आगगाडी-प्रमाणे. इथे हे एक बरे आहे. माणसे, उंट, आगगाडी, सारे एकमेकाला चुकवीत गर्दीगर्दीने एकाच मैदानातून चाललेले असते. आगगाडीने रुळावरून जावे, उंटाने अडीच घरे चालावे, माणसांनी फूटपाथवरून जावे, हे तमाम नियम या यक्षनगरीत बाद. उंट घंटा वाजवून प्रसंगी पाठीला दाढी घासत वाट मागतो. आगगाडी पोंगा जोरजोराने वाज–वाजवून मार्ग मिळविते. माणसे एवढयापुरती दुभंगून पुन्हा झुंडीनी निर्चितपणे फिरत असतात. आणि काही माणसे दरडोई दोन रुपये दराने वरून तारांना लटकून सरकत या सर्वांना पाहात असतात. ही रोप–रेल्वे. मोठ्या थोरल्या टोपलीत वसायचे आणि प्रदर्शनावरून सरकत सरकत जाऊन पुन्हा सरकत सरकत परत यायचे, वरून–पण विमानाप्रमाणे फार वरून नव्हेत– माणसे वेटी वेगळीच दिसतात. प्रदर्शनाच्या झगमगाटात खालचा गजबजाट आणि कोलाहल

अद्भुत वाटतो. आपण यापैकी वाटतच नाही, मंगळावरून आलो आहोत अशी कल्पना करून खालच्या चित्रविचित्र सरपटत्या प्राण्यांची आणि त्यांच्यासाठी खोलण्यात आलेल्या या गोंधळाची मजा थोडा वेळ सुखाने पाहता येते. विशेषत: अधून मधून यातल्या कुणाकुणाच्या टकलीत शेंगदाणे मारण्याची आणि तोंडात बोटे खुपसून शिट्ट्या मारून 'दडके चलो' म्हणण्याची कल्पना व्यवहार्य नसली तरी रम्य असते.

## दोऱ्यांचा पूल

चाकोरीतल्या आयुष्याचा खराखुरा वैताग आलेल्यांना इथे (तात्पुरते लहान होण्याच्या अटीवर) एक वाहन आहे. तिकीट काढून यात रुबाबात जाऊन बसायचे आणि एकदा हे सुरू झाले की सुपडा साफ ! म्हणजे लाइनशीर गोल गोल गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या करीत फिरता फिरता हे मध्येच डोळे फिरावे तसे एकदम जे काही उलट सुलट हिसके, दणके आणि धसके घेते ते विचारू नका. अंगातल्या तमाम हाडांची उधळमाधळ होते, नको जीव होऊन जातो ! पुन्हा घट्ट मिटून घेतलेले डोळे उघडून आणि उघडे पडलेले तोंड मिटून पाहावे तो खडाम् खडाम् करीत आपण कसे अगदी सुरळीत चाललेलो असतो. याने सुखावण्याआत पुन्हा नवे दणके आणि हिसके. छोटी छोटी पोरे यात बसून ओरडतात, रडतात, खिदळतात आणि यातली सगळी मजा घेतात. गुलहौशी, जोडप्याने बसून धक्काबुक्कीच्या चित्तथरारक प्रणयाचे सुख अनुभवतात. आपल्याला साचेबंद जगण्याची घडी जरा झकासपैकी मोडल्यासारखे कसे हलके हलके वाटते. पुन्हा बरोबरीच्यांची बघ्ये या नात्याने बिनतिकिटात करमणूक ! 'अय्या नाना केवढे ऽ भ्याले होते ऽऽ' इ० इ०

नाना केवढे ऽ भ्याले होते ऽऽ वाल्यांची जिरवण्यासाठी लगोलग 'मूर्खांचे नंदनवन' आहेच. साळसूदपणे सर्वांना पुढे घुसवायचे आणि आपण शेवटचा मूर्ख होऊन मागून जायचे. अंधार-उजेडाच्या उघडझापीत पायाखालची भुई काय सरकते, एकदम खाली खचायला काय होते, भोवती हाडांचे सांगाडे काय दिसतात, भयंकर घूत्कार आणि किंकाळ्या काय ऐकू येतात—हरे राम ! नाना केवढे ऽ भ्यालेवाल्यांची पावलोपावली टाळ लागते. 'ई ऽ ऽ' 'ऊ ऽ ऽ ऽ' 'अगो बाई'चे गजर होतात. पुन्हा ही मंडळी पुढे असल्याने पुढल्या अनपेक्षित युक्त्यांचा आगाऊ पत्ता आपल्याला लागत राहतोच. वाटले तर एखादी भयंकर किंकाळी आपणही मजेत मारावी; पण आपणच तिने घाबरू नये, हे महत्त्वाचे.

आपल्याला घाबरण्यासाठी इथे 'दोऱ्यांचा पूल' आहे. त्यावर 'मध्या, तुला जमणार नाही.' 'शके, तू घाबरशील' असे सर्वांना बजावून आणि दटावून आपण एकट्यानेच जावे. पुलाच्या मधोमध लटपटत्या पायांनी कसे तरी पोचले की कसे सर्कसच्या तारेवर छत्री विसरून मधोमध पोचल्यासारखे वाटते. प्रदर्शनाच्या कोणत्या भागात पडायचे एवढाच प्रश्न शिल्लक राहतो ! नको म्हटले तरी खालून

पायांकडून वर वर घाबरायला होऊ लागते. फार वर घाबरायला होण्याआत खाली उतरावे. खाली येऊन 'हॅं : ! अगदीच सामान्य !' असे न विसरता म्हणावे आणि पुढे निघावे. सामान्य कोण ते आपल्यालाच ठाऊक.

## आपले उद्‌बोधक दर्शन

थोडयाच अंतरावर मिस्टर चार्ली ग्लासे आणि बाटल्या—रिकाम्या—घेऊन तोल सांभाळण्याच्या नाजूक आणि अवघड कसरती करीत असतो. लोखंडी कड्यातून मटारातल्या किड्यासारखा आतबाहेर पडून सलाम करीत असतो. इथे धाकटा मध्या म्हणेल, 'हॅं : ! हे मी सहज करून दाखवीन !' 'गप्प बैस' असे यावर दटावण्याने मध्या गप्प बसणे अशक्य त्याचप्रमाणे आपलेच हसे होण्याचा संभव; त्यापेक्षा 'मी तर यापेक्षा करून दाखवीन' असे म्हणून मिस्टर मध्याला आव्हान द्यावे. याने मध्या बिथरत नाही आणि दोघांच्या बाष्कळ बडबडीत थोडा वेळ, खरे वाटणार नाही एवढा चांगला जातो. नाही तरी मिस्टर चार्ली नवीन ते काय करतो ? अवघड प्रसंगांतून लवचिक होऊन अच्चळ बाहेर येणे ही कसरत आपल्याला लौकिक व्यवहारात अवगत असतेच. अधूनमधून नाकावर हापटण्याचे खासगी आणि घरगुती प्रकार सोडल्यास तोल सांभाळण्याच्या कसरतीत आपण देखील तसे बऱ्यापैकी तरबेज असतो. मिस्टर चार्लीच्या कसरती प्रेक्षणीय असतात एवढेच त्याचे खरे म्हणजे श्रेष्ठत्व ! दुचाकीचे खेळ करणारे मिस्टर दवे, फड फड फड करीत मोटार सायकलीची वीस फूट लांब अधांतरी उडी मारणारा भन्नाट मिस्टर आणखी कोणीतरी, स्वतःला आग लावून पंचेचाळीस फूट उंचीवरून खालच्या उथळ हौदात रोज दोनदा आंघोळीसाठी उडी घेणारा मिस्टर डॅनिअल, ही सर्व, लहान होऊन न्याहाळण्याची थोर थोर मंडळी. आपले थोरपण—असलेले आणि नसलेले—सुटत नसेल तर नजीकच्या, चित्रविचित्र आरशांच्या स्टॉलमध्ये स्वतःलाच जरा न्याहाळावे. आपल्या शत्रूंना आणि मित्रांना—आणि बहुधा कुटुंबालाही—आपण कसे दिसत असू ते इथे आपल्याला कळते. एकजात विनोदी आणि दयनीय ! चार आणे खर्चूनही कोणी पाहू नये असे ! पण चार आणे खर्चूनच आपले हे उद्‌बोधक दर्शन इथे आपल्याला मिळू शकते. या स्टॉलमधून बाहेर पडले की भोवतालची सर्वसामान्य माणसेदेखील कशी स्टॉलमध्ये मांडल्यासारखी देखणी वाटू लागतात ! बाटल्या ग्लासांच्या कसरती करणारा उघडाबंब पीळदार घामेजला मिस्टर चार्ली तर 'मला मदन भासे हा' वाटतो. 'चला—चला—पुढे चला'—म्हणत सौभाग्यवतीसकट सर्वांना आपण घाईने आत्री इथून दूर नेतो.

एव्हाना, आरंभी भेटलेला, घंटा वाजवीत, अंग मोडत मोडत चालणारा, माणसेवाहू उंट नको असलेल्या आप्तासारखा आपल्याला पुन्हा पुन्हा भेटलेला असतो. याने आलेला कंटाळा दूर करण्यासाठी उपाय म्हणजे त्यावर आपणच एकदा शहाण्यासारखे सहकुटुंब बसून लोकांना दिसावे. किंवा 'यक्षनगर' स्टेशनवर आरामात

तिकिटे काढून तीन डब्यांच्या आणि विनगचडीच्या आगगाडीतून ऐसपैस बसून धावून यावे.

आयुष्यात आपले काही नेम अपघाताने लागले असले तरी नेमबाजी हे आपले क्षेत्र नव्हे. प्रदर्शनाच्या या विभागात मध्याला ' चान्स ' द्यावा. तो बहुधा हरला की ' काय हे ! तुझ्या वयात मी अचूक दगड मारून पंचवीस फुटांवरची चिंच पाडायचो. ' असे त्याला हिणवावे. तो यावर विश्वास ठेवीत नाहीच–त्याची आई-देखील पदर तोंडाला लावते–तरी पण असे म्हणण्यातदेखील एक गंमत असते. चुकून मध्याचा नेम लागला तर ' आहेस, माझा बच्चा आहेस, ' असे त्याला शाबासकीदाखल म्हणावे. यावर अविश्वास दाखविणे कुणालाही शक्य नसते. हे सर्व अर्थात बालिश असतेच, पण त्यासाठीच तर आपण यक्षनगरीत आलेलो असतो.

एव्हाना या प्रदर्शनातली सर्वांत मोठी गंमत आपण पाहिलेली असते. ती म्हणजे हां हां म्हणता खाली झालेले पाकीट ! कोणत्याही प्रदर्शनाचे यश म्हणतात ते हेच. ते पाहून संपल्यावर कसे अगदी हलके फूल वगैरे झाल्यासारखे वाटते.

परतताना, दांडीवर निवान्त झोके घेणारे माकड जरा गंभीरच वाटते आणि झोपलेली हेमांगिनी एका किलकिल्या डोळ्याने आपल्याला पाहात असल्याचा उगीच जरासा भास होतो.

हे फार मनावर न घेतलेलेच बरे. दोन घटका बऱ्या गेल्याशी कारण.

अखेर यक्ष–नगरी म्हणा, टूरिस्ट फेअर म्हणा, किंवा अमुक तमुक प्रदर्शन म्हणा, शेवटी हे सर्व मैदानी सोहळे आपल्यासाठीच असतात.

आपल्या (पैशा) साठी.

O

आमच्याकडे येणाऱ्या कवितांची संख्या भरपूर आहे. त्यामुळे त्या संबंधीचा पत्रव्यवहार ज्या वेगाने हवा तसा होऊ शकत नाही. त्यातून डिसेंबर १९६८ पर्यंतच्या कवितांची निवड पूर्ण झाली असल्याने या पुढील कवितांची दखल घेणे, किंवा त्यासंबंधीचा पत्रव्यवहार करणे जवळ जवळ अशक्यच आहे. तसेच ' माणूस 'कडे पाठवलेल्या लेखासोबत पुरेसे टपाल हशील जोडावे.

*–संपादक*

# पूर्व सीमेवर आणखी एक नवे (उप) राज्य

गेली काही वर्षे भिजत पडलेला आसामच्या पुनर्रचनेचा प्रश्न एकदाचा निकालात काढण्याचे केंद्र सरकारने ठरविल्याचे दिसत आहे. आसामच्या दक्षिण आणि आग्नेय सीमेवर असलेल्या पहाडी जनतेचे समाधान कसे करायचे हाच या बाबतीतील केंद्र सरकारपुढचा महत्त्वाचा प्रश्न होता. आसामपासून आपल्याला वेगळे काढून एका नव्या राज्याचा दर्जा मिळाला पाहिजे अशी या पहाडी जमातींची मागणी होती. परंतु ही मागणी आहे त्या स्वरूपात मान्य करणे केंद्र सरकारला सोईचे वाटत नव्हते. या बाबतीत प्रामुख्याने दोन अडचणी होत्या. एक तर खोऱ्यातील आसामी जनतेचा विरोध आणि दुसरे म्हणजे या पहाडी जमातींचे सर्वस्वी निराळे राज्य निर्माण केले तर आज ना उद्या नागाप्रदेशासारखी तेथे भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारी चळवळ मूळ धरेल अशी केंद्र सरकारला साधार भीती वाटते.

या दोन अडचणींतून मार्ग काढण्यासाठी केंद्र सरकारने अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली होती. पहाडी जिल्ह्यांसाठी एक वेगळे प्रादेशिक मंडळ निर्माण करावे असा मध्यम मार्ग अशोक मेहता यांनी सुचविला होता. परंतु अशा स्वरूपाच्या दिखाऊ स्वायत्ततेवर पहाडी जनतेचे समाधान होण्यासारखी परिस्थिती राहिली नसल्यामुळे मेहता-समितीच्या शिफारशी कागदावरच राहिल्या. यानंतर पुन्हा चर्चेची गुऱ्हाळे सुरू झाली आणि त्यांतून काहीही निष्पन्न होईना. शेवटी केंद्र सरकारनेच या कामी पुढाकार घेऊन खरसी-जांतिया आणि गारो या पहाडी जिल्ह्यांचे उपराज्य निर्माण करावे असे आता ठरविले आहे. या पहाडी उपराज्यासाठी वेगळे मंत्रिमंडळ, वेगळे विधिमंडळ आणि वेगळे पोलिसदल राहणार आहे. अशा रीतीने मर्यादित प्रमाणात का होईना पहाडी जनतेची स्वायत्ततेची मागणी पूर्ण केली जात आहे. अर्थात हा भाग आसाम राज्यातच राहणार असल्यामुळे आसामी जनतेलाही या नव्या तरतुदीला विरोध करण्याचे कारण उरणार नाही. पहाडी उपराज्य आसाम राज्याचाच घटक म्हणून वावरणार असल्यामुळे आसाम विधिमंडळात आणि मंत्रिमंडळातही पहाडी प्रतिनिधींना स्थान मिळणार आहे.

केंद्र सरकारने सुचवलेली ही व्यवस्था पहाडी जमातीच्या नेत्यांनी मान्य केली. आता वर्षभराच्या आत आसाममध्ये पहाडी उपराज्य अस्तित्वात आले, की केंद्र सरकारची डोकेदुखी काही प्रमाणात तरी बंद होईल अशी आशा करावयास हरकत नाही. काही प्रमाणात असे म्हणण्याचे कारण हे, की स्वतंत्र उपराज्य मिळाल्यानंतर पहाडी नेते स्वस्थ बसतील अशी भाबडी आशा कोणीही बाळगू नये.

गेल्या वीस वर्षांच्या सरकारी उपेक्षेमुळे भारताच्या पूर्व सीमेवरील भागामध्ये ख्रिश्चन धर्मोपदेशकांनी तेथील आदिवासी जनतेमध्ये फुटीरतेची भावना एवढ्या मोठ्या प्रमाणावर रुजविली आहे, की भारत ही आपली मातृभूमी आहे असे तेथे मानले जात नाही. भारत, पाकिस्तान, ब्रह्मदेश आणि चीन ही आमची शेजारी राष्ट्रे आहेत आणि या सर्वांशी आम्हांला मैत्री हवी आहे असे या पहाडी जनतेचे नेते आपल्या अनुयायांना भडकविण्यासाठी प्रवचने देत असतात. या बाबतीत नागा प्रदेशाचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवावयास हवे.

## सार्वभौमत्वाला आव्हान !

नागा लोकांना आसाम राज्यात राहावयाचे नव्हते. त्यांना आपला वेगळा शासन-विभाग हवा होता. नागा नेत्यांची ही फुटीर मागणी आम्ही मान्य करणार नाही, अशी केंद्र सरकारची प्रारंभीची भूमिका होती. १९६० मध्ये महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांची निर्मिती करताना 'देशातील ही शेवटचीच राज्य पुनर्रचना आहे', असे पं. नेहरूंनी जाहीर सांगितले होते. परंतु त्यानंतर नागा बंडखोरांच्या आक्रमक कारवायांना एवढा जोर चढला की, अल्पावधीतच नागा प्रदेशाचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्यात येणार असल्याची नेहरूंना घोषणा करावी लागली. अशा रीतीने भारताच्या नकाशावर सतरावे राज्य रेखाटण्यात आल्यानंतर नागा नेते शांत होतील आणि भारतीय जीवनाशी समरस होतील, असा विश्वास नागा प्रदेशाच्या निर्मितीच्या वेळी व्यक्तविण्यात आला होता. परंतु हा विश्वास अनाठायी आहे हे लवकरच ध्यानात आले. वेगळे राज्य हा केवळ देखावा होता. भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देण्याचीच त्या मागे मूळ प्रेरणा होती आणि आहे, ही वस्तुस्थिती वेगळे राज्य दिल्यानंतरही नागा बंडखोरांनी वाटाघाटींचा जो घोळ चालविला आहे त्यावरून दिसून येते.

नागांच्या मागण्यांबाबत केंद्र सरकार नमती भूमिका घेत आहे असे आढळून आल्यानंतर आसाममधील मिझो, खासी-जांतिया गारो भागातील पहाडी नेत्यांनी आपल्याला वेगळे राज्य हवे अशी मागणी करावयास प्रारंभ केला. इतकेच नव्हे तर या मागणीबाबत केंद्र सरकारला नमविण्यासाठी नागांप्रमाणेच सशस्त्र दंगलींनाही प्रारंभ केला. आपल्या सीमेलगत असलेल्या या भागामध्ये भारताविरुद्ध कारवाया सुरू झाल्यावर त्याचे पाकिस्तानने स्वागत केले नसते तरच नवल. आसामी राज्यातील जनतेला भारत सरकारविरुद्ध चिथावण्यासाठी पाकिस्तानने सीमेलगतच्या भागामध्ये गनिमी काव्याचे शिक्षण देणारी केंद्रे उभारून तेथे या बंडखोरांना चिनी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण आणि शस्त्रास्त्रे देण्यास प्रारंभ केला. मिझो जिल्ह्यातील ऐजाल हे प्रमुख शहर सोडले तर जिल्ह्याच्या इतर भागांत लष्करी साहाय्य घेतल्याशिवाय सरकारी अधिकाऱ्यांना वावरता येत नाही अशी सध्या तेथे परिस्थिती आहे. यावरून आपल्या वेगळ्या राज्याची मागणी

भारत सरकारने मान्य केली नाही तर नागांप्रमाणे आपणही बंडाचा झेंडा उभारला पाहिजे या दृष्टीने पहाडी नेत्यांनी कोठवर तयारी केली होती याचा अंदाज येतो.

नागा काय किंवा मिझो काय, भारताच्या सर्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या शक्तींविरुद्ध प्रारंभीच कणखर उपाययोजना केली असती तर पूर्व सीमेवर आज जो राष्ट्रविरोधी शक्तींचा राजरोस आविष्कार पाहावयास मिळत आहे तो दिसला नसता. एखादा प्रश्न निर्माण झाला की प्रथम त्याची उपेक्षा करायची, त्यासंबंधी कोणी पूर्वसूचना देऊ लागला तर त्याचा उपहास करायचा, त्या प्रश्नाने गंभीर रूप धारण केले की वाटाघाटींची सत्रे सुरू करायची आणि शेवटी नमते घेऊन आपला विजय झाला अशा थाटात काहीतरी सारवासारव करायची हे आपल्या केंद्र सरकारचे धोरण अखेरीस किती परिणामशून्य ठरते हे प्रथम नागा बंडखोरांनी आणि आता मिझो बंडखोरांनी दाखवून दिलेले आहे.

## केंद्रसरकारची नवी जबाबदारी

त्यामुळेच आसामच्या पहाडी भागातील जनतेला उपराज्याचा दर्जा देऊन ही कटकट मिटली असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. किंबहुना स्वतंत्र विधिमंडळ, मंत्रिमंडळ आणि पोलिसदल मिळाल्यानंतर या पहाडी जनतेच्या फुटीरतेच्या प्रवृत्तीला खतपाणी मिळण्याचाच अधिक संभव आहे. हे असे घडता कामा नये यासाठी संरक्षणखात्यावर विशेष जबाबदारी येणार आहे. एक प्रश्न सोडवून त्याहीपेक्षा गंभीर प्रश्न निर्माण झाला असे जर होऊ द्यायचे नसेल तर वेगळे नागा राज्य निर्माण झाल्यानंतर त्या राज्यात कोणत्या कारवाया चालतात याकडे जसे दुर्लक्ष करण्यात आले तसे या पहाडी राज्याबाबत होऊ नये. नागा प्रदेशाबाबत आज अशी परिस्थिती आहे, की तेथल्या लोकनियुक्त सरकारचे नियंत्रण केवळ कोहिमापुरतेच मर्यादित आहे. हे राजधानीचे शहर सोडून आतल्या जंगलात गेले, की तेथे भूमिगत नागा प्रतिनिधींचेच अधिराज्य आढळते. लष्करी मदतीवाचून भारतीय नागरिकाला नागा प्रदेशात हिंडता येत नाही. नव्याने निर्माण होत असलेल्या पहाडी राज्याच्या बाबतीत या प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये अशी जर मनापासून इच्छा असेल, तर स्वतंत्र उपराज्य मिळाल्यानंतर पहाडी नेते कोणती भाषा बोलतात आणि कोणती तयारी करतात यावर केंद्र सरकारचे कडक लक्ष असले पाहिजे. जेथे केंद्र सरकारचे आसन स्थिर झालेले नाही तेथील राज्यकर्ते एकीकडे स्वतःचा वेगळेपणा सांभाळत असतात व दुसरीकडे केंद्र सरकारकडून जास्तीत जास्त फायदे मिळविण्याचा सोईस्कर खेळ खेळत असतात. त्यामुळे अवाढव्य खर्च होऊनही मूळ प्रश्न सुटत नाही. काश्मीर आणि नागा प्रदेशात हेच घडले आहे. आसाममधील पहाडी जनतेची 'स्व–राज्या'ची मागणी मान्य करताना हे येथेतरी घडणार नाही याचीच यापुढे केंद्र सरकारला काळजी आणि जबाबदारी पाहावी लागणार आहे.

**–सदाशिव पेठकर**

# विचार वारे

## □ खुज्या गव्हाची कहाणी

सध्या हिंदुस्थानातील गव्हाच्या उत्पादनात क्रांतिकारक वाढ घडवून आणणाऱ्या खुज्या गव्हाच्या जातींचे जनक व अमेरिकेचे सुप्रसिद्ध 'गहू–तज्ज्ञ' डॉ. नॉर्मल बोटलॉग नुकतेच आणखी एक भारत–भेट देऊन गेले तेव्हा त्यांनी या खुज्या गव्हाची आश्चर्यकारक कहाणी कथन केली.

खुज्या गव्हाचे उत्पादन अधिक होते याचे रहस्य त्याच्या खुजेपणात आहे. एखादे रोपटे अधिक वाढायचे असेल तर त्याला अधिक 'खायला' घालायला पाहिजे. परंतु रोपट्याचा किंवा कणसाचा दांडा नाजूक व लांब असला तर खतामुळे अधिक वजनदार झालेल्या कणसाचा भार त्याला सहन होत नाही व कणीस कोलमडून पडते. ही समस्या सोडविण्याचा एकच उपाय म्हणजे दांड्याची लांबी कमी करून तो अधिक मजबूत करणे. खुज्या जातींचा शोध हा असा सुरू झाला. सुमारे चाळीस वर्षांपूर्वी मोहेंजोदारो येथे खुज्या जातीच्या गव्हाचे दाणे सापडले व तीन हजार वर्षांपूर्वी पंजाबात या गव्हाची शेती होत होती असा शोध लागला. तेव्हापासूनच या जातीचा तपास सुरू झाला. जर्मनी, इंग्लंड, कानडा इत्यादी देशांत या बाबतीत बरेच संशोधन झाले. पण त्या प्रयोगातून निर्माण झालेला गहू आखूड दांड्याचा होता तरी भरघोस पिकाचा नव्हता.

परंतु १९५३ साली डॉ. बोटलॉग यांच्या एका मित्राने सहज दिलेल्या माहितीमुळे परिस्थिती बदलली. या मित्राने जनरल मॅकॉर्थरबरोबर जपानमध्ये काम केले होते. तेव्हा त्यांनी जपानी शेतकऱ्यांनी खूपच आखूड दांड्याचा गहू पिकविलेला पाहिला होता. हा गहू आणून प्रयोग सुरू झाले तरी प्रथम अपयशच आले. या गव्हाच्या उत्पादनासाठी कडक थंडीची आवश्यकता होती. प्रयोग मेक्सिकोत चालले होते. तेथे या गव्हाला निरनिराळ्या प्रकारचे रोग लागत होते. परंतु प्रयोगाला दिशा मिळाली होती. जपानी गहू मेक्सिकन गव्हाच्या शेकडो जातींवर कलम करण्यात आला. निरनिराळे रोग आणि दोष एक एक दूर करण्यात आले आणि अखेर १९५९ मध्ये पाच–सहा जाती विक्रीसाठी तयार करण्यात आल्या.

१९६० पर्यंत वनस्पति–जननशास्त्राचा असा सर्वमान्य सिद्धान्त होता, की बियाणात सुधारणा केली तरी पीक अधिकात अधिक दहा टक्क्यांपेक्षा जास्त वाढू शकत नाही. नवीन खुज्या गव्हाने सिद्ध केले की पीक शंभर टक्के म्हणजे दुप्पट वाढू शकते. हिंदुस्थानात ज्या खुज्या जाती तयार करण्यात आल्या आहेत त्यांचे पीक कालांतराने दर एकरी १२० मणांपेक्षाही अधिक येईल. सध्या चांगल्या गव्हाची सरासरी पैदास ६५ मण आहे. खुज्या गव्हाची ही पैदास 'देशी' गव्हाच्या अधि-

कात अधिक पैदाशीहून तिप्पट मोठी होईल. " मात्र नवनवीन जाती शोधून काढण्याच्या प्रयत्नात खंड पडता कामा नये, कारण नवीन जात तयार झाली की रोगही नवीन निर्माण होतात."

नवीन जातीच्या गव्हाच्या भरदार पिकाची शेतकऱ्यावर मोहिनी पडते, परंतु पीक वाढल्यामुळे किंमत कमी होऊ दिली तर ती एक मोठी चूक ठरेल. कारण शेतकरी उत्पादनाचा प्रयत्न करतो तो अधिक उत्पन्न व्हावे या इच्छेने करतो. भारतीय शेतकरी हा सरकारला वाटते त्यापेक्षा अधिक सुलभतेने बदलत्या परिस्थितीनुसार बदलू शकतो. तेव्हा भविष्यकाळातले येथले पीक कल्पनेच्या बाहेर येऊ शकेल. अशा परिस्थितीत भाव ठरविताना राजकीय व इतर अर्थकारणाशी असंबद्ध बाबतीची लुडबूड होऊ न देणे आवश्यक आहे. या दृष्टीने पाहताना 'रबी'चे पीक बाजारात येईल त्याच सुमारास पी. एल्. ४८० करारान्वये ३५ लाख गव्हाची आयात होऊ देणे ही चूक आहे. " भारताने पी. एल्. ४८० ची आयात थांबविली पाहिजे."

## ☐ भारतीय शेतकरी सुधारक आहे

शेतकी आणि 'ग्रामीण समाजशास्त्र' या विषयांचे पश्चिम जर्मन तज्ज्ञ प्रा. ओटो शिलर हे भारतातील शेतीची प्रगती पाहण्यासाठी मधून मधून हिंदुस्थानात येत असतात. थोड्या दिवसांपूर्वी ते येऊन गेले, तेव्हा येथील अन्न-परिस्थितीबद्दल त्यांनी आशावाद प्रकट केला.

" जर्मनीत जेव्हा हिंदुस्थानातील अन्न-परिस्थितीची चर्चा होते, तेव्हा आशावादी व निराशावादी अशी दोन्ही प्रकारची मते प्रकट करण्यात येतात. मी प्रथमपासूनच आशावाद्यांच्या बाजूला आहे. कारण मी प्रत्यक्ष पाहिले आहे की, येथले शेतकरी फार चांगले आहेत, ते बुद्धिमान आहेत आणि शेतीच्या आधुनिक पद्धती वापरायची त्यांची तयारी आहे. हे आधुनिकीकरण लवकर होऊ शकेल की त्याला वेळ लागेल, हे शेतीचा एकूण प्रश्न कसा हाताळण्यात येतो, यावर अवलंबून आहे. पण ज्या ठिकाणी तो नीट हाताळण्यात आला आहे, तेथे धान्याची पैदास चटकन वाढली आहे. नवीन जातीच्या गव्हाची पेरणी करण्याच्या बाबतीत भारतीय शेतकऱ्यांनी आश्चर्यकारक उत्साह दाखविला आहे. यावरून असे स्पष्ट होते की, त्यांना देशातील धान्योत्पादन वाढविण्याची खरोखरीच इच्छा आहे."

" योग्य परिस्थिती असेल तर, म्हणजे नवीन पद्धतीचे ज्ञान, नवीन अवजारे आणि परिस्थितीला अनुरूप अशी आर्थिक साहाय्याची योजना या गोष्टी भारतीय शेतकऱ्याला उपलब्ध करून दिल्या तर, तो आपली जबाबदारी निश्चितपणे पार पाडील. मात्र भारतीय शेतीच्या क्षेत्रात सहकाराच्या नव-नवीन प्रकारांचा विकास करणे, फार अगत्याचे आहे. मग तो प्रकार पूर्वीच्या पंचवार्षिक योजनेत दिलेल्या सहकारी शेतीचा असो, की स्वतंत्र शेतकऱ्यांच्या आपसातील सहकार्याचा असो. हा नवीन सहकारी प्रकार काही देशांत उदयाला येत आहे." ○

# खून की आत्महत्या

'खून' आणि 'आत्महत्या' यात किती फरक आहे? अनेक खूनखटल्यात या सूक्ष्म सीमारेषेची मर्यादा ठरविताना चिकित्सक न्यायमूर्तींची कठोर सत्त्वपरीक्षा पाहिली गेली आहे. खूनखटल्यात अनेक वेळा उद्‌भवणारा हा एक गहन विषय आहे.

चित्तरंजन घोटीकर

१३ मे १९११ रोजी 'मेजर बी. ओ. रो' या अमृतसरच्या सेशन्स जज्जाने 'राणी भगवान कौर' या एका धनाढ्य विधवेस फाशीची शिक्षा सुनावली. आपल्या 'कान्हचंद' या एकेकाळच्या प्रियकराचा विष घालून खून केल्याचा तिच्यावर आरोप होता. 'ठाकरी' नि 'रूरी' या तिच्या दोन नोकराणींना खुनात सहभागी झाल्याच्या आरोपावरून

**‘ कान्हचंदचे तोंडही मला पाहायचे नाही
त्याला हाकलून लावा
शक्य तितक्या लवकर त्याचा निकाल लावा ’
राणीने फर्मान सोडले.
दुसऱ्या दिवशी–२० फेब्रुवारीला
कान्हचंदचा निकाल लागला.
तो अपघाती मृत्यु होता ?
का खून ? का विषबाधा ? सारेच गूढ....**

---

शिक्षा प्रत्येकी सात वर्षांची सश्रम कारावासाची सुनावण्यात आली. कान्हचंदचा मृतदेह दडवून ठेवल्याचा या दोघींवर आरोप होता. केवळ अमृतसरमध्येच नव्हे तर सर्व पंजाबमध्ये या खटल्यामुळे प्रचंड खळबळ उडाली होती.

कान्हचंदचा मृत्यू सोमल या विषप्राशनानेच झाला यात संदेह नव्हता. या विषप्राशनाचे (की विषप्रयोगाचे ?) वेळी त्याचे वास्तव्य राणी भगवान कौरच्या अमृतसर येथील बंगल्यातच होते, हेही सिद्ध झाले होते. राणी कौरचे निवासस्थान एक भव्य प्रासादच होता. आवारातील मुख्य प्रासादाच्या मागील–पुढील बाजूस विस्तीर्ण अंगणे होती. आवारात इतर पुष्कळच छोटचा छोटचा बंगली नि काही कचेऱ्याही होत्या. या सर्वांना वेढणारी उंच भिंतीची भक्कम तटबंदीही होती. फक्त दर्शनी भागात एक भव्य प्रवेशद्वार होते नि त्यात एक छोटे फाटक बसविले होते.

राणी भगवान कौरची, ती हरिद्वारला यात्रेला गेली असताना, कान्हचंदशी ओळख झाली. जुलै ते सप्टेंबर १९१० या तीन महिन्यांच्या तिच्या हरिद्वारच्या वास्तव्यात या परिचयाचे स्निग्ध स्नेहात रूपांतर झाले. ती त्या वेळी हरिद्वारला पूंचच्या महाराजांच्या हवेलीत राहात होती. कान्हचंद या हवेलीची दरमहा दहा रुपये पगारावर देखभाल करीत होता. कौर हरिद्वारला आली त्या वेळी कान्हचंद अत्यंत दुःखी मनःस्थितीत होता. जम्मूमधल्या मिरपूर येथे त्याची बायको नुकतीच

वारली होती. त्याच्या दु:खाने कौर विरघळली. त्याच्याबद्दल तिला अनुकंपा निर्माण झाली. कान्हचंदचे वय या वेळी अठ्ठावीस होते. कौर चौतीस वर्षांची होती. नानातऱ्हेच्या प्रलोभनांनी तिने त्याचे मन आपल्याकडे वेधून घेतले. त्याला चुचकारून-गोंजारून घेण्यास सुरुवात केली. काही अंशी त्याच्या मनाला विरंगुळा मिळावा या हेतूने नि काही अंशी ' अन्य ' हेतूंनी !

## कौरची ती प्रेमपत्रे

याच सुमारास कान्हचंदला त्याच्या पूंचमधील एका मित्राचे पत्र आले. कान्हचंदचे आपल्या कामावर नीट लक्ष नसून, त्याचा मालक त्याच्यावर खूप रागावला असून, याची परिणती त्याची नोकरी जाण्यातही होईल, अशी धमकी त्याच्या या मित्राने त्याला या पत्रात दिली होती. नोव्हेंबर १९१० मध्ये कान्हचंदने या नोकरीचा राजीनामा दिला. तथापि, ही नोकरी गेली तरी फिकीर करण्याचे कारण नाही, अमृतसरच्या आपल्या प्रासादात त्याला एखादी नोकरी देण्याचे आमिष कौरने त्याला दाखविले. नोव्हेंबर १९१० नंतर कौरने त्याला पाठविलेल्या अनेक पत्रांवरून नि तिच्या एका छायाचित्रावरूनही, कौरचे नि त्याचे हरिद्वारला जमलेले स्नेहसंबंध प्रीतिरज्जूंनी जखडले गेल्याचे उघड झाले होते. नकळत त्यांच्यांत प्रीतीचा एक हळुवार प्रवाह वाहू लागला होता. याला अर्थातच वैषयिक वासनांचाच वास होता, हेही उघड होते. ही सर्व प्रेमपत्रे पुढे पुरावा म्हणून अमृतसरच्या सेशन्स जज्जापुढे (मेजर रो) जेव्हा सादर करण्यात आली, तेव्हा ती कौरने 'प्रेमाच्या अतिगुलुगुलू भाषेतच लिहिली असल्याचे' त्यानेही नमूद केले होते. तथापि, हरिद्वारला कौरला कान्हचंदबद्दल जी ओढ नि आत्मियता निर्माण झाली होती ती कालांतराने कमी होत गेल्याचे आणि इतर फालतू गोष्टींनीच ही प्रेमपत्रे पुढे पुढे भरल्याचे सिद्ध झाले होते. प्रेमिकांचा पहिला उन्मेष कालांतराने ओसरतोच ना ! कौरचेही तसेच झाले. तिच्या पत्रांतली सुरुवातीची लडीवाळ नि उन्मादक भाषा पुढे पुढे ओसरणीला लागली होती. पुढे पुढे तर कान्हचंदच्या प्रत्युत्तरातल्या अनेक शब्दांना आणि वाक्यांना ती हरकतही घेऊ लागली. सुरुवाती-सुरुवातीला तिने कान्हचंदला ज्या अनेक वस्तू प्रेमभेट म्हणून दिल्या होत्या—उंची सुवासिक सावणाच्या वड्या, नाना प्रकारची भारी टॉनिक्स, चांगली वस्त्रप्रावरणे इ.— त्यांचाही उल्लेख ती उपकाराच्या भाषेतच करू लागली. वस्तुत:, एका धनाढ्य विधवेने—नव्हे प्रेयसीने—आपल्या प्रियकराला अशा क्षुल्लक वस्तू भेट म्हणून द्याव्यात, हे एक नवलच होते. " कबूल केल्याप्रमाणे मी तुला अमृतसरच्या माझ्या हवेलीत नोकरी अवश्य देईन; पण तसा एक औपचारिक अर्ज तुला अगोदर करावा लागेल; हा अर्ज माझ्या इस्टेटीची सर्व व्यवस्था पाहणाऱ्या माझ्या भावाला दाखविल्यावरच पुढे त्याबद्दल हालचाल करता येईल, " असेही तिने त्याला वारंवार पत्रांतून कळविले. त्याने आपल्या पत्रात त्याच्या मृत पत्नीच्या पुन: पुन्हा केलेल्या उल्लेखाला

कंटाळून तिने त्याला लिहिले : " तुला दुसरी बायको मिळवून देण्याची व्यवस्थाही होईल; पण हे सर्व तू नोकरीवर रुजू झाल्यानंतरच होऊ शकेल !" फेब्रुवारीत कौरने त्याला कळविले, " कबूल केल्याप्रमाणे तुला नवी नोकरी देण्याची टाळाटाळ करण्याचा माझा हेतू नाही. ते आश्वासन कायमच आहे ! तत्पूर्वी आपले दुःख विसरण्याकरता नि पुन्हा पूर्ववत मनःस्थितीवर येण्याकरता तू दोन महिने एकदा आपल्या गावी घरी जाऊन राहून ये ! तसेच माझ्याशी जरा नीट वागत जा ! हे न करताच जर तू अमृतसरला माझ्याकडे आलास तर मात्र तुला माझ्या घरात थारा मिळणार नाही, हे पक्के लक्षात ठेव !"

मृतपत्नीच्या विरह-दुःखाचा थोडा तरी विसर पडून, कौरसारख्या धनाढ्य विधवेच्या प्रेमाचा आधार मिळतोय, या आशेने कान्हचंदला एक सुखद संवेदना होऊ लागली होती. आपल्या आयुष्यातील पोकळी अशी परस्पर भरून निघत असेल तर एका मोठ्या शोकातून आपण लवकरच मुक्त होऊ, या आशेने तो कौरबद्दल त्याला वाटणारी ओढ पत्रातून वरचेवर व्यक्त करू लागला. तथापि, आपल्या प्रेमाला योग्य तो प्रतिसाद देण्याऐवजी कौर आपणास तिच्या घरी येऊ देण्यासही राजी नाही, हे पाहून, काहीशा निराशेनेच, त्याने तिला कळविले, " तूच मला आपल्या प्रेमजालात ओढलेस. माझ्या प्रीतीला जर तू प्रतिसाद देणार नसशील तर तुझ्या दारातच मी आत्महत्या करीन !" १४ फेब्रुवारीला हताशपणे नि थोड्याशा आततायीपणे त्याने कौरला कळविले, " मी माझे जीवनसर्वस्व तुला वाहिले आहे. तुझ्या वेडसर कल्पनांच्या पायी जर माझा मृत्यू ओढवला तर तेही करण्यास मी कचरणार नाही. तुला तुझ्या या नोकराची किंमत अद्यापि कळलेली नाही, असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते. तुझ्या या सच्च्या चाकराला तुझ्या दारी प्राणत्याग करण्यास अभिमानच वाटेल. मला जीवनाचे दान तूच केलेस ना ? मला बरे वाटत नाही ! ताप येतोय ! डायरियाही झाला आहे. हताशपणे मी मृत्यूच्या दारात उभा आहे नि तू मात्र थंडच आहेस. तरीही मी तुझ्या हुकमाची वाट पहात आहे. तुला ज रुचेल ते करण्यास तू मोकळी आहेस. मीही मला वाटेल ते करण्यास मोकळा आहे. मी इथे मरण्याच्या आत तुझ्या नोकरीवर रुजू होण्याचा हुकूम आला तर आनंदच ! तुझ्याकडे येत असताना गाडीतच माझे भूत झाले तरीही उत्तमच ! पण जर मी जिवंतपणी तुझ्या दारात आलो तर मात्र तुझ्या पायाशीच मरण येण्यात मला अभिमान वाटेल. नोकरीकरता तुझ्या मुलाखतीची मला आता आशा उरली नाही. जेवढा दुष्टावा करायचाय तेवढा कर ! मी मात्र जंगलातून सू सू करीत वारा निघून जावा तसा एक दिवस निघून जाईन. एका पाप्याच्या कटकटीतून मुक्त झाल्याचा आसुरी आनंद तुला होईल. पण लक्षात ठेव, माझ्या मृत्यूला तूच कारणीभूत होणार आहेस. माझ्या मरणाची जबाबदारी तुझ्यावरच राहील. मी मात्र मुक्तात्मा होईन. नाहीतर तुझ्यापायी नैतिकदृष्ट्या मी बदनाम झालो

आहेच ! त्यापेक्षा मृत्यू काय वाईट ? मला खोटया आशा लावू नकोस. भ्रामक आशेवर जगण्याची माझी इच्छा नाही. आजारातून मी ' मुक्त ' झालो तर चांगलेच! पण माझ्यासारख्या निष्पाप जीवाला निर्दयपणे मारून टाकण्यात तुला कुठला आनंद ? तू सुखी होशील; मी मात्र मरणाच्या वाटेकडे डोळे लावून आहे. शपथेवर सांगतो, तुझ्या विरहाच्या दुःखाने माझे बरेवाईट होईल. नाहीतरी माझ्यासारखा पापी मरत तरी का नाही ? कळत नाही ! परमेश्वरा ! मला लवकर मरू दे ना ! या यातना आता सहन होत नाहीत ! माझा प्राणतरी घे ना लवकर ! मी क्षुद्र आहे; मृत्यूची करुणा भाकीत आहे. परमेश्वरा ! माझी प्रार्थना पुरी कर ना लवकर !"

राणी कौर नि कान्हचंद या दोघांत हरिद्वारला काय घडले असेल ते असो. आता मात्र कौरच्या वासना खूपच शमल्या होत्या, यात शंका नव्हती. त्याच्या आत्महत्येच्या धमक्यांकडे ती कानाडोळा करीत होती. उलट त्याचा आग्रही स्वभाव, स्नेह नि सहवास तिला तापदायक होऊ लागला होता. त्याची अडचण वाटू लागली होती. अमृतसरला त्याच्या वरचेवर होणाऱ्या भेटीच्या वेळी तिने त्याची दखलही घेतली नव्हती; त्याला कस्पटाप्रमाणे वागविले होते.

### विषप्रयोग का विषप्राशन ?

ऑक्टोबर १९१० मध्ये कान्हचंद प्रथमच कौरकडे आला तेव्हा तो आठ—दहा दिवस तिच्याकडे राहिला होता. तो पहिल्यानेच आल्याने तिने त्याची थोडीफार वडदास्तही ठेवली होती. प्रासादाच्या पहिल्या मजल्यावरील मोठ्या पाहुण्यांच्या दिवाणखान्यात त्याची राहण्याची व्यवस्था तिने केली होती. त्याचे शाही स्वागतही केले होते. पण १९११ च्या जानेवारीत तो पुन्हा आला तेव्हा त्याचे पहिल्यासारखे नीट स्वागत तिने केले नव्हते. त्याला राहण्यास स्वतःच्या खाजगी खोलीच्या शेजारचा चौवारा न देता, आवारातली खूप दूरची एक अडगळीची खोली देण्यात आली. एवढेच नव्हे, तर ती स्वतः आठवडाभर ' मजिथा ' या ठिकाणी, तिच्या या ' प्रियकरापासून ' खूप दूर, जाऊन राहिली. त्याची कटकट नको म्हणून ! जानेवारीच्या शेवटी कान्हचंद जरी अमृतसरहून परत गेला तरी, जाताना, परत येण्याची इच्छा त्याने कौरजवळ व्यक्त केलीच. तसे न करण्याबद्दल तिने त्याला साफ बजावले. तथापि, तिची आज्ञा धुडकावून, १९ फेब्रुवारीला भल्या पहाटे पाच वाजता, तो पुन्हा आलाच. कौर वैतागली, भडकली. " कान्हचंदचे तोंडही मला पाहायचे नाही; त्याला हाकलून लावा; त्याला कुठेही जागा देऊ नका; शक्य तितक्या त्वरित त्याचा निकाल लावून टाका, " असे तिने फर्मान सोडले. परत जाण्याचे त्याने तितक्याच निश्चयपूर्वक नाकारले आणि प्रमुख प्रवेशद्वाराच्या पोर्चमध्ये धरणे धरून बसण्याचे त्याने ठरविले. कौर तापली; संतापली. तथापि, त्याला धक्के मारून बळजबरीने हुसकावून लावल्यास कदाचित तो थयथयाट नि

आरडाओरड करून शेजाऱ्यापाजाऱ्यांत आपल्याबद्दल काहीतरी भयंकर अपसमज निर्माण करील, या भीतीने ती थोडी मनातून चरकलीच. तिला पेचात पडल्यासारखे झाले. यावर उपाय काय ?

तथापि, दुसऱ्याच दिवशी रात्री—म्हणजे २० फेब्रुवारीला—कान्हचंदचे तडकाफडकी निधनही झाले. विषबाधेने ! ग्लासातून दुधाबरोबर आर्सेनिक पोटात गेल्याने ! वेदनांच्या त्याच्या आर्त किंकाळ्या प्रासादातील नोकरांनी ऐकल्या. पण त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यात आले. त्याचा ताप संपविण्यात आला.

दुसऱ्या दिवशी पहाटेच्या काळोख्यात त्याचा मृत देह विल्हेवाट लावण्यास गाडीवरून नेत असतानाच कौरला व तिच्या नोकराणींना पोलिसांनी पकडले.

प्रश्न निर्माण झाला की, कान्हचंदचा मृत्यू हा एक खून होता, की ती आत्महत्या होती ? प्रासादाच्या झडतीत, कौरच्या वस्तूंमध्ये, पिवळ्या रंगाच्या आर्सेनिकच्या सात पुड्या पोलिसांना सापडल्या. यावरून हा खुनाचाच मामला असावा अशा तर्कास वळकटी आली. तथापि, कान्हचंदच्या शवच्छेदनाचे वेळी (Post Mortem) त्याच्या पोटात शुभ्र आर्सेनिकचेच अवशेष डॉक्टरना सापडले. आपल्या तापदायक 'प्रियकराचा' काटा काढण्याच्या हेतूने कौरने कान्हचंदवर विषप्रयोग केला असण्याची शक्यता नव्हती काय ? कौरजवळ शुभ्र आर्सेनिक असण्याची शक्यता नव्हती काय ?

'मेजर रो' या अमृतसरच्या सेशन्स जज्जाने राणी कौरला खुनाच्या आरोपावरून दोषी ठरविले. मेजर रो नमूद करतात : " तीक्ष्ण हत्यारे बाळगणाऱ्या सराईत दरोडेखोरांखेरीज इतर कोणालाही कौरच्या प्रासादात—जेथे कान्हचंद किंकाळ्या मारीत होता त्या ठिकाणी—तसा सहजासहजी प्रवेश मिळणे अशक्य होते. कौरच्या खास आज्ञेशिवाय कान्हचंदला त्या ठिकाणी आणले जाणे शक्य नव्हते. तो ज्या खोलीत मारला गेला त्या खोलीत, कौरच्या हुकमावरूनच, त्याला आणले होते. त्याला अंतःपुरात मुद्दाम नेण्यात आणले असले पाहिजे. अंतःपुरापर्यंत त्याला येऊ देण्याचा अधिकार फक्त एकाच व्यक्तीचा होता. कौरचा ! तिने त्याला रात्री अंतःपुरात जाणूनबुजून नेले. त्याला दुधात मिसळलेले आर्सेनिक देण्यात आले. याबद्दल सादर करण्यात आलेला पुरावा निर्णायक स्वरूपाचा आहे. तो अमान्य केला तर ते एक आश्चर्यच मानावे लागेल. "

२० फेब्रुवारीच्या त्या भयानक रात्रीच्या वेळी प्रत्यक्षात काय घडले असल्याची शक्यता होती ? मेजर रो नमूद करतात : " जो भयंकर प्रकार घडला होता त्याबद्दल माझ्या मनात बिलकुल संदेह नाही. वारंवार आज्ञा करूनही कान्हचंद परत जात नाही हे पाहून तिने त्याचा काटा कायमचाच काढण्याचे ठरविले. वरच्या खोलीत खाजगी जिन्याने तिने त्याला बोलाविले, नव्हे नोकरांकरवी आणविले. कौरची पुनश्च आपल्यावर मर्जी बसल्याच्या भावनेने आणि उपासमारीमुळे वखवखलेल्या ईर्षेने, कान्हचंद घटाघट दूध प्यायला असला पाहिजे. काही क्षणांतच

त्याच्या वेदना असह्य झाल्या. जिन्याने उतरून खाली परत जाण्यास तो मागे वळणार तोच सर्व दरवाजे बंद झाल्याचे त्याला आढळून आले. पोटातल्या वेदनांनी वेडा होत तो आधाराकरता ओटयाकडे (Platform) धावला. मदतीकरता तळमजल्यावरील नोकरांना त्याने आर्तपणे हाका मारल्या. यातना असह्य झाल्या-मुळे, भिंतीला धरूनही उभे राहणे अशक्य झाल्यावर, तो धाडकन जमिनीवर कोसळला आणि तासातच मेला. तो ओकलेली जागा घासून पुसून शक्य तेवढी स्वच्छ करण्यात आली. कौरने नि तिच्या नोकराणींनी कान्हचंदचा मृत देह नंतर आतल्या खोलीत नेला. वेदना मर्यादेबाहेर गेल्यावर तो ओटयाकडे धावत जाईल याची पूर्वकल्पना मात्र कोणालाच आली नाही."

## हा खूनच

१३ मे १९११ रोजी राणी कौरला मेजर रो यांनी फाशीची शिक्षा ठोठावली. पंजाब चीफ कोर्टाच्या 'केन्सिंगटन्' आणि 'रॅटीगन' या दोन न्यायमूर्तींच्या डिव्हीजन बेंचपुढे कौरच्या अपिलाची सुनावणी ३ जुलै १९११ रोजी सुरू झाली. 'आर. बी. शादीलाल' या लाहोरच्या विख्यात बॅरिस्टरने कौरचे व तिच्या नोकराणींचे वकीलपत्र घेतले. त्यांना मदतनीस म्हणून 'लाला रोशनलाल' नि 'पंडित के. संतानम्' हे दोन वकील होते. 'सर ॲलन् ब्रॉडवे' या सरकारी वकिलाने फिर्यादी–शासनाची बाजू मांडली.

२० फेब्रुवारीच्या त्या रात्री प्रासादात प्रत्यक्ष काय घडले असावे याची सुस्पष्ट कल्पना येण्याकरता, वरील दोन्ही न्यायमूर्तींपुढे, मोठ्या कलाकुसरीने तयार केलेली सबंध प्रासादाची एक लाकडी प्रतिकृती (Wooden Model) सादर करण्यात आली. हुबेहूब प्रासादच दर्शविणारी ही लाकडी प्रतिकृती, एक इंचास चार फूट, या प्रमाणात तयार करण्यात आली होती. प्रासादातील प्रत्येक मजला एकमेकांपासून एक एक तुकड्याप्रमाणे, अलग करून, प्रत्येक मजल्यावरील हरएक खोल्यांची, येरझारा घालता येणाऱ्या आतील सर्व मार्गांची नि सर्व जिन्यांची प्रत्यक्ष रचना कशी होती, हे अगदी तंतोतंतपणे या लाकडी मॉडेलमध्ये उत्कृष्टपणे दाखविले होते. वकिलांच्या विनंतीवरून दोन्ही न्यायमूर्तींनी कौरच्या प्रासादाची चोखंदळपणे प्रत्यक्ष पाहणीही केली.

दोन्ही न्यायमूर्तींपुढे, सुरुवातीलाच वर्णन केलेला, एकच अतिमहत्त्वाचा मुद्दा होता. कान्हचंदचा खून करण्यात आला, की त्याने आत्महत्या केली? या महत्त्वाच्या निकर्षावरच या दोन्ही न्यायमूर्तींचा निर्णय अवलंबून होता.

एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट या ठिकाणी लक्षात ठेवली पाहिजे की, कान्हचंदचा खून कौरने केला, यासंबंधीचा प्रत्यक्ष असा पुरावा नव्हताच. तथापि, खून शाबीत होऊ शकेल, इतका जोरकस परिस्थितिजन्य पुरावा (Circumstantial evidence), 'प्रत्यक्ष पुराव्याइतकाच' पक्का होता. कान्हचंदच्या आत्महत्येचे,

कौरच्या बचाव पक्षाने मांडलेले सर्व मुद्दे बारगळतील इतका, खून सिद्ध होणारा सबळ पुरावा होता काय ? हाच मूलभूत प्रश्न होता. " हा खून आहे की आत्महत्येचा प्रकार आहे, हे ठरविणे अशक्यप्राय आहे. " असे मत सेशन्स कोर्टातल्या ज्यूरींनी दिले होते. त्यांचे हे मत अग्राह्य ठरवून सेशन्स जज्जाने, ' हा खूनच होय, ' असे धरून कौरला फाशीची शिक्षा फर्मावली होती. या निर्णयाप्रत येण्याकरिता सेशन्स जज्जाने त्यांना पटलेली, घटनांची काही तार्किक संगतीही लावली होती. त्यांच्या या तार्किक बुद्धिवादाची व निर्णयाची चोखंदळपणे व चौफेर चिकित्सा करून वरील दोन्ही न्यायमूर्तींनी चिरफाड केली. तसेच, कौरच्या बचावार्थ तिच्या वकिलांनीही केली. सेशन्स जज्ज नेमके कुठे नि कसे चुकले, त्यांचा बुद्धिवाद कसा नि कुठे लुळा पडला, हेही दोन्ही न्यायमूर्तींनी दाखवून दिले.

## बचाव पक्षाचे मुद्दे

प्रासादाच्या लाकडी प्रतिकृतीवरून, प्रासादात वरच्या मजल्यावरून—अगदी छपरापर्यंत—विनाविलंब जाण्याकरता किमान तीन मार्ग होते आणि पूर्वी अनेक वेळा प्रासादात येऊन राहिल्यामुळे कान्हचंदला हे सर्व मार्ग चांगले माहीत होते, हे सिद्ध झाले. यांपैकी वरच्या आगाशीकडे जाणाऱ्या मुख्य जिन्यानेच तो वर गेला होता. वरच्या मजल्यावर त्याने ज्यातून प्रवेश केला तो दरवाजा, सर्वसाधारणपणे उघडाच होता. सर्व्हंट्स् गॅलरीतून न्हाणीघरात जाण्यास मार्ग होता. यांच्या शेजारच्या खोलीतूनच कान्हचंदच्या वेदनांच्या किंकाळ्या ऐकू आल्या होत्या. प्रासादातील मोठ्या पाहुण्यांच्या आलीशान खोलीत कान्हचंदाप्रमाणेच इतर कोणीही राहिला असता तरी त्यालाही सहजपणे वर जाता येणारा हा मुख्य रुंद जिना माहीत झाला असता. तथापि, वादविवादाच्या दृष्टीने हे सर्व जरी क्षणभर अमान्य केले, तरीही वरच्या मजल्यावर, ज्या खोलीत कान्हचंदला नेण्यात आले होते, तेथे जाण्यास उपरिनिर्दिष्ट मुख्य जिन्याखेरीज इतर दोन मार्गही होते. लाकडी मॉडेलमध्ये हे दोन्ही मार्ग दाखविण्यात आले होते. रात्रीच्या वेळी ज्याने वरच्या या खोलीत जाण्याचा दृढनिश्चयच केला होता, त्याला या दोनपैकी कुठल्याही एका मार्गाने सहज वर जाता आले असते !

राणी कौरच्या वकिलांनी सादर केलेले हे सर्व बुद्धिवादी मुद्दे चिकित्सकपणे विचारात घेऊन ' न्यायमूर्ती रॅटीगन् ' नमूद करतात : " कौरने किंवा तिच्या नोकराणींनीच कान्हचंदला वरच्या मजल्यावरील खोलीत त्या रात्री बोलावून घेतले, असे सिद्ध होण्यास कुठलाच पुरावा सादर करण्यात आला नाही. तसेच, कौरने किंवा तिच्या नोकराणींनीच कान्हचंदला दूध पाजले, हेही पुराव्याने सिद्ध झालेले नाही. " या व्यतिरिक्त सुंदरदासचीही साक्ष विचारात घेण्यासारखी आहे. या सुंदरदासाने सांगितले, " कौरच्या नोकराणींनी साक्ष देण्यापासून मला परावृत्त केले होते. कान्हचंदनेच मला सांगितले होते की, यापूर्वी तो (कान्हचंद) नेहमी वर जात

असलेल्या जिन्यानेच या वेळीही वरच्या खोलीत गेला होता." कान्हचंदला जाळ्यात पकडण्याच्या हेतूने काही प्रलोभन दाखविले गेले असते, तर त्यानेच कौरवर दगाबाजीने आपल्यावर विषप्रयोग केल्याचा आरोप केला असता. त्याला खरोखरच बळजबरीने वर नेऊन बळजबरीनेच विष पाजण्यात आले असते, तर त्याने प्रचंड घडपड करून, आक्रस्ताळेपणाने आरडाओरडा करून, शेजाऱ्यापाजाऱ्यांना जागे केले असते, असे समजणे चूक ठरणार नाही. निदान आपल्या या खुनी दगाबाज 'प्रेयसीला' त्याने शिव्यांची लाखोली वाहिली असती, असे समजणे अनुचित होणार नाही. आपला दगाफटक्याने जीव घेतला जात आहे, असे कळून चुकल्यावर खूप आरडाओरडा करून त्याने शेजारच्या वत्रीयनवाला गल्लीतील लोकांना जागे केले असते. हे करणे त्याला अगदी सहज सोपे होते. तसेच, प्रासादातील कौरशी एकनिष्ठ असलेल्या तिच्या सेवकांपेक्षा शेजारच्याच लोकांच्या कानांवर ही गोष्ट ओरडून घालणे नि त्यांच्याच मदतीची याचना करणे, हे कान्हचंदाच्याच दृष्टीने हितावह ठरले असते; तथापि, त्याने शेजाऱ्यापाजाऱ्यांना मदतीसाठी हाका मारल्या की, कौरच्याच नोकरांची याचना केली, हा मुद्दा नजरेआड केला तरीही, आपणास दगलबाजी करून, वर नेऊन, विष घालून मारण्यात येत आहे, असे ठामपणे कळून चुकल्यावर कौरवर तसा स्पष्ट आरोप करण्याऐवजी तो स्वस्थ बसला, ही अशक्य कोटीतील गोष्ट आहे.

## न्यायमूर्तींचे निकालपत्र

" पिवळ्या रंगाच्या आर्सेनिकच्या सात छोट्या पुड्या कौरच्या खोलीतील अलमारीत ठेवलेल्या सापडल्या नि केमिकल ॲनलायझरने त्या तपासल्या. या घटनेला सेशन्स जज्जाने (अकारण) महत्त्व दिले आहे. वस्तुतः पांढरे शुभ्र आर्सेनिकच पोटात गेल्यामुळे कान्हचंदचा मृत्यू झाला होता. पिवळ्या आर्सेनिकबरोबर पांढऱ्या आर्सेनिकच्या पुड्याही कौरने जवळ बाळगल्या होत्या–निदान तशी शक्यता होती–हे सेशन्स जज्जाने काढलेले अनुमान अपुरे नि अतर्क्य आहे. तसेच, ते मूळ मुद्द्याच्या पुष्टचर्थही नाही. कान्हचंदच्या अंगावरील कपड्यांच्या खिशामध्ये कुठल्याही आर्सेनिकचा अंशही सापडला नाही, हे सेशन्स जज्जांचे अनुमान समजण्यापलीकडचे आहे. एकतर कान्हचंदाचे सर्व खिसे नीटपणे तपासून पाहिल्याचा पुरावा नाही. तथापि, तसा पुरावा असता तरीही त्याने आपल्या खिशात आर्सेनिक बाळगले असण्याचीही शक्यता नव्हती काय ? कितीही मोठ्या प्रमाणात आर्सेनिकची पावडर त्याच्याजवळ असली तरी खिशात ठेवण्यास तिला अशी कितीशी जागा लागणार ? तेव्हा आर्सेनिकची छोटीशी पुडी त्याने जवळ ठेवली असणे सहज शक्य होते. किंबहुना हीच शक्यता अधिक होती."

दोन्ही न्यायमूर्ती शेवटी निकालपत्रात नमूद करतात : " फाशीविरुद्ध कौरने मांडलेले सर्व मुद्दे मान्य करणे भाग आहे. जेथे विषप्रयोगाच्या हत्येचा कुठलाच

ठणठणीत पुरावा उपलब्ध होऊ शकलेला नाही, तेथे कान्हचंदचा मृत्यू विषप्रयोगानेच झाला, असे धरून चालणे धाष्टर्याचे आहे. ते सत्याला, बुद्धिवादाला, न्यायाला धरून होणार नाही. फिर्यादीने मांडलेला 'विषप्रयोगा'चा मुद्दा भुईसपाट झाला आहे. फिर्यादीला विषप्रयोग संशयातीतपणे सिद्ध करता आलेला नाही. हा खूनच आहे, असे समजण्यास कुठलाही सबळ आधार नाही. आत्महत्येचीच शक्यता अधिक आहे. प्रासादात आल्यावर कान्हचंदचे कौरने जे कोरडे नि तिरस्करणीय रीतीने स्वागत केले होते, त्यावरून त्याचा संशय जागृत झाला नव्हता, हे अशक्य वाटते. आपणांस दगाबाजीने, बळजबरीने नि क्रूर पद्धतीने वर नेण्यात येत आहे नि दूध पाजण्याच्या मिषाने आपणास विष घालण्यात येत आहे, हे कळल्यावरही तो थंडच राहिला, असे समजणे बुद्धिवादास धरून होणार नाही. तसेच, आपणास मुसक्या बांधून प्रासादातून हुसकावून लावण्यात येत आहे, असे स्वच्छ दिसल्यावर त्याचा संशय जागृत व्हायला हवा होता."

८ जुलै १९११ रोजी राणी भगवान कौरची खुनाच्या आरोपातून मुक्तता करण्यात आली. ठाकरी नि रूरी या तिच्या दोन नोकराणींनाही दोषमुक्त करण्यात आले. या दोन नोकराणींबद्दल न्यायमूर्ती म्हणतात, "आमच्या मते कान्हचंदने आत्महत्याच केली. कौरला नि तिच्या दोन नोकराणींना दोषी धरता येणार नाही. 'इंडियन पीनल कोडा'च्या ३०९ कलमान्वये 'आत्महत्येचा प्रयत्न' शिक्षापात्र आहे. तथापि, 'प्रत्यक्ष आत्महत्या' शिक्षापात्र आहे, असे कुठल्याही कलमात नमूद केलेले नाही. तसे झाले तर कायद्याच्या काटेरी कक्षेत कुठलाच गुन्हेगार कधीही सापडू शकणार नाही. २०१ व्या कलमाचा गर्भित मतितार्थ इतकाच आहे की, गुन्हेगाराला शिक्षा टाळण्याकरता पाठीशी घालण्याच्या हेतूने 'गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न होता कामा नये.' कायद्याने, तो जसा आहे तसाच मूळ स्वरूपात, अपक्ष वृत्तीने, परिशीलन करणे अपरिहार्य आहे. त्यामुळे ज्याचा खून झाल्याचेच सिद्ध झालेले नाही त्या व्यक्तीचा मृत देह दडवून ठेवण्याची अथवा त्याची अन्य प्रकारे विल्हेवाट लावण्याची कृती २०१ कलमान्वये शिक्षापात्र ठरत नाही."

'खून' आणि 'आत्महत्या' या दोन्हींत एक सीमारेषा आहेच आहे आणि ती केसाइतकी सूक्ष्म असली तरी मूलभूत आहे, यात संदेह नाही. ○

[ बॅरिस्टर 'खालीद लतीफ गौबा' यांच्या "The Case of Rani Bhagwan Kaur" वरून ]



प्रा. सुधाकर राजे

## पुस्तके

# वेगळे जग

निशिकांत मिरजकर

ताज्या व रोचक अशा पंधरा इंग्रजी पुस्तकांचा परिचय श्री. सुधाकर राजे यांनी या पुस्तकात करून दिलेला आहे. 'किर्लोस्कर' मधून हे परिचय–लेख पूर्वी प्रसिद्ध झालेले आहेत. श्री. राजे यांनीच 'हृद्गता'त स्पष्ट केल्याप्रमाणे, या लेखांमागची त्यांची भूमिका लेखकाची वा टीकाकाराची नसून मुख्यत: वाचकाची आहे. या पुस्तकांची ओळख करून देताना, त्यांचे रसग्रहण करताना श्री. राजे यांनी कुठलेही वाङ्मयीन अथवा टीकाशास्त्रीय मूल्य वापरलेले नाही. एका सर्वसामान्य रसिकाला या वेगळ्या जगात जे जे काही बुद्धीला दिपविणारे, मनाला आल्हाद देणारे, चकित करणारे आढळले ते मात्र त्यांनी मार्मिकपणे या पुस्तकात ग्रथित केले आहे. त्यामुळेच केवळ संविधानकाची चमत्कृती हे त्यांच्या लेखांचे लक्ष्य झाले आहे. अर्थात ही संविधानके म्हणजे खऱ्या, घडलेल्या घटना, हकिकती आहेत. हे एक 'वेगळे जग' आहे.



विस्मय हा या कथांचा स्थायीभाव आहे. पण या विस्मयाला वेगवेगळ्या छटा आहेत, 'शेड्स' आहेत. भिन्नभिन्न पातळ्या आहेत. चित्रविचित्र झालरी आहेत. उदात्ततेपासून नि भव्यतेपासून तो बीभत्सतेपर्यंत आणि क्षुद्रतेपर्यंत वेगवेगळ्या कोनांतून हा विस्मय वेधला गेला आहे. कधी हळवा, करुण; कधी गौरवास्पद, अभिमानास्पद तर कधी संतापजनक, जुगुप्साकारक आकार त्याने धारण केला आहे. मानवी कर्तृत्वाची उत्तुंग भरारी नि मानवी आकांक्षेचे क्षितिजगामी आलोडन ? त्याने रेखले आहे; तसेच मानवातील हिडीस पशुता नि क्रूर रानटीपणा यांचाही त्याने मर्मभेद केला आहे. शास्त्राची झंझावाती प्रगती त्याने आलेखिली आहे तशीच निसर्गाची विविधांगी आणि जिवंतसुंदरता त्याने आस्वादिली आहे. मनाला गुंग करणारी रहस्ये त्याने हाताळली आहेत, तसेच मनामनांत गुंतलेले प्रेमबंधनाचे नाजूक धागेही त्याने उलगडलेले आहेत. 'वेगळ्या जगा'तील पंधराही लेखांमधून विस्मयाचे हे पैलू झगमगताना दिसतात. 'कोण म्हणतो भुते नाहीत ?' या लेखामध्ये विस्मय आणि भय यांचे प्रभावी संश्लेषण दिसते; तर 'सैतानाचे अवतार' या लेखामध्ये अंगावर काटा उभा करणारी वास्तव बिभत्सता आढळते. बिभत्सतेचे हे वर्णन स्वतः लिडबिडून न जाता मनाला कापणारे असते. कल्पनेच्याही पलीकडे संतापजनक वेगळे जग ते दाखवते.

या सर्व लेखांमधील गोष्टी ज्याविषयी आहेत, ते सारे विश्वच अनोखे आहे. श्री. सुधाकर राजे यांचे निवेदन धावत्या, ओघवत्या, उत्कंठावर्धक शैलीतून झालेले आहे. शेकोटीजवळच्या चटकदार गप्पांचा सूर आणि ऊब त्या निवेदनाला आहे. हे पुस्तकांचे परिचय आहेत असे वाटतच नाही. किंबहुना एका अर्थाने हे पुस्तकांचे परिचय नाहीतच. हे परिचय आहेत त्या पुस्तकातल्या गोष्टींचे. त्या गोष्टींमधल्या काही उत्कंठावर्धक क्षणचित्रांचे, आरोह-अवरोहांचे. त्यामुळे लेखाच्या प्रारंभापासून वाचकाचे मन गुरफटून टाकण्याची किमया लेखकाला साधलेली आहे. आपल्याबरोबर, आणि कथेबरोबर वाचकाला नकळत पुढेपुढे नेण्याचे कसब त्याने दाखविले आहे.

**वे ग ळ्या**
**ज गा त ल्या**
**वे ग ळ्या**
**न व ल क था**

'निघडी छाती' अथवा 'सोनेरी टोळींच्या मागावर' यासारख्या गतिशील कथानकांत ते विशेषच जाणवते. उत्कंठा वाढविणाऱ्या या निवेदनाला विषयातल्या नाविन्याची पार्श्वभूमी लाभल्याने त्याचा चटकदारपणा कितीतरी पटींनी वाढला आहे. 'सागर आणि साहस' यातील सागरी झुंजीची वर्णने जणू प्रत्यक्ष अनुभवाचा रोमहर्षक प्रत्यय देतात ती अशा तऱ्हेच्या विषयगर्भ व निवेदनजन्य नावीन्यचित्रांच्या संयुक्त रेखीवपणामुळेच. दुसऱ्या एका लेखात, चिंपांझीला अंतराळ प्रवासाचे शिक्षण कसे दिले जाते त्याचे लेखकाने केलेले वर्णनही असेच आहे. शास्त्रीय जादूविश्वातील या नवलकथा म्हणजे बुद्धीला दिपविणारा आणि मनाला आनंद देणारा एक जादूचा प्रयोगच असे अशा तऱ्हेच्या शैलीदार वर्णनावरून म्हणावेसे वाटते. शिवाय त्यातील नावीन्यपूर्ण विपुल सूक्ष्म शास्त्रीय माहिती चौकसपणाचेही पूर्ण समाधान करते. रसाळपणा आणि परिपूर्णता या दोन्ही दृष्टींनी ही वर्णने उल्लेखनीय आहेत. 'डबीतले प्राणिसंग्रहालय' हा लेख म्हणजे तर गमतीदार प्राण्यांनी आणि ते गोळा करणाऱ्या अजब दुकलीच्या गमतीदार स्वभावचित्रांनी दृश्यरूप,झालेले एक 'डिस्नेलँड'च आहे.

आंतरराष्ट्रीय गुन्हे शोधून काढण्याच्या संस्थेच्या आश्चर्यकारक कामगिरींची आणि प्रभावी कार्यपद्धतीची माहिती विस्मयाची आणखी एक आधुनिक रंगीबेरंगी छटा रंगवून जाते; तर 'तरंगते रहस्य' या गूढ पण सत्य हकीकतीने विस्मयचित्रातही वेगळेच वैचित्र्य येते. पण त्रिकालदर्शी माणसांच्या हकिकती सांगताना अतींद्रियता आणि वैज्ञानिकता, नवलकथा आणि शास्त्रीय सत्य यांचा जो संबंध वेळोवेळी जोडून दाखवला आहे, त्यामुळे चकित करणाऱ्या स्वप्नदर्शनाबरोबर बुद्धीलाही खाद्य मिळते. सगळया नवलाईला एक स्थिर टेकू प्राप्त होतो.

**स्वतंत्र शैली**

राजे यांच्या निवेदनशैलीच्या चटकदारपणाबद्दल मी वर सांगितले. पण या परिचय लेखाची एकंदर बांधणीच त्यांनी अशा सुघडतेने केलेली आहे, की एखादी कादंबरी उलगडत जावी तशी सुरसतेने कथा पुढे सरकत राहते. त्यात सगळे असते. प्रसंग, घटना, वातावरण, व्यक्ती– आणि सस्पेन्सही ! या बांधीव आखणीतून कल्पितापेक्षा चित्तथरारक सत्य, रहस्यकथा रंगत जातात आणि त्यातला 'सस्पेन्स' मोठ्या नाट्यपूर्ण रीतीने आविष्कृत होतो. लेखाचे स्वरूप मग 'एका पुस्तकाचा परिचय' एवढेच न उरता ती एक स्वयंपूर्ण कथा बनून जाते. स्वतःची वैशिष्ट्ये असलेली. त्यात मग कुठे वर्णनाची पार्श्वभूमी अन् बैठक जितकी कुतूहलाची नि रोमहर्षक, तितकीच ती एका आगळ्या कौटुंबिकतेचा जिव्हाळा पाझरविणारी ठरून सुरेख व्यक्तिचित्रे नि भावचित्रे निर्माण होतात ('चित्याशी दोस्ती'); कुठे सौंदर्य, साहस आणि विस्मय यांचा संयोग करणारे एका रम्य वनचरीचे पैलूदार नि जिवंत चित्रण होते ('रहस्यराणी'); तर कुठे पिशवीसकट विमानात

प्रवास करणाऱ्या सापामागून प्रसंगनिष्ठ विनोदाची हास्यचित्रे रेखाटली जातात. सिग्नलमनला अचानक पायलटच्या जागी दिसलेले विमान चालविणारे माकड, जमिनीतून हळूहळू वर येणारे भूत, भुताटकीच्या घरात सावकाश करकरत उघडणारा दरवाजा, पोलिसी कुत्र्याने लावलेला गुन्हेगारीचा तलास – असे कितीतरी प्रसंग असे आहेत की ज्यामध्ये कथाविषयक, संविधानकाची रचना आणि निवेदन-कौशल्य यांनी अविस्मरणीय त्रिमिती–चित्रे निर्माण केली आहेत.

पण वर्णनात्मक विस्मयचित्रांसारखीच महत्त्वाची चर्चास्थानेही बरीचशी आहेत हे विशेष. 'युद्ध कसे हरावे ?' यासारख्या लेखामध्ये याचा प्रत्यय येतो. एकंदर निवेदनशैलीची स्पष्टता नि सुघडता यातून व्यक्त होते. भारत-चीन युद्ध परिस्थितीचे विश्लेषण करताना अगदी मुद्देसूद विचिकित्सा लेखकाने त्या लेखात केलेली आहे. आणि शिवाय "आता या पुस्तकात सत्य कुठले आणि झिलई कुठली ?... हा नीरक्षीरविवेक प्रत्येक वाचकाने स्वतःच करायला हवा," असे सांगण्याचा मोहक सडेतोडपणाही शेवटी दाखविला आहे. आकर्षक निवेदनशैलीमुळे लेखकाने वाचकाला कथेच्या ओघाबरोबर वाहून नेले तरी तो स्वतः विवशतेने 'वाहवत गेलेला' नाही हे यावरून दिसते.

निवेदनाच्या ओघात आलेली काही काही धारदार आकृतिबंध कोरून ठेवतात–

"व्हॅरडेचे ऊर भरून आले – मुलगी सुखात होती ! "... "कहर म्हणजे प्रत्यक्ष हल्ल्याच्या वेळी चिन्यांनी भारतीय सेनाधिकाऱ्यांचे रेडिओ-संदेश 'जॅम' केले व त्याच वेव्हलेंग्थवर हिंदी, उर्दू, तामीळ इत्यादी भाषांतून परस्परविरोधी हुकूम देऊन एकच गोंधळ उडवून दिला."..." आता ती बोट एखाद्या राक्षसी प्रेताप्रमाणे इतस्ततः भटकायला मोकळी होती !"... "स्वतः नीरो बायकांचे कपडे घातलेल्या देखण्या युवकापासून प्रत्यक्ष स्वतःच्या आईपर्यंत सगळ्यांशी शय्यासोबत करीत होता !"... "सोळाव्या शतकात नोस्ट्रॅडॅम्स नावाच्या फ्रेंच भविष्यवेत्त्याने दोनशे वर्षांनी होणाऱ्या फ्रेंच राज्यक्रांतीची तारीख सांगितली होती." – अशा तऱ्हेची वात्सल्य, प्रक्षोभ, भय, जुगुप्सा, विस्मय जागृत करणारी छोटीछोटी रसचित्रे वाक्यावाक्यांत कोरलेली आहेत.

या सगळ्यामध्ये त्या त्या मूळच्या लेखकांचा वाटा आहेच. पण हे 'अनुवाद' नाहीत. 'परिचय' आहेत. या दृष्टीने श्री. राजे यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचे व शैलीचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. अविस्मरणीय अशा 'वेगळ्या जगा'ची ओळख करून देण्याचा श्री. राजे यांचा हा वेगळा उपक्रम त्या मर्यादेत यशस्वी झाला आहे यात शंका नाही. आपली भूमिका त्यांनी सुरुवातीलाच स्पष्ट करून सांगितल्याने अन्य वाङ्मयीन उणिवांचा येथे विचार करण्याचे कारण नाही.

पुस्तकाचे मुखपृष्ठ मात्र इतके अनाकर्षक आणि सामान्य का काढलेले आहे कळत नाही.

O



माझ्या जीवनात कितीतरी मुली आल्या. त्यांपैकी बऱ्याचशा प्रथमदर्शनीच माझ्याकडे आकर्षिल्या गेल्या. अगदी सहजतेने...माझं इन्द्रजालच तेवढं फसवं होतं... जादुगारापेक्षाही अधिक चतुराई मजजवळ होती. माझ्या किमयेला दुसरी तोड नव्हती. . अचानक कुणी तरी कुठं तरी भेटावं. . .संभाषणातच नकळत माझ्याकडं ओढलं जावं. .पुनर्भेटीचं आमंत्रण द्यावं. . .नि मग असंच वारंवार भेटावं. . .हलके हलके संकोच दूर व्हावा. . . नि मग अल्पस्वल्प सुखाची आपखुषीने देवाणघेवाणही व्हावी. . .बहुतेक सगळ्याच मुलींच्या बाबतीत असंच घडलं. . कित्येक फुलं माझ्या सानिध्यात सुगंधानं न्हाली, कितीतरी षोडशा माझ्या उतावीळ स्पर्शानं मोहरल्या, सुखावल्या. . .हर्षभरित अंत:करणानं, मला सर्वस्व अर्पण करण्याच्या तयारीनं बिलगल्या. . .रागरंग ओळखूनच मी वागत आलो......परिस्थितीची जाणीव ठेवूनच प्रत्येक संधीचं स्वागत केलं. . .काहींचं साधं. . .काहींचं थाटाचं. . . परंतु माझं मन फारसं कुणात रमलंच नाही. . .सुखाला लालचावलेलं शरीर थोडाबहुत काळ वेडं व्हायचं, उत्सुक असायचं पण तोचतोचपणा आला की मग तेही कंटाळून जायचं. . .दुसऱ्या दिशेला मोहरा वळवायचं. . .अर्थात मी तसं कुणाला फसवलं कधीच नाही. . .त्यामुळे कुणाचे शिव्याशापदेखील माझ्या वाटेला कधी आले नाहीत. . .पण मी कुणालाही कधीच वचनं वगैरे देत नव्हतो हेदेखील ध्यानात ठेवायला हवं. . .नि म्हणूनच कुणी माझ्याकडून फार मोठ्या अपेक्षाही करीत नसलं पाहिजे. . .बहुतेक मुलींना मी फार फार आणि खूप खूप आवडायचो. . .आता कारण विचाराल तर सहज सांगता येईल मला. . .मी श्रीमंत घराण्यातला एकुलता एक वारसदार होतो. . .श्रीमंत असूनही उपजत बुद्धीचा

लेखक : शरद बरबरे

# साक्षीदार

मी चांगला विकास केला. . .कॉलेजमध्ये मला सारे स्कॉलर समजत. . .आणि त्यांची समजूतदेखील खोटी नव्हती. . .झालंच तर मी नाटकांत कामंही करीत असे. अनेक नाटकांतून मी नायकाच्या भूमिका केल्या आणि त्या गाजल्यादेखील. . . राहता राहिलं क्रीडानैपुण्य. . .तिथेही मी चमकलो. . .एम. ए. होईपर्यंत माझं नाव बॅडमिंटनला घेतलं जात होतं. . .मिक्स्ड् डबलला माझं पार्टनर व्हायला पोरींत अहमहमिका लागत असे. . .आता सांगा. . .माझ्यासारख्या सर्व क्षेत्रांत संपन्न असणाऱ्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या गोऱ्यापान तरुणावर मुली फिदा झाल्या नसत्या, आषक झाल्या नसत्या तर मग दुसऱ्या कुणावर बरे ?. . .तेव्हा हे झालं माझ्यासंबंधानं थोडंफार माहितीवजा टिपण. . .टिपणच म्हणायचं ह्याला नाही का ?

तर सांगत काय होतो की माझ्या जीवनात कितीतरी मुली आल्या. आता बहुतेक साऱ्याच माझ्या स्मरणातून पुसल्या आहेत. . .याउलट असंही म्हणता येईल की त्याही बिचाऱ्या साऱ्या मला विसरून गेल्या असतील. . . प्राप्त सुख अल्पसं असलं ना तरी त्या समाधानात जुन्या आठवणींचं किल्मिष मनात राहातदेखील नाही माणसाच्या. . .स्वभावच असतो माणसाचा असा. . .त्यात नवल असं काहीच नाही. . . हं. . .तर मला असं सांगायचं होतं की माझ्याप्रमाणेच त्या मुलींनादेखील माझं पुरतं विस्मरण झालं असेल. . .आता माझं हे विधान थोडंसं धाडसाचंच म्हणावं लागेल. . .कारण नियम म्हटला की जसा अपवाद आला तसंच आत्मविश्वासानं एखादा अनुभव आला की तुटका धागा राहतोच अंधेमधे. . . म्हणजे असं की साऱ्याचजणी मला विसरल्या असल्या तरी एके काळी गोकुळात

नांदणाऱ्या ह्या श्रीकृष्णाची एका गोपीनं पक्की आठवण ठेवलीय. . .अगदी नात्यातल्या अन तेही निकटच्या माणसासारखी. . .नि म्हणूनच आज मला जरा नूतन, नवीन अशा चिमुकल्या विश्वात प्रवेश केल्यासारखं वाटतंय. . .पुन्हा भूतकाळात एखादी स्वैर चक्कर मारल्याचं सुख होतंय. . .

त्याचं म्हणजे असं झालं. . .आज सकाळीच मला पोस्टानं एक लग्नपत्रिका आली. . .अक्षर कुठंतरी पाहिल्यासारखं वाटू लागलं. . .स्मरणशक्तीला ताण दिला बराचसा. . .पण नक्की अंदाज काही लागेना. मग मनाशीच म्हटलं, "फुक्कट का डोक्याला शीण द्यायचा. . .प्रत्यक्ष आतच पाहू उघडून. . .मी वाचू लागलो. . .अन् झटकन एक अचानक कानी येणारी बातमी शब्दरूपानं माझ्या मेंदूत शिरली. . .वीणा रावची ती पत्रिका होती. स्वत:च्या विवाहाची पत्रिका तिनं माझी पक्की आठवण ठेवून स्वत:च्या अक्षरात पत्ता लिहून पाठविली होती. . .मी एकदा तिचं नाव वाचलं. . .भावी पतीचंही वाचलं. . .मुंबई विद्यापीठाची कुठलीशी पदवी त्याच्या नावापाशी उभी होती. . .आडव्या अंगानं . . .एकदा वाचून माझं समाधान झालं नाही. . .मग मी दुसऱ्यांदा वाचली. . . तिसऱ्यांदा वाचली. . .नि मग बराच वेळ ती निमंत्रणपत्रिका डोळ्यांसमोर धरून बसलो. . .माझ्या अर्थहीन कृतीचा असा स्वत:ला उलगडाच होईना. . . मी स्वत:लाच कोड्यात टाकलं होतं. . .अन् बराच वेळ गेल्यानंतर, विचारांचा गुंता खूपच झाल्याचं माझ्या ध्यानात आलं. . .वीणा राव ह्या कॉलेजमध्ये एके काळी वर्गात असलेल्या सामान्य पोरीच्या लग्नपत्रिकेनं खरं म्हणजे मी एवढं अस्वस्थ बनण्याचं काहीच कारण नव्हतं. . .पण तरीही मनात एका विचित्र दु:खाची सूक्ष्म कळ उठत होती आणि जणू काही वीणा रावचं लग्न ठरल्याचा विचार तीव्रतर होत जाताच तिचीही वेदना त्यासरशी वाढत होती. . .लग्न-पत्रिकेनं मी चक्रावल्यागत झालो एवढं मात्र निश्चित. . .!

वीणा ही एक सामान्य रूपाची मुलगी. . .म्हणजे अगदीच टाकाऊ नाही. . . सहज बोलायचं झालं तर बऱ्यापैकी असलेली. . .हुशार, बुद्धिमान नि विशेष म्हणजे अतिशय मितभाषी. . .तसं जर पाहू गेलं तर ह्या मुलीबद्दल मला कॉलेज-मध्ये आकर्षण असं कधी वाटलंच नाही. . .माझी वृत्तीच मुळात स्वच्छंदी भ्रमराची. . .तिथं वीणासारख्या मंद प्रकृतीच्या मुलीबद्दल मला नावीन्य वाटावं कसं म्हणा ? . . .परंतु एवढं जरी असलं ना तरी ती मात्र माझा आदर अन् सन्मानदेखील करायची. . .पण नेहमी देखणे चेहरे टिपायची नि धुंद देहाला आपलंसं करणाऱ्या माझ्यासारख्या स्वैर माणसाच्या ती खिजगणतीतही नव्हती हे मात्र स्पष्टपणे सांगून टाकतो. . .

वीणा खरं म्हणजे माझी मैत्रीण नव्हती. . .किंबहुना तिला मैत्रीण मानायला माझं मन कधीच तयार होत नसे. . .पण एवढं असूनदेखील ती मला रोज भेटे. . .

अगदी न चुकता . . . तिला माध्यमही तसंच होतं म्हणा . . . मी कॉलेजमध्ये असताना आत्याकडे राहात होतो . . . माझी आतेबहीण सुलूदेखील कॉलेजमध्येच होती . . . अन् सुलूची नि वीणाची अगदी दाट मैत्री होती . . . दुधावरल्या घट्ट सायीसारखी . . . त्यामुळं त्यांचं नेहमी एकमेकींकडे येणं-जाणं असायचं . . . एक-मेकींकडं म्हणण्यापेक्षा सुलूकडंच वीणा नेहमी यायची . . . कारणानं किंवा कारणा-शिवाय . . . मला वाटतं ती माझी उपस्थिती घरी असण्याचा समय हेरूनच येणं करायची. मघाशी मी म्हटलं होतं की आत्याच्या घरी तिची नि माझी रोज भेट व्हायची . . . पण ह्या भेटीत आम्ही एकमेकांशी बोललो मात्र कधीच नाही फारसं . . . कारण असं की मला वीणासारख्या सामान्य पोरीशी गप्पा छाटून वेळ घालवणं पसंत नसायचं . . . नि वीणा तर मूळचीच मितभाषी . . . त्यामुळं गप्पा मारण्याचा योगच फारसा यायचा नाही कधी . . .

. . . वीणा रावचे नि माझे संबंध होते ते फक्त एवढेच . . . म्हणजे मला जरी ती नको होती तरी तिला मात्र मी हवाहवासा वाटायचो एवढं मात्र खरं . . . प्राजंलपणे कबूल आहे मला . . . परंतु मला आपलेसे करण्याचे तिचे मार्ग फार भिन्न असावेत . . . कदाचित तिच्याशिवाय दुसऱ्या कुणालाही ते आठवले अथवा सुचलेदेखील नसावेत . . . शब्दानं कमी बोलणारी माणसं डोळ्यांना बोलायला शिकवीत असतात . . . वीणावरून तरी असं मी म्हणू शकेन . . . तिचे डोळे बोलके होते . . . उंची साधारण असली तरीसुद्धा नजरेत खासच भरा-यची. अर्थात नजर असणारांना हो ! . . . ( मला आता समजायला लागलं हे) . . . रूप सुरेख नसलं तरी भुरळ पाडील असं शरीर मात्र निश्चित होतं. . पूर्ण विकसित झालेल्या फुलासारखं.

पुष्कळदा माणसाचं काय होतं. एकान्त सापडला . . . हवं ते जरा दूर गेल्यासारखं वाटलं नि एरवी नको असणारं त्या वेळी जवळ असलं तर मग माणूस विचार करतो . . . " वेळ तर साजरी होतेय . . . कशाला डावलता दूर . . . " नि मग तो आहे त्याचाच भोग अथवा फायदा घ्यायला उत्सुक होतो . . .

. . . वीणाच्या बाबतीत माझ्या दृष्टीनं असंच घडलं . . . तुम्हाला आता खुल्या दिलानं सांगितलं तर आश्चर्य वाटेल. पण असं पाहा . . . माणूस वेळप्रसंगी प्रवाहपतित होतो, एवढं जसं इतरांच्या बाबतीत खरं आहे, तेवढंच किंवा त्याहूनही जास्त माझ्या बाबतीत सत्य आहे, असं मी खात्रीनं म्हणतो . . . वीणा बहुधा आमच्या घरी असायची . . . सुलूशी गप्पा मारीत अथवा अभ्यासाला कंपनी देत बसायची . . .

तिच्याविषयी ओढ नव्हती, हे मी प्रथम सांगितलंच आहे. परंतु वेळ पडली तर तिला आपल्या पाशात ओढावं, असे विचार माझ्या मनात येत नव्हते, असं नाही . . . अन् तसे प्रसंग आलेही . . . सुलू कामात गुंतलेली . . . वीणा खोलीत

अभ्यासात गर्क . . . मी खोलीत एकटाच . . . बाहेरून घरात परतलेला . . . थोड्याफार अपेक्षाभंगानं . . . वेळ उतरत्या उन्हाची . . . हळव्या क्षणांनी भारलेली . . . मग अशा वेळी माझी पावलं मांजरीसारखी वीणाकडं . . .

" काय अभ्यास चाललाय वाटतं... संध्याकाळ होत आली . . . फिरून यावं. "

वीणानं दिलेला मंद हुंकार . . .

" यंदा फर्स्ट क्लास फर्स्ट का ?" माझी मखलाशी . . .

वीणाचं उत्तर तोंडातल्या तोंडात विरघळून गेलेलं . . .

" सुलू स्वयंपाकात गंतलीय वाटतं ?" माझं सूचक बोलणं . . .

वीणानं दुर्लक्षिलेला प्रश्न निःश्वासाच्या ओझ्यानं दबलेला . . . मी जवळ सरकायचो . . . तिच्या केसांचा गंध उत्तेजित करायचा . . . ती भेदरलेली . . . बावरलेली . . . मी धाडसानं तिच्या हातांत बोटं गुंफायचो . . . कंपित झालेली तिची नाजूक बोटं . . . ओठांची मोहक थरथर . . .

" ए, बोल ना. . .सुलू येणार नाही एवढ्यात. . ." माझा तिच्या स्कंधावर वळलेला हात. . .तिच्याशी आवेगानं बोलण्याची धडपड. . .

" नको. .नको. .भलतंच काहीतरी. . मला आवडत नाही हे. .आय हेट इट्. . . रिपल्शन . .रिपल्शन वाटतं मला. . ." तिनं चिडून बोललेलं वाक्य. . .

चिडलेला मी. .भडकलेला मी. .पेटलेला मी. . भावनातिरेकानं तिला जवळ ओढायचो. .ती भिऊन ओरडायची, " सुलू, सुलू, अग मी जाते ग !. .संध्याकाळ होत आलीय. .बाबूजी रागावतील. ."

आणि मग उन्मळलेला मी...कोसळलेला मी...पराजित मी...

......असंच अधूनमधून व्हायचं......पण वीणानं कधीही सवंगपणानं वागू दिलं नाही......सुंदरता नसतानाही......रूपाचं दान नसतानाही......देखणेपण नसतानाही......तो क्षण निघून गेला की मग एरवी वीणा माझ्या दृष्टीनं सुकल्या पानासारखी......रसहीन..... निरुपयोगी......उपेक्षित......कारण माझ्या सेवेला हजर असणारी प्रभावळ......टच्चं शरीरं......नखरेल चेहरे......मजा......चैन..... जॉय......एन्जॉयमेन्ट......

......आज वीणाची पत्रिका वाचली अन् मन थोडसं दुखावलंच......उशिरा क होईना थोडंसं......पण तिचं लग्न होणार आहे......सामान्य रूपाची ही पोर...... आतापर्यंत सांभाळलेलं यौवन......जपलेलं तारुण्य......पेललेली नव्हाळी...... कौमार्याचं रूप घेऊन एकाच मूर्तीच्या चरणांशी अर्पित होणार. . .समर्पित कौमार्य . . .तृप्तीचे घोट घेऊन होणारं निर्माल्य. . .पण एकाच मूर्तीपाशी. . .

बाकीच्या मुली आल्या. . .आणि गेल्या. . .आठवण जिची आलीही नसती तीच आज नजरेसमोर उभी. . .चित्रासारखी. . .न हलता उभी. . .म्हणतेय. . . " मुकुंदा. . .माझं लग्न ठरलंय. . .उशीर झाला थोडासा. . .पण. . .तरीही

होतंय. . .मनासारखं होतंय. . ."

. . .मला आज दोन मुलं आहेत. . .तीन वर्षांपूर्वीच माझं लग्न झालंय. . . पगार भरपूर मिळतोय. . .उणीव कशाचीच नाही. . .तरीही वाटतंय. . .कुठंतरी चुकतंय. . .काहीतरी सलतंय. . .बोचतंय. . .जुन्या आयुष्यातल्या एका सामान्य पोरीचं लग्न ठरलंय. . .दरवर्षी हजारोंची लग्नं होतात. . .ज्यांच्यावर जीव होता त्यांची. . .तसेच अपरिचित मुलींचीही. . .पण वाईट कधी वाटलं नाही. . .दुःखही कधी होत नाही. . .वेदना कधी होणार नाही. . .मग आजच का? . . .वीणा रावचं लग्न ठरलं म्हणून? . . .विरोध केवढा मोठा विधानात.

वीणा रावनं शेवटची दिलेली शिकवण आठवतेय. . .असाच चिडलेला मी. . . अपॉइंटमेंट देऊनही पदरी डिस्अपॉइंटमेंट. . .हवं ते जरा त्या दिवसापुरतं अप्राप्यच. . .अन् मग घराकडं ओढलेले पाय. . .सुलू पाहुण्यांशी बाहेरच्या खोलीत गप्पाष्टकात अडकलेली. . .अभ्यासिकेत वीणा. . .कॉटवर पडलेली. . .एक उन्नत उरोज पदरभ्रष्ट झाल्यानं उन्मुक्तपणे हसणारं. . .दुसरं किंचितसं झाकलेलं . . .डोळ्यावर थोडीशी ग्लानी. . .आणि तापलेला मी. . .

. . .सरळ चाल. . .एकदम कॉटवर. . .तिच्या दंडावर टाकलेला आतुर हात. . . तिला अचानक आलेली जाग. . ."तुम्ही?" अस्फुट प्रश्न. . ."होय वीणा. . . सुलू कुठंय?". . ."प्रश्न नकोत?". . ."भलतंच काय? . . .का तुम्ही छळता मला? . . .अधून मधून कुठली लहर येते तुम्हांला? . . .लाज वाटते. . .शरम वाटते तुम्हांला झिडकारण्याची. . .टाकून बोलण्याची. . .असं कुत्र्यासारखं हाड, हाड करायची. . .जा, तुम्ही जा. . .मला जास्त बोलायला लावू नका. . ."

"पण वीणा,. . .माझं थोडं ऐकून तर घेशील? . . ." असहाय मी.

"मला माहीत आहे. तुम्ही काय सांगणार आहात ते! . . .माझं ऐकणार असाल तर एकदाच नि शेवटचं सांगते. . .हे असलं वागणं सोडून द्या. . .स्वच्छंदी वृत्ती असावी. . .पण चांगल्याचा संग्रह करण्यासाठी. . .देवानं दिलेलं दान . . .असं उधळून टाकायचं? अनुकूल आहे सारं तुम्हांला. . .पण वृत्ती स्थिर नाही तुमची. . .अन् म्हणूनच असं होतंय. . .पांडित्य पुराण नाही ऐकवीत. . . पण लक्षात ठेवा. असं उडतपगड्यासारखं वागणं बरं नाही. . .ते तुम्हांला घातक ठरेल. . .तुमचं रूप. . .बुद्धी. . .कला. . .शरीर पाहून भुलतात वेडे जीव. . .पण हे चांगलं नाही. . .शेवटी पश्चात्तापाची वेळ येईल. . .

शरीराचं वेड विलक्षण असतं. . .अन् त्यातून रूपाचं देणं मिळालं तर बोलायलाच नको. . .वेडे व्हा. . .पण एकीसाठी. . .फक्त एकीसाठी. . .सारं काही तिच्यासाठी. . .जबाबदारीची जाणीव ठेवून. . .मग प्रेमविवाह करा . . .वाटेल तसं वागा. . .स्वैरतेने. . .पण निष्ठा हवी. . .माणसाच्या आयुष्यात निष्ठा हवी. . .श्रद्धा हवी. . .भावना हवी. . .एकमेकांसाठी

सर्वस्वाचं दान करण्याची समर्पित वृत्ती हवी. . .तुम्हांला हे कुठं सापडलं नाही . . .सापडणार नाही. . .तुमचं वागणं श्रद्धाहीन आहे. . .निष्ठाशून्य आहे . . .उडतपागड्यासारखे तुम्ही वागताहात. . .मिळालेलं सोनं मातीसारखं फेकता आहात. . .श्रद्धा असूद्यात. . ."

अन् मग बदललेला आवाज, "मी हवी आहे तुम्हाला? लुटा मला. . .पण सौभाग्याचा साज चढवून! दसऱ्याचं सोनं लुटा. . .मन:पूत. आहे तयारी. . . निष्ठा बाळगायला, मन ताब्यात हवं. . .शरीर काबूत हवं. . .तुम्ही तर भर-कटलेले. . ." आणि उतरलेली माझी झिंग.

. ..वीणाचे शब्द आता आठवतात. . .नि मग घायाळ झाल्यासारखं वाटतं . . .शस्त्र दिसत नाही ... रक्त येत नाही. . .पण जखम मात्र वाहतेच आहे...

माझं आजचं जीवन. . .आज डोळे उघडून पाहतोय मी. . .फिरतीची नोकरी. . .साहेबाची जागा. . .थाट मोठा. . .सोय नेहमीच होते. . . नोकर-चाकरांनाही माहीत झालंय. . .निमूटपणे सारं होतं. . .अडचणी दूर करूनदेखील. . .जुन्या सवयी जात नाहीत. . .नवं कधी अंगी रुळत नाही . . .दृष्टीत भरलं की हवंसं वाटतं. . .घरी बायको आहे ह्याचा विसर पडतो . . .निष्ठेच्या चितेवर. . .श्रद्धेच्या आहुतीत वासनेची ज्वाला भडकते. . . पेटून पेटून शांत होते नि भानावर येतो. . ."नाति चरामि. . .नाति चरामि . . ." खोटं, साफ खोटं. . .

बायको वेळ घालविण्यासाठी महिला मंडळात जाते. . .अलीकडे तर पुरुष-वर्गात मिसळून कामं करते. . .मोलकरणी-आया मुलं सांभाळतात. . .स्वयंपाक करतात. . .बाहेरचं जग असं. . .कोण कसं. . .? कोण कसं? . . .कसं सांगायचं समजून ?. . .परपुरुषांचे धक्के. . .शेजारी मांडीला मांडी लावून बसणं. . .सायंकाळचे कार्यक्रम. . .कुणास ठाऊक. . .का बायकोलाही कळ-लंय. . .निष्ठा कुंकवाच्या धन्याजवळ नाही. . .मग कुंकूच स्वत: कसं नीट राहणार? . . .हालचालीत त्याला फराटे जाणारच. . .म्हणजे स्वत:च्या बायकोबद्दल शंका?. . .तिच्या श्रद्धेविषयी?. . .निष्ठेविषयी?. . .शक्य आहे. . .आणि नाहीदेखील. . .

. . .आणि आता उद्याची वीणा राव. . .एकाच पुरुषाच्या जीवनाशी एक-रूप झालेली. . .स्पंदनांचं मीलन. . .श्वासांचा संगम. . .परस्परास्तव सम-र्पण. . .नजरेसमोर उभी. . .वीणा राव. . .मी एकनिष्ठ राहिलेय. . . हेच माझं दैवत. . .हाच माझा देव. . .कसा का असेना. . .काळा सावळा . . .सुमार रूपाचा. . . हे मन, हे शरीर त्याच्यात विलीन होणार. . .शंका नको...

साक्ष काढायचीच झाली तर माझीच काढील ती. . .अन् मी. . .निष्ठेच्या अस्थी गोळा करणारा-साक्षीदार. ○

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ☐ ऑफिसात जाणारे गाढव

कॅज्युअल लीव्ह घेणे हा कारकुनांचा जन्मसिद्ध हक्क आहे. निदान आतापर्यंत तरी होता. पण या मानवी मूलाधिकारावर चतुष्पाद अतिक्रमण होणार आहे असे दिसते. ब्राझिलमधल्या एका गावात म्हणे असा कायदा करण्यात आला आहे, की तेथे निरनिराळ्या कामांसाठी वापरण्यात येणाऱ्या गाढवांनाही माणसांप्रमाणेच कामाचे ठराविक तास असावेत, व त्यांनाही रविवारची सुटी मिळाली पाहिजे. घ्या ! कायदा गाढव असो की नसो, तो गाढवाच्या बाजूचा आहे हे आता सिद्ध झाले. खरे म्हणजे गाढवे आणि कारकून यांच्यांतला व्यवच्छेदक फरक म्हणजे गाढवे कामसू असतात. तेव्हा त्यांनी सुटीचा कायदा करून घेण्यासाठी संप केला असेल तर गाढवे आपला स्तुत्य गाढवपणा सोडून नुसती माणसांसारखीच नव्हे तर थेट कारकुनांसाठी वागायला लागली असे म्हणावे लागेल. आणि एकदा रविवारची सुटी आली की शनिवारची अर्धी सुटी, कॅज्युअल लीव्ह, प्रिव्हिलेज लीव्ह, सिक लीव्ह, फ्रेंच लीव्ह ही सगळी कंत्राटे पाठोपाठ आलीच, नाही का ? मग एक गाढव दुसऱ्या गाढवाला म्हणेल, "काय दोस्त, आज कुंभारवाड्यात हॉकीची मॅच (म्हणजे "हॉकीऽऽ, हॉकीऽऽ, हॉकीऽऽ" ची मॅच) आहे, येणार का ऐकायला ?" दुसरे गाढव म्हणेल, "अच्छा ! मग सिकनोट पाठवून देतो....." किंवा एखादा चतुष्पाद कर्मचारी सुटीच्या अर्जात लिहील, "काल वाहिलेले दगड फारच जड असल्याने पाठीत उसण भरली आहे. सबब ऑफिसात येऊ शकत नाही." अन् "बायको बाळंतीण आहे." ही स्टँडर्ड थाप तर नळ–दमयंती आख्यानातल्या हंसानेदेखील नळ राजाला सांगितली होती, तेव्हा ऑफिसात जाणाऱ्या गाढवाला ती सुचली नाही तर तो शुद्ध गाढवपणा म्हणावा लागेल.

## ☐ कोनशिलांचा अनाथाश्रम

परवा एक केंद्रीय मंत्री लाखाची गोष्ट सांगून गेले. ते म्हणाले, आपल्या देशात कोनशिला बसविण्याची पण इमारत न बांधण्याची फॅशन इतकी बोकाळली आहे, की

अशा वाऱ्यावर सोडून दिलेल्या कोनशिलांसाठी अनाथाश्रम उघडण्याची वेळ आली आहे. कल्पना फारच मौलिक आहे. कारण आम्ही काय केले याचा तपशील पुढच्या पिढीला आमच्या इतिहासात मिळाला तरी आम्ही काय करणार होतो पण केले नाही याचा इतिहास सांगायला कोनशिलांचा अनाथाश्रमच हवा. पण मी म्हणतो कोनशिला बसविली की तेथे इमारत बांधलीच पाहिजे, असा आग्रह का असावा ? ज्याप्रमाणे माणूस स्वभावत: उत्सवप्रिय असतो त्याप्रमाणे मंत्री निसर्गत: उद्घाटन–प्रिय असतो, आणि ही त्याची नैसर्गिक भूक भागविण्यासाठीच कोनशिला समारंभाची मनोवैज्ञानिक आवश्यकता आहे. आता कोनशिला बसविलीच आहे तेव्हा तेथे इमारतही बांधू या असे कोणी म्हटले तर माझी हरकत नाही. एरव्ही " कलेसाठी कला " असते त्याप्रमाणेच कोनशिलेसाठी कोनशिला–इमारतीसाठी नव्हे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

## ☐ इन्स्टंट कॉफी राग

या जगात देवाला आणि कॉम्प्यूटरला अशक्य असे काहीच नाही. त्यामुळे कॉम्प्यूटर यंत्रांनी तयार केलेल्या संगीत–रचनांची एक आंतरराष्ट्रीय स्पर्धा होणार आहे असे परवा वर्तमानपत्रात वाचले तेव्हा मला त्याचे फारसे आश्चर्य वाटले नाही. न-काव्य करण्यापासून आंतरराष्ट्रीय धोरण ठरविण्यापर्यंत सगळ्या अवघड गोष्टी करणाऱ्या कॉम्प्यूटरांनी फावल्या वेळात स्वत:चे मन रिझविण्यासाठी संगीत–रचना केली नाही तरच नवल. आता वेरावळला तयार झालेल्या रागाला बिलावल नाव पडले याच्या पलीकडे माझ्या संगीत–ज्ञानाची मजल गेलेली नाही. त्यामुळे रविशंकर विरुद्ध कॉम्प्यूटर अशा दोन दर्दी संगीतरचनाकारांची जुगलबंदी लावली तर कोण हरेल हे आपण सांगू शकत नाही. परंतु माणसाला ज्या गोष्टीला बराच वेळ लागतो ती कॉम्प्यूटर क्षणार्धात करतो, तेव्हा मानवी संगीतातल्या कॉफी रागावर कॉम्प्यूटरच्या इन्स्टंट कॉफी रागाची वरकडी होऊ शकेल.

## ☐ ऑटोमॅटिक अंगाई

अमेरिकेत काही शास्त्रज्ञांनी एक खेळणारे यंत्र तयार केले आहे. ते म्हणे ठोकळ्यांचे घर करू शकते. अहाहा! आपल्या या यांत्रिक अपत्याच्या बाललीला पाहताना त्या शास्त्रज्ञांना किती कौतुक वाटत असेल पण या यंत्राला ठोकळ्यांशी खेळायचा कंटाळा येऊन ते रडायला लागले तर रडू थांबविण्यासाठी कोणते बटण दाबायचे ? आणि अमेरीकेत बेबी बरोबर बेबी–सिटर हवाच तेव्हा बाहेर जाताना हे शास्त्रज्ञ या बाल–यंत्रासाठी एखादा ऑटोमॅटिक बेबी–सिटर तयार करणार आहेत का ? रात्री या यंत्राला झोप लागावी म्हणून एखाद्या कॉम्प्यूटर-कवीने रचलेलेच अंगाई–गीत म्हणावे लागेल. ○

सत्तास्पर्धेत ट्रॉटस्की एकाकी पडला. स्टॅलिन विजयी झाला. एकदा क्रेमलिनची वाट चुकलेला ट्रॉटस्की क्रेमलिनला कधीच परतू शकला नाही. रशियन इतिहासातून त्याचे नाव हळूहळू पुसले जाऊ लागले, आणि स्टॅलिनची पोलादी पकड घट्ट होऊ लागली.

लेनिनचे निधन झाले आणि लेनिनपंथ जन्माला आला.

या पंथाच्या भाष्यकाराची भूमिका अर्थातच स्टॅलिनने स्वतःकडे घेतली होती. आपली प्रत्येक कृती म्हणजे लेनिन–पंथाचा एकेक आविष्कार आहे, हे सिद्ध करण्याचा त्याचा अट्टाहास सुरू झाला. लेनिनचा आपल्यावर किती प्रगाढ विश्वास

## व्होल्गा जेव्हा लाल होते

होता, याचा देखावा करण्यासाठी स्टॅलिनने नामवंत चित्रकारांना क्रेमलिनमध्ये बोलावून घेऊन लेनिनसमवेत आपण चर्चा करीत आहोत, अशी चित्रे काढून घेतली. लेनिन खुर्चीवर बसून टेबलापाशी उभ्या असलेल्या स्टॅलिनशी कानगोष्टी करीत आहे, हा देखावा रेखाटणारी चित्रे सर्व सरकारी कचेऱ्यांतून झळकू लागली. वस्तुतः लेनिन आणि स्टॅलिन यांचे एकत्र छायाचित्र क्वचितच काढण्यात आले असेल. परंतु दोघांच्या स्वतंत्र छायाचित्रांवरून एकजिनसी छायाचित्रे तयार करण्यात येऊन त्याच्या प्रती प्रत्येक वृत्तपत्रात पहिल्या पानावर नियमाने प्रसिद्ध होत होत्या. प्रारंभी स्टॅलिन आपल्याबरोबर झिनोव्हेव्ह आणि कामेनेव्ह यांचाही लेनिनचे विश्वासू सहकारी म्हणून उल्लेख करीत असे. परंतु हळूहळू प्रसिद्धीचा झोत आपल्या एकट्या-

१७ | वि. स. वाळिंबे | १७

च्याच चेहऱ्यावर पडेल, या दृष्टीने बातम्या आणि छायाचित्रे प्रसृत करण्याचे धोरण स्टॅलिनने बिनदिक्कत आरंभिले.

आपणच काय ते लेनिनचे एकमेव वारसदार आहोत, ही गोष्ट रशियन जनतेच्या मनावर बिंबविण्याची एकही संधी स्टॅलिन वाया घालवीत नव्हता.

लेनिनचे निधन झाले, त्या वेळी स्टॅलिन लोकांना फारसा माहीत नव्हता. त्यामुळे साहजिकच लेनिनच्या जागी लोकांनी स्टॅलिनला मानावे, अशी प्रतिमा जनमानसात निर्माण करण्याचे काम सोपे नव्हते. लेनिननंतर आपण त्याच्या सिंहासनावर आरूढ व्हावे, असा लेनिननेच आपल्याला आदेश दिला व त्यामुळे राज्यसूत्रे आपण आपल्या हाती घेण्याचे धाडस करीत आहोत, असा स्टॅलिनला बहाणा करायचा होता. स्टॅलिन जे सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहे, त्यापेक्षा वस्तुस्थिती अधिक वेगळी होती, हे स्टॅलिनच्या सहकाऱ्यांना ठाऊक होते. परंतु पक्षाचे सरचिटणीसपद लाभल्यापासून स्टॅलिनने प्रशासन-यंत्रणेवर आपली एवढी जबरदस्त पकड बसवायला प्रारंभ केला होता की, सहकाऱ्यांचा आवाज लोकांपर्यंत पोचू शकत नव्हता. पक्षयंत्रणा आणि राज्यसत्ता यांत कोठेही स्टॅलिनला स्थान असता कामा नये, यासाठी रुग्णशय्येवर खिळलेल्या लेनिनची सारखी तडफड चालू होती. परंतु अर्धांगवायूने दुबळा झालेला लेनिन, आपल्या इच्छेविरुद्ध स्टॅलिन सत्तासूत्रे हाती घेत आहे, हे हतबुद्ध होऊन पाहात होता, अशा वेळी आपल्याला काहीही करता येत नाही, ही खंत लेनिनच्या मनाला पोखरत असतानाच त्याचा अंत झाला.

लेनिनने आपल्या अखेरच्या दिवसांत स्टॅलिनविरुद्ध वापरण्यासाठी तीन बॉम्बगोळ तयार करून ठेवले होते. आपल्या मृत्यूनंतर या बॉम्बगोळ्यांचा स्फोट व्हावा, अशी त्याची इच्छा होती. प्रांतांच्या स्वायत्ततेचा प्रश्न आणि जॉर्जियन प्रश्न या घटनांच्या निमित्ताने स्टॅलिनची कडक निंदा करणारे दोन लेख लेनिनने आपल्या चिटणिसांकरवी लिहून ठेवले होते. परंतु हे दोन्ही लेख प्रसिद्ध झाल्यानंतर स्टॅलिनविरुद्ध जनमत तयार होऊ शकले नाही. लेनिनचे हे दोन बॉम्बगोळे वाया गेल्यामुळे स्टॅलिन बराचसा निर्धास्त झाला होता. आपले राजकीय मृत्युपत्र हा लेनिनचा तिसरा बॉम्बगोळा स्फोटक ठरण्याची शक्यता होती. स्टॅलिन हा अतिशय उर्मट माणूस असून त्याला कोणत्याही अधिकारपदावर ठेवता कामा नये, असे लेनिनने आपल्या या अंतिम आदेशपत्रात म्हटले होते. इतकेच नव्हे तर कसेही करून स्टॅलिनला सत्तास्थानापासून दूर करा, असे कळकळीचे आवाहनही या आदेशपत्रात करण्यात आले होते.

लेनिनचा हा आदेश आपल्या महत्त्वाकांक्षेच्या आड येण्याचा संभव आहे हा धोका स्टॅलिन ओळखून होता.

म्हणून लेनिनचे हे राजकीय मृत्युपत्र प्रसिद्ध होणार नाही, याची स्टॅलिनने काळजी घेतली होती. तरीदेखील लेनिनने आपल्या अंतकाळात स्टॅलिनविरोधी काहीतरी

लिहून ठेवले आहे, ही बातमी बाहेर आलेलीच होती. लेनिनने आपल्या मृत्यूच्या एक वर्ष अगोदर लिहून ठेवलेल्या या मृत्युपत्राची कुणकूण ट्रॉटस्की आणि कामेनेव्ह यांच्या कानांपर्यंत लेनिन जिवंत असतानाच गेली होती. मात्र या मृत्युपत्रात लेनिनने नेमके काय लिहून ठेवले आहे, याचा त्या वेळी कोणालाच निश्चित सुगावा लागलेला नव्हता.

लेनिनचा मृत्यू होऊन तीन महिने झाले होते. तेराव्या पक्ष–परिषदेची तयारी सुरू झाली होती. लेनिनने तयार केलेल्या बॉम्बगोळ्याचा स्फोट घडवून आणायला चांगली संधी प्राप्त झाली आहे, असे क्रुपस्कायाला वाटले. लेनिननेच तिला तसे पूर्वी सांगून ठेवले होते. ' माझ्या मृत्यूनंतर भरणाऱ्या पहिल्या पक्ष–परिषदेत माझं हे अंतिम आदेशपत्र वाचून दाखव ' हे लेनिनचे शब्द क्रुपस्कायाच्या ध्यानात होते. लेनिनने या आदेशपत्राची एक प्रत क्रुपस्कायाजवळ ठेवली होती, तीही याच उद्देशाने.

१८ मे रोजी क्रुपस्कायाने लेनिनचे सारे कागदपत्र कामेनेव्हकडे पाठवून दिले. या कागदपत्रांसोबत धाडलेल्या पत्रात ती लिहिते–' लेनिनने आपल्या आजारीपणा-तील २३ डिसेंबर ते २३ जानेवारी या कालावधीत जी टिपणे चिटणिसांकरवी उतरवून घेतली, ती मी या पत्रासोबत पाठवीत आहे. ही एकूण तेरा टिपणे आहेत यांत राष्ट्रीय स्वायत्ततेच्या प्रश्नावरील टिपणाचा समावेश नाही. कारण ते मारिआ-कडे आहे. या टिपणांतील काही टिपण अगोदरच प्रसिद्ध झाली आहेत. पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीतील काही सभासदांबाबतचे आपले मत लेनिनने ज्या टिपणांत नमूद केलेले आहे, ती टिपणे अद्याप कोठेच प्रसिद्ध झालेली नाहीत. आपल्या मृत्यू-नंतर भरणाऱ्या पक्ष–परिषदेत या टिपणांचे वाचन व्हावे, असे लेनिनने मला सांगि-तले होते. आणि म्हणूनच ती तुमच्याकड धाडण्यात येत आहेत. '

लेनिनचे स्टॅलिनसंबंधीचे मत प्रसिद्ध व्हायला हवे आहे, असे क्रुपस्कायाला तीव्रतेने वाटत होते आणि म्हणूनच लेनिनची ही टिपणे आगामी पक्ष–परिषदेत वाचली जावीत, हे तिने आपल्या पत्रात आग्रहाने सांगितले होते. क्रुपस्कायाचे पत्र आल्यानंतर कामेनेव्हने ते केंद्रीय कार्यकारिणीच्या प्रमुख सभासदांपुढे ठेवले. या बैठकीला स्टॅलिन, झिनोव्हेव्ह, कामेनेव्ह, स्मिरनोव्ह, कालिनिन आणि बुखारिन हे सहा सदस्य हजर होते. या वेळी या पत्रावर चर्चा होऊन लेनिनची टिपणे पक्ष–परिषदेपुढे ठेवावीत, असे ठरले.

परंतु एवढ्यावरच हे प्रकरण मिटणारे होते. लेनिनचे राजकीय मृत्युपत्र वाचून दाखविण्यात आल्यानंतर केंद्रीय कार्यकारिणीत दोन गट पडतील व पक्ष–परिषदेवर या मतभेदांचे अनिष्ट परिणाम होतील या सबबीखाली पक्ष–परिषदेत मांडण्यापूर्वी या टिपणांवर केंद्रीय कार्यकारिणीच्या गुप्त बैठकीत तपशीलवार चर्चा व्हावी अशी सूचना स्टॅलिनच्या पाठराख्यांमार्फत पुढे आली. त्यानुसार केंद्रीय कार्यकारिणीची

बैठक बोलावण्यात आली. या बैठकीला ट्रॉटस्की आणि राडेक हेही हजर होते. या बैठकीपूर्वी स्टॅलिनने झिनोव्हेव्हला आपल्या गटात ओढले होते.

स्टॅलिन सरचिटणीस म्हणून वावरत असला तरी त्याला ते काम झेपत नाही असे लेनिनने आपल्या या राजकीय मृत्युपत्रात म्हटले होते. केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत हे वाक्य वाचून दाखविण्यात येताच स्टॅलिनच्या इशाऱ्यानुसार झिनोव्हेव्ह बोलावयास उठला. तो म्हणाला, ' मित्रांनो, लेनिनचा प्रत्येक शब्द आपण सर्वजण पवित्र मानतो याविषयी कोणालाच संदेह नाही. लेनिनची प्रत्येक इच्छा पूर्ण करण्यासाठी झटणं हेच आपणा सर्वांचं पवित्र कर्तव्य आहे. त्यासाठी आपण प्रतिज्ञा-बद्ध आहोत. परंतु लेनिननं काही व्यक्तींबाबत जी भीती व्यक्त केली आहे ती खोटी ठरली आहे हे सांगायला मला विशेष आनंद होत आहे. मी आपले सर-चिटणीस स्टॅलिन यांच्यासंबंधी बोलत आहे. लेनिनच्या मृत्यूनंतर आपण सारेजण किती एकोप्याने कार्य करीत आहोत हे सर्वांनी पाहिलेलंच आहे. स्टॅलिनसंबंधीची लेनिनची भीती खोटी ठरली आहे याबद्दल माझ्याप्रमाणे तुम्हांलाही खचित आनंद होईल.'

कामेनेव्हनेही कमीअधिक प्रमाणात अशाच आशयाचे भाषण केले. ट्रॉटस्की काहीही बोलला नाही. परंतु आपल्या डोळ्यांदेखत स्टॉलिनला पाठीशी घालण्याचा हा जो कावा करण्यात येत आहे तो पाहून ट्रॉटस्की कमालीचा संतापला होता. या साऱ्या प्रकाराबद्दल त्याला किती संताप आणि घृणा वाटत होती याची साक्ष त्याचे डोळे देत होते. ट्रॉटस्कीने या बैठकीत कोणतेच मतप्रदर्शन केले नाही म्हणून राडेक त्याला म्हणाला, ' आता हे लोक तुझ्याविरुद्ध उचापती करणार नाहीत असे मला वाटते.'

ट्रॉटस्की एखाद्या द्रष्टयाच्या स्वरात म्हणाला, ' छे ! हे प्रकरण एवढयावर थांबणार नाही. आपल्या सर्व प्रतिस्पर्ध्यांचा निःपात केल्याशिवाय स्टॅलिन स्वस्थ बसणार नाही.'

कार्यकारिणीच्या बैठकीत लेनिनच्या मृत्युपत्रासंबंधी साधकबाधक चर्चा झाल्या-नंतर बहुमताने असे ठरले की लेनिनचे हे मृत्युपत्र कधीही प्रसिद्ध करता कामा नये. पक्ष-परिषदेला जमणाऱ्या प्रतिनिधींपैकी काही निवडक प्रतिनिधींना ते वाचून दाखविण्यात यावे. तीन वर्षांनंतर कार्यकारिणीची बैठक भरलेली असताना लेनिनचे हे राजकीय मृत्युपत्र प्रसिद्ध करण्यात आले पाहिजे, अशी झिनोव्हेव्ह आणि कामेनेव्ह यांनी मागणी केली होती. परंतु या प्रश्नासंबंधी पूर्वीच निर्णय झाला असून जुने भांडण उकरून काढण्यात काहीच अर्थ नाही असे स्टॅलिनने उत्तर दिले. तरीही झिनोव्हेव्ह आणि कामेनेव्ह यांचा आग्रह कायम होता. तेव्हा स्टॅलिन म्हणाला, ' तीन वर्षांपूर्वी भरलेल्या पक्ष—परिषदेत लेनिनचं टिपण सर्व प्रतिनिधींसमोर वाचून दाखविण्यात आलेले होते. इतकेच नव्हे तर लेनिनचा माझ्यावरचा आरोप मी

विनतक्रार मान्य करून सरचिटणीसपदाचा राजीनामा देण्याचीही तयारी दर्शविली होती. परंतु त्या वेळी ट्रॉटस्कीसह एकही सदस्य माझा राजीनामा स्वीकारायला तयार झाला नाही.' लेनिनने आपल्यावर कोणते आरोप केले होते तेही स्टॅलिनने या वेळी सांगन टाकले. पण मधल्या तीन वर्षांत परिस्थिती खूपच बदलली होती. १९२४ मध्ये ट्रॉटस्कीला गप्प करण्यासाठी झिनोव्हेव्ह आणि कामेनेव्ह यांची मदत घेणे स्टॅलिनला अपरिहार्य झाले होते. आता त्याला या दोघांच्या मदतीची बिलकुल गरज उरलेली नव्हती. ट्रॉटस्कीला निष्प्रभ करून टाकण्यासाठी झिनोव्हेव्ह आणि कामनेव्ह यांचा उपयोग करून घेतल्यानंतर त्या दोघांनाही दूर फेकून देण्याने स्टॅलिनचे बिघडण्यासारखे नव्हते. या वेळी झिनोव्हेव्ह आणि कामेनेव्ह खूप चडफडले. पण स्टॅलिनला आता त्यांची पर्वा नव्हती.

१९२४ मध्ये एकटी क्रुपस्काया स्टॅलिनविरुद्ध झुंज देत होती. लेनिनचे टिपण प्रसिद्ध करायचे नाही हा केंद्रीय कार्यकारणीच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर तिने स्टॅलिनची भेट घेतली आणि लेनिनचे मृत्युपत्र दडपून टाकण्याच्या त्याच्या कारवाईबद्दल तिने त्याची खूप निर्भर्त्सना केली. त्या वेळी क्रुपस्काया इतकी चिडली होती की स्टॅलिनला उद्देशून ती मोठ्याने म्हणाली, 'पक्ष-परिषदेमध्ये तू जर लेनिनचं राजकीय मृत्युपत्र वाचून दाखविलं नाहीस तर मी ते प्रसिद्ध करीन. लेनिनची कागदपत्रांची कायदेशीर मालकी माझ्याकडे आहे. लेनिननं मरायच्या दिवशी माझ्याकडे जी कामगिरी सोपविली ती मला पुरी केलीच पाहिजे.'

स्टॅलिन शांत होता. तुला जितके ओरडायचे असेल तितके ओरड, असाच त्याच्या चेहऱ्यावर भाव होता. 'तू काय करायचं ठरविलं आहेस,' असे जेव्हा क्रुपस्कायाने निक्षून विचारले तेव्हाही शांतपणे तो म्हणाला, 'ती टिपणं प्रसिद्ध केली जाणार नाहीत.'

पाय आपटीत क्रुपस्काया तेथून निघून गेली. त्यानंतर आतापर्यंत आवरून धरलेला स्टॅलिनचा संताप बाहेर पडला. टेबलावर मूठ आपटीत त्याने क्रुपस्कायासंबंधी नाही नाही ते उद्गार काढावयास प्रारंभ केला. मागे एकदा टेलिफोनवरून बोलताना त्याने असाच क्रुपस्कायाचा उपमर्द केला होता. या वेळेलाही तोच प्रकार घडला. फक्त फरक एवढाच होता की स्टॅलिनचे ते कुत्सित शब्द ऐकायला क्रुपस्काया तेथे हजर नव्हती. एका स्त्रीसंबंधी कोणती भाषा वापरावी याचे त्या वेळी स्टॅलिनला किंचितही भान उरलेले नव्हते.

परंतु आपली धमकी कृतीत आणण्याचा क्रुपस्कायलाही धीर झाला नाही. तिने लेनिनचे ते टिपण प्रसिद्ध केले नाही. त्यामुळे साहजिकच स्टॅलिनचा मृत्यू होईपर्यंत त्या टिपणाची फारशी वाच्यता झाली नाही. इतकेच नव्हे तर १९२६ मध्ये 'न्यूयॉर्क टाईम्स'मध्ये हे टिपण प्रसिद्ध करण्यात आले तेव्हा लेनिनचे ते टिपण संपूर्णपणे बनावट असल्याचे ट्रॉटस्कीकडून वदवून घेतले. स्वतःच्या जिवाला निर्माण झालेला

धोका टाळण्यासाठी ट्रॉटस्कीने त्या वेळी स्टॅलिनच्या बाजूने साक्ष दिली.

लेनिनचे हे राजकीय मृत्युपत्र स्टॅलिन जिवंत असेपर्यंत प्रसिद्ध होऊ शकले नसले तरी स्टॅलिनला या मृत्युपत्राचे अस्तित्व नाहीसे करता आले नाही. स्टॅलिनच्या मृत्यूनंतर तीन वर्षांनी रशियन सरकारनेच ते अधिकृत रीतीने प्रसिद्ध केले.

१९५६ मध्ये कम्युनिस्ट पक्षाची विसावी परिषद भरली असताना ख्रुश्चेव्हने स्टॅलिनवर कडाडून हल्ला चढविला. स्टॅलिनसंबंधीचे आपले मत किती अचूक आहे हे दाखवून देण्यासाठी ख्रुश्चेव्हने लेनिनच्या या राजकीय मृत्युपत्राचा पुराव्यासारखा उपयोग केला. पक्ष-परिषद आटोपल्यानंतर ३० जून १९५६ रोजी 'कम्युनिस्ट' या पत्रात लेनिनच्या राजकीय मृत्युपत्राला प्रसिद्धी देण्यात आली. यानंतर या लेखाची पुस्तिका तयार करण्यात येऊन तिच्या लक्षावधी प्रती वाटण्यात आल्या. इतकेच नव्हे तर जर्मन, फ्रेंच, इंग्रजी, स्वीडिश, पोलिश, चेक आणि चिनी भाषांमध्ये या लेखाचे अनुवाद करण्यात येऊन त्यांचा परदेशांमध्ये प्रसार करण्यात आला. मात्र या वेळेसही रशियातील साम्यवादी राजवटीने दाखविलेली चतुराई ध्यानात घेण्याजोगी आहे. स्टॅलिनच्या प्रतिमेची मोडतोड करण्यासाठी लेनिनच्या राजकीय मृत्युपत्राचा उपयोग करून घेताना लेनिनने ट्रॉटस्की, बुखारिन, कामेनेव्ह, झिनोव्हेव्ह आणि पिआटाकोव्ह यांचा जो गौरव केला होता त्यासंबंधी सोव्हिएट सरकारने मुग्धता पाळली. या सर्वांचा स्टॅलिनने खून केला होता. परंतु या राजवटीला ज्याप्रमाणे स्टॅलिनची आठवण पुसून टाकायची होती त्याचप्रमाणे ट्रॉटस्कीप्रभृतीसंबंधी गौरवाने बोलणे गैरसोईचे वाटत होते आणि म्हणून लेनिनच्या टिपणातील आपल्याला हव्या असलेल्या भागाचाच तेवढा वापर करण्यात आला. लेनिनचे राजकीय मृत्युपत्र हे दुधारी शस्त्र होते. हे मृत्युपत्र लिहिताना लेनिनने ज्याप्रमाणे स्टॅलिनवर हल्ला चढविला होता तसाच हल्ला राजकीय सत्तेचा गैरवापर करू शकणाऱ्यांवरही चढविला होता. किंबहुना स्टॅलिन सत्तेचा गैरवापर करीत आहे म्हणूनच लेनिनने त्याला सत्तेवरून दूर करण्याचे आवाहन केले होते. सत्तेचा गैरवापर करणाऱ्यांवरील लेनिनचा हल्ला जसा स्टॅलिनला नकोसा वाटत होता तसाच तो स्टॅलिननंतर आलेल्या राज्यकर्त्यांनाही मानवणारा नव्हता.

लेनिनचे राजकीय मृत्युपत्र प्रसिद्ध होत नाही अशी व्यवस्था केल्यानंतर स्टॅलिनने राज्ययंत्रणा आपल्या एकतंत्री अमलाखाली आणण्याचे कार्य वेगाने सुरू केले. लेनिनची जागतिक क्रांतीची कल्पना त्याला तत्त्वशः मान्य असली तरी ती व्यवहार्य नाही हे त्याला अल्पावधीतच उमगून आले. रशियाचा कायापालट घडवून आणणे हे आपले जीवितकार्य मानणाऱ्या या हुकूमशहाने एका देशापुरता म्हणजे रशियापुरता समाजवाद ही घोषणा केली आणि या घोषणेच्या आधारे रशियाचे झपाट्याने औद्योगीकरण करण्यास प्रारंभ केला. लेनिनच्या विचारांना परिस्थितीनुरूप निराळे रूप देण्यात आपण तत्त्वच्युती करतो आहोत असे त्याला

वाटत नव्हते. उलट लेनिनच्या मृत्यूनंतर तीन महिन्यांनी म्हणज १९२४ च्या एप्रिल मध्य स्टॅलिनने लेनिनचे तत्त्वज्ञान विशद करणारी जी व्याख्याने दिली तो 'लेनिन पंथापुढील प्रश्न' या शीर्षकाखाली ही व्याख्याने संग्रहित करण्यात आली आहेत. रशियाची क्रांतिकारी प्रवृत्ती आणि अमेरिकेची कार्यक्षमता यांचा संगम घडवून आणणे लेनिनला अभिप्रेत होते असे स्टॅलिनने या व्याख्यानांमध्ये प्रतिपादन केले. परंतु लेनिनच्या मृत्यूनंतर रशियातील क्रांतिकारी प्रवृत्तीला ओहोटी लागलेली होती. स्टॅलिन, कामेनेव्ह आणि झिनोव्हेव्ह या तिघांत लेनिनसारखी झेप घेण्याची कुवत नव्हती आणि ट्रॉटस्की एकाकी पडला होता.

लेनिनच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी भरून येणे सर्वस्वी अशक्य झाले होते.

एकाकी पडलेला ट्रॉटस्की आपल्या शक्तीनुसार लेनिनच्या क्रांतिकारी कार्यक्रमाची रशियन नेतृत्वाला आठवण करून देत होता. 'ऑक्टोबर क्रांतीची शिकवणूक' या शीर्षकाखाली लिहिलेल्या पुस्तिकेत तो म्हणतो, 'जर क्रांती करायची असेल तर ती आजच केली पाहिजे; उशीर करणे घातक ठरेल असे लेनिन नेहमी आग्रहाने सांगत असे. लेनिनच्या या शिकवणुकीचा विसर पडता कामा नये.' परंतु ट्रॉटस्कीच्या या प्रतिपादनाची सर्वांनीच उपेक्षा केली. स्टॅलिनने तर 'लेनिनला क्रांतीचा नादच होता' असे म्हणून जागतिक क्रांतीच्या कल्पनेची कुचेष्टा केली. ट्रॉटस्की लेनिनचे लाडके जागतिक कम्युनिस्ट क्रांतीचे स्वप्न रंगविण्यात दंग झाला असताना स्टॅलिनने 'एका देशापुरता समाजवाद' ही घोषणा करून राष्ट्रीय साम्यवादाचा पाया घालण्यास प्रारंभ केला.

ट्रॉटस्की संघटनाचातुर्य नसल्यामुळे एका बाजूला पडला असला तरी राज्यक्रांतीच्या वेळी त्यानेच पुढाकार घेतला असल्यामुळे त्याच्यासंबंधी लोकांच्या मनात आदराची भावना वसत होती. ट्रॉटस्कीला पक्षातून काढून टाकण्यापूर्वी त्याची ही प्रतिमा उद्ध्वस्त करणे स्टॅलिनला आवश्यक वाटले. आपणच सच्चे क्रांतिकारक आहोत अशी त्याला लोकांची समजूत घालायची होती. म्हणून तो अधूनमधून नोव्हेंबर-क्रांतीने काय घडवून आणले यासंबंधी विवेचन करीत असे आणि विवेचनाच्या ओघात तो असे स म्हणून जाई की 'ही क्रांती मी एकट्याने घडवून आणली.' १९२४ च्या नोव्हेंबरमध्ये एका सभेत बोलताना स्टॅलिन म्हणाला, 'कम्युनिस्ट पक्षाच्या उभारणीत वा नोव्हेंबर–क्रांतीमध्ये ट्रॉटस्कीचा वाटा फारच थोडा होता. आणि तसं घडणं स्वाभाविक होतं. कारण तो आमच्या पक्षात नुकताच दाखल झालेला होता.' क्रांतीच्या वेळी लेनिन अज्ञातवासात होता आणि ट्रॉटस्की नवखा होता हे सांगितल्यानंतर साहजिकच क्रांती कोणी घडवून आणली या प्रश्नाला स्टॅलिनचे उत्तर ठरलेले असायचे. लेनिनच्या मृत्यूनंतर स्टॅलिनने क्रांतीच्या इतिहासाची आपल्या सोईनुसार मोडतोड सुरू केली होती. ट्रॉटस्कीचे महत्त्व कमी

करण्यासाठी अनूनमवून तो लेनिनची प्रशंसा करी. तो म्हणायचा, ' अमक्या दिवशी क्रांती होईल याची अज्ञातवासात वावरणाऱ्या लेनिनला मुळीच कल्पना नव्हती ही गोष्ट खरी नाही. ट्रॉटस्की मात्र मूळचाच घावरट होता. ब्रेस्टलिटोव्हस्क येथे वाटाघाटी करताना त्याचा हा भित्रेपणा पुन्हा दिसून आला आणि त्याहूनही महत्त्वाची गोष्ट अशी की ट्रॉटस्कीच्या मदतीशिवाय क्रांतीनंतर उद्‌भवलेल्या यादवी युद्धाचा मीच बीमोड केला.'

लेनिनच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त दिलेल्या संदेशात स्टॅलिन म्हणतो, ' आपला नेता आणि मार्गदर्शक असलेल्या लेनिनची शिकवण ध्यानात ठेवा. देशांतील आणि देशाबाहेरील शत्रूंचा निःपात करण्याचा लेनिनचा आदेश कृतीत आणा.' ' देशान्तर्गत शत्रू ' या शब्दप्रयोगाने लेनिनला कोणाचे नाव सूचित करायचे होते हे सर्वांना माहीत होते. देशाबाहेरील शत्रूंशी मुकाबला करण्यापूर्वी अंतर्गत शत्रूंचा नायनाट केला पाहिजे असे स्टॅलिन मानत होता आणि हे कार्यही लेनिनच्या शिकवणुकीनुसारच पार पाडायचे ही खूणगाठ त्याने आपल्या मनाशी पक्की बांधली होती.

सत्ता हाती आल्यानंतर तिचा कैफ स्टॅलिनच्या बोलण्यावागण्यात सतत प्रतीत होऊ लागला. ट्रॉटस्कीसंबंधी तो अतिशय कुत्सित भाषा वापरीत असे. इतकेच नव्हे तर लेनिनचे आपणच खरे वारसदार आहोत हा दावा सिद्ध करण्यासाठी पेट्रोग्राडचे लेनिनग्राड असे नामांतर करण्यात आल्यानंतर काही दिवसांनी म्हणजे १० एप्रिल १९२५ रोजी त्याने त्सारित्सिनचे स्टॅलिनग्राड असे नामांतर करून लेनिनच्या मृत्यूनंतर वर्षासव्वावर्षाच्या आतच आपलेही स्मारक उभारले. यानंतर नामांतराचे सत्रच त्याने सुरू केले. पर्मचे मोलोटोव्ह झाले. त्वेरचे कालिनिन झाले. एकाटेरिनबर्ग स्वेर्डलोव्हस्क या नावाने ओळखले जाऊ लागले. झिनोव्हेव्हची जन्मभूमी असलेले एलिझाव्हेटग्राड झिनोव्हेव्हस्क या नावाने संबोधिले जाऊ लागले. कुबिशेव्ह, रूडझुटाक, ट्रॉटस्की, ओर्दोनिकिद या नावाची गावेही रशियातल्या नकाशात झळकू लागली. टोमस्की हाच काय तो एकमेव सदस्य असा होता की कोणत्याही गावाला आपले नाव द्यायला त्याने विरोध केला. एखादा पक्षनेता स्टॅलिनच्या मर्जीतूनच उतरला की पुन्हा त्या गावाचे नाव बदलण्यात येई. प्रारंभी गारचिना हे गाव ट्रॉटस्कीच्या नावाने ओळखण्यात येऊ लागले. परंतु चिटणीस मंडळातून त्याची हकालपट्टी होताच ट्रॉटस्की हे गारचिनाचे नाव पुसण्यात येऊन क्रास्नोआर्मेस्क हे नाव देण्यात आले. अर्थात पुढे तेही नाव राहिले नाही. स्टॅलिननंतरच्या राज्यकर्त्यांनीही स्टॅलिनचा हा वारसा कटाक्षाने सांभाळला. स्टॅलिन ख्रुश्चेव्हच्या मर्जीतून उतरताच स्टॅलिनग्राड हे व्होल्गोग्राड या नावाने संबोधण्यात येऊ लागले.

१९२५ च्या डिसेंबरमध्ये चौदावी पक्ष–परिषद भरण्यापूर्वी स्टॅलिनचे नाव फारसे प्रसिद्ध नव्हते. या परिषदेमध्ये स्टॅलिनने झिनोव्हेव्ह आणि कामेनेव्ह यांच्या धोरणावर कडाडून हल्ला चढविला. तो म्हणाला, ' एका देशापुरता समाजवाद आणि

रशियाचे औद्योगीकरण या माझ्या दोन सूत्रांवर कामेनेव्ह आणि झिनोव्हेव्ह टीका करीत आहेत. पण पर्यायी कार्यक्रम सुचविण्याच्या कार्यात त्यांना यश आलेले नाही. क्रांती कशी वळणं घेत असते याचं त्यांना ज्ञान नाही. हेच यावरून सिद्ध होतं.'

या पक्ष-परिषदेमध्ये आपले हमखास बहुमत होईल अशी स्टॅलिनने अगोदरच व्यवस्था केली होती. त्यामुळे 'एका देशापुरता समाजवाद आणि रशियाचे औद्योगीकरण' हा स्टॅलिनचा कार्यक्रम ४५९ विरुद्ध ६५ मतांनी मंजूर झाला. या परिषदेने स्टॅलिनचे नाव सर्वतोमुखी केले.

चौदाव्या पक्ष-परिषदेमध्ये अभूतपूर्व विजय संपादन केल्यानंतर आपल्या प्रतिस्पर्ध्यांना नष्ट करण्याचा स्टॅलिनला जणू अधिकारच प्राप्त झाला. आतापर्यंत त्याने जे बेत आखले होते त्यांची कार्यवाही करायला त्याला आता संकोच वाटत नव्हता. स्टॅलिनला सत्ताधिष्ठित करायला इतर कोणाहीपेक्षा झिनोव्हेव्ह उपयोगी पडला होता. त्यामुळे हुकूमशहांच्या ठराविक प्रवृत्तीनुसार स्टॅलिनने पहिल्या प्रथम त्याच्यावरच प्रहार चढविला. लेनिनग्राडमधील पक्षप्रमुख म्हणून झिनोव्हेव्ह आतापर्यंत वावरत होता. एका हुकमासरशी स्टॅलिनने त्याला त्या पदावरून बडतर्फ करून त्याच्या जागी किरोव्हची नेमणूक केली. त्यानंतर चार महिन्यांच्या आत झिनोव्हेव्हची चिटणीस मंडळातूनही हकालपट्टी करण्यात आली. त्यानंतर आणखी काही महिने गेले आणि झिनोव्हेव्हकडील थर्ड इंटरनॅशनलचे अध्यक्षपदही हिरावून घेण्यात आले. याच सुमारास कामनेव्ह आणि ट्रॉटस्की या दोघांनाही चिटणीस मंडळातून अर्धचंद्र देण्यात आला. ट्रॉटस्की, कामेनेव्ह आणि झिनोव्हेव्ह यांना निष्प्रभ करून स्टॅलिनचे समाधान झाले नाही. या तिघांच्या मित्रांनाही स्टॅलिनने अधिकारपदावरून दूर भिरकावून दिले. झिनोव्हेव्ह, कामेनेव्ह आणि ट्रॉटस्की यांच्या मोटारीही काढून घेण्यात आल्या. त्यांनी वृत्तपत्रांत लिहिता कामा नये असा फतवा निघाला. त्यांना दररोज धमक्या देण्यात देऊ लागल्या. या तिघांच्या भोवती गुप्त पोलिसांची टोळकी वावरू लागली.

ट्रॉटस्की प्रभृतींना तोंडातून शब्द उच्चारणेही अशक्य झाले. आपल्याला नको असलेल्या व्यक्तीबाबत खोटानाटा पुरावा तयार करण्यात येऊन त्या आधारे धरपकड, खटला, शिक्षा यांचे स्टॅलिनने थैमान मांडले. ट्रॉटस्की, कामेनेव्ह, झिनोव्हेव्ह प्रभृतींचे केवळ सार्वजनिक जीवनच नव्हे तर खाजगी जीवनही उद्ध्वस्त करण्यात येत होते. १९२७ च्या हिवाळ्यात स्टॅलिनने ट्रॉटस्की, कामेनेव्ह आणि झिनोव्हेव्ह यांची केंद्रीय कार्यकारिणीतून हकालपट्टी करून त्यांचे उरलेसुरले राजकीय महत्त्वही नष्ट केले.

१९२८ पासून स्टॅलिन रशियाचा एकतंत्री सत्ताधारी बनला आणि तेव्हापासून निधन होईपर्यंतच्या पंचवीस वर्षांच्या काळात त्याने रशियातील सर्व विरोधी आवाज एकामागून एक बंद करून टाकले. ट्रॉटस्कीला—लेनिनच्या विश्वासू सह-

कार्‍याला–रशियात राहणे अशक्य झाले. १९२९ च्या प्रारंभी ट्रॉटस्कीने रशियातून पलायन केले आणि देशान्तरे करीत अखेरीस मेक्सिकोचा आश्रय घेतला. परंतु एवढ्या दूरवरचे ट्रॉटस्कीचे नाममात्र अस्तित्वही स्टॅलिनला सहन झाले नाही- १९४० च्या ऑगस्टमध्ये स्टॅलिनने ट्रॉटस्कीवर मारेकरी घालून त्याला जगातून उठवले. झिनोव्हेव्ह आणि कामेनेव्ह यांच्यावर किरोव्हच्या खुनाचा आरोप ठेवून त्या दोघांना १९३६ मध्ये फासावर लटकविण्यात आले. बुखारिन, राडेक, तुखाचे. व्हस्की, रिकोव्ह प्रभृतींचीही अशीच वासलात लावण्यात आली.

स्टॅलिनने अल्पावधीतच लेनिन-पंथाचा हा असा भीषण आविष्कार घडविला होता.

(क्रमशः)

## माणूस चंद्रावर केव्हा पोचणार?

पृथ्वी–प्रदक्षिणा करणारा पहिला अमेरिकन अंतराळ–वीर जॉन ग्लेन नुकताच भारत–मार्गे जपानहून अमेरिकेला गेला, तेव्हा नव्या दिल्लीला पत्रकारांशी बोलताना त्याने असे भाकीत केले की, पुढच्या वर्षाच्या अखेरपर्यंत अमेरिका चंद्रावर माणूस उतरवू शकेल. परंतु त्यासाठी आवश्यक अशी नवीन उपकरणे तयार करण्यासाठी आणखी काही प्रयोगांची आवश्यकता आहे. मात्र चंद्र आणि पृथ्वी यांच्या दरम्यान राजरोस वाहतूक–व्यवहार करणे आणि कोणीही चंद्राचे तिकीट काढावे व जावे, अशी परिस्थिती निर्माण व्हायला अजून अवकाश आहे. मुख्य गोष्ट म्हणजे पृथ्वीपासून चंद्रापर्यंत प्रवास करणार्‍या रॉकेटसाठी एखादे नवीन इंधन शोधून काढावे लागेल. अंतराळ-प्रवासावर खर्च होणारा पैसा व्यर्थ जात नाही काय? उत्तर : नाही. पूर्वी वैज्ञानिक संशोधनावर पैसा खर्च झाला नसता तर "आपण या क्षणी गुहेत राहात असतो."

"अंतराळाची शर्यत" लागली आहे, असे म्हणण्यात येते ते मात्र खरे नाही. या "शर्यती"त कोण जिंकते, हा मुद्दा महत्त्वाचा नाही. महत्त्वाची गोष्ट आहे ती ही की, अंतराळ–संशोधनामुळे मानव-जातीला अत्यंत मोठा लाभ होणार आहे. उदाहरणार्थ, अंतराळ–संशोधनामुळे असे दिसून आले आहे की, हवामानावर नियंत्रण ठेवणे शक्य आहे.

अनुवाद
अनंत भावे

# ९

# माँटीज डबल

जेम्सला घेऊन येणारे विमान लंडनजवळच्या एका छोटया विमानतळावर उतरले. जेम्सची गरज आता संपत आली होती. ज्या विमानतळावर पूर्वी माँटी म्हणून त्याचा जयजयकार होत होता त्याच ठिकाणी आता साधे डॉक्टर त्याची उलट-सुलट तपासणी करीत होते. कस्टम अधिकारी त्याच्या हातातील पुडक्याची टिंगल करीत होते. कारण...कारण आता तो माँटी नव्हता. जेम्स होता, एक सामान्य कारकून होता. पण इंग्लंडला येण्यापूर्वी वाटेत दोन महत्त्वाच्या घटना घडल्या होत्या. आल्जिअर्स येथील शुकशत्रूशी सामना व त्याचा कैरो थील दोन दिवसांचा मुक्काम.

जनरल विल्सनच्या तळापर्यंत जेम्स 'माँटी' म्हणून मिरवत आला. सहस्रावधी लोकांनी त्याचा (?) केलेला जयजयकार त्याच्या कानांत अजून घुमत होता. प्रसिद्धीचा तळपता झोत जेम्सवर पडला होता आणि त्यात तो झगमगत होता. पण दरवाजातून तो आत शिरला आणि त्याच्याभोवतीचे प्रसिद्धीचे वलय कायमचे उडून गेले.

वर एका खोलीत जाऊन त्याने माँटीचा पोशाख उतरवला आणि पुन्हा एकदा पगारखात्यातील लेफ्टनंट क्लिफ्टन–जेम्सचा गणवेष अंगावर चढवला. माँटीचा गणवेष एका पेटीत बंद करून ठेवण्यात आला आणि त्याची किल्ली हेवुडने आपल्या ताब्यात घेतली. आणि माँटीचे दर्शन होईल म्हणून आशाळभूतपणे कित्येक लोक त्या इमारतीच्या आसपास घोटाळत

असतानाच इकडे जनरल विल्सनच्या हाताखालच्या एका कर्नलने मागच्या दरवाजाने 'माँटी'ला पळवून जवळच्या एका लहानशा बंगल्यात छपविलेदेखील होते. त्या बंगल्याचा दरवाजा बंद झाला. बंगल्यात जेम्स व तो कर्नल दोघेच राहिले.

तुम्ही एका तासापुरते जरी सुलतान झालात तरी त्या तासात सुलतानाचे उसने वैभव तुम्हांला मनमुराद उपभोगता येते. त्या वैभवाच्या नशेत तुम्ही गुंग राहू शकता. पण तासानंतर सुलतानाची सन्मान-चिन्हे उतरवून ठेवून पुन्हा बुद्रुक झाल्यावर मनःशांती टिकविण्यासाठी तुम्हाला केवढे तरी धैर्य आणि खंबीरपणा लागतो.

जिब्रॉल्टरहून माँटी म्हणून जेम्स प्रथम अल्जियर्सला आला होता तेव्हा याच कर्नलने त्याला मोठ्या आदबीने आपल्या खोलीत नेले होते. त्याच्या अद्भुत अभिनयाबद्दल पुनः पुन्हा प्रशंसोद्गार काढले होते. एखाद्या उत्साही, शाळकरी मुलासारखा वागला होता तो तेव्हा. पण आता ते नाटक संपले होते. आता तो कर्नल म्हणून जेम्सपुढे उभा होता, आणि जेम्स 'माँटी'ला विसरण्याची केविलवाणी धडपड करीत होता.

त्याने जेम्सला पुढील बेत समजावून सांगितला. कोणी एक ब्रिगेडियर जेम्सला अल्जियर्समधून गुप्तपणे हलविण्याची पुढील व्यवस्था करणार होता. तोपर्यंत जेम्सचा मुक्काम त्या बंगल्यातच राहणार होता. बंगल्याच्या बाहेर येण्याची त्याला सक्तमनाई करण्यात आली होती.

पोलिस मागावर असलेल्या गुन्हेगाराला कसे वाटत असले पाहिजे याची पुरेपूर कल्पना जेम्सला आली. स्वतःचा चेहराच त्या गुन्हेगाराचा सर्वांत मोठा शत्रू होतो. कारण त्याचे फोटो वर्तमानपत्रांतून आणि पोलिसस्टेशनांतून झळकत असतात. गॉगल लावून, दाढी वाढवून, खोट्या मलमपट्ट्या लावून तो आपला चेहरा लपविण्याचा यत्न करतो. परंतु कोणत्याही अनोळखी माणसाने सहज जरी त्याच्याकडे पाहिले तरी त्याने आपल्याला ओळखले आहे असे त्याला वाटू लागते. झोपेतसुद्धा त्याला पोलिसांची स्वप्ने पडत राहतात.

जेम्सची अवस्था तशीच झाली होती. त्याचा चेहरा जनरल माँटगोमेरीसारखा होता आणि तो दडवणे जरूर होते. त्या कल्पनेने त्याला अगदी बेजार केले. खरे म्हणजे तो पार थकला होता; पण 'माँटी' म्हणून अनुभवलेले अनेक प्रसंग, त्याला न जुमानता, त्याच्या डोळ्यांपुढे पुनः पुन्हा येत होते.

थोड्या वेळाने दरवाजा वाजला. एक सार्जंट आत आला. त्याने जेम्ससाठी काही खाण्याचे पदार्थ आणले होते. जेम्सची विकल अवस्था ओळखून त्या सार्जंटने आपण होऊन त्याला मदतीचे आश्वासन दिले.

सार्जंट निघून गेल्यावर ब्रिगेडियर हेवुड आणखी एका ब्रिगेडियरसह आत आला. या दुसऱ्या ब्रिगेडियरचे नाव होते डडले क्लार्क. 'कमांडोज' या नावाने विख्यात

असलेल्या झुंझार राखीव सैनिक दलाचा तो निर्माता होता. त्यानेच जेम्सला पुढील योजना समजावून सांगितली. या योजनेनुसार दुसऱ्याच दिवशी विमानाने जेम्सची रवानगी कैरोला करण्यात येणार होती. त्याची पुढील व्यवस्था कैरोहून आणखी कोणीतरी करणार होता. कागदपत्र अर्थात पगारखात्यातील लेफ्टनंट जेम्सच्या नावे तयार केले होते. जेम्सने बजावलेल्या कामगिरीबद्दल त्याची स्तुती करून हेवुड व डडले क्लार्क निघून गेले, आणि जेम्स पुन्हा एकटा पडला.

## तो हिरवा पोपट

जेम्सचे वास्तव्य असलेला तो बंगला मुळात दोन फ्रेंच बायकांचा होता. पण त्यांनी तो इतक्या घाईत सोडला होता, की त्यांचे कितीतरी सामान तेथेच पडले होते. त्यांनी पाळलेले दोन पोपटसुद्धा दिवाणखान्यात मागे राहिले होते. त्या पोपटां-पैकी एक हिरवा आणि दुसरा राखाडी होता. जेम्सला खाणे आणून देणाऱ्या सार्जंटने या पोपटांना फावल्या वेळात इंग्रजी शिकवण्याचा यत्न केला होता. जेम्सने वेळ घालवण्यासाठी त्यांच्याशी बोलायला सुरुवात केली.

राखाडी पोपटाशी जेम्सची थोड्याच वेळात मैत्री जमली. पण का कुणास ठाऊक, हिरव्या पोपटाने मात्र त्याच्याशी प्रथमपासून वैर धरले. त्याला कुर-वाळण्यासाठी म्हणून पुढे केलेल्या जेम्सच्या हातावर त्याने चोच मारली. हा हिरवा पोपट शब्द फार झटकन आत्मसात करीत असे. जेम्ससारख्या नाजूक परिस्थितीत सापडलेल्या, गुप्ततेचे ओझे डोक्यावर असलेल्या माणसाला यातील धोका कळायला हवा होता. तो कळला असता तर जेम्स त्या पिंजऱ्याकडे वळलाच नसता.

पण त्या दिवशी संध्याकाळी जेम्सला फार कंटाळा आला. त्याचा वेळ जाता जात नव्हता. बंगल्याबाहेर पडून मन रिझविण्याचे स्वातंत्र्य त्याला नव्हते. म्हणून दिवाणखान्यात येऊन सहज तो त्या पोपटांशी बोलू लागला. जेम्सने पुष्कळ प्रयत्न केला पण त्यांनी चोचीतून एकही इंग्रजी शब्द काढला नाही. हताश होऊन जेम्सने त्यांना शिव्या दिल्या तेव्हा हिरव्या पोपटाने प्रत्युत्तरादाखल फ्रेंचमध्ये जेम्सला उलट लाखोली वाहिली. जेम्स त्या पोपटाला आवडत नव्हता हे उघड होते.

जेम्सलासुद्धा त्या हटवादी पोपटाचा राग आला. आता पोपटावर रागावणे हे थोडे विचित्र होते हे अगदी खरे; पण इतका विचार करण्याच्या मन:स्थितीत जेम्स होता कोठे ? तो दरडावून त्या पोपटाला म्हणाला, "तू कोणाला शिव्या देतो आहेस ठाऊक आहे तुला ? – अरे मी मॉंटी आहे मॉंटी !"

पोपटाने नुसता चीत्कार केला. जेम्सने पिंजऱ्याजवळ तोंड नेऊन त्याला चिडवले,

"तुला येतंय ऐकू ? मी मॉंटी आहे मॉंटी !"

हिरवा पोपट अचानक स्तब्ध झाला. मग एकदम त्याने एक कर्कश किंचाळी मारली. तेथून काढता पाय घेण्यावाचून जेम्सला गत्यंतर नव्हते. जेम्स वळला. तो दरवाजापाशी पोहोचला असेल एवढ्यात हिरव्या पोपटाने हाक मारली –" मॉंटी !"

जेम्स दचकला. भीतीची एक लहर त्याच्या अंगातून थरारत गेली. पोपटाचे ओरडणे सार्जंटच्या कानावर जाण्यात धोका होता. कारण माँटीचा गणवेष अंगावर नसतानाही जेम्स माँटीसारखा दिसत होता ही वस्तुस्थिती लपण्यासारखी नव्हती. इतक्यात सार्जंटची पावले वाजली. जेम्स लगबगीने तेथून निघून गेला, आणि सार्जंट दिवाणखान्यातून गेल्याचे पाहताच पुन्हा परत आला.

गेले कित्येक दिवस जेम्सने आपले गुपित कसोशीने राखले होते. परिचितांजवळ आणि मित्रांजवळच काय पण आपल्या बायकोजवळसुद्धा त्याने या मोहिमेसंबंधी एक अवाक्षर काढले नव्हते. पण आज पोपटाजवळ बोलताना मात्र त्याचा तोल ढळला होता. संयम सुटला होता. याचा परिणाम फार गंभीर होण्याची शक्यता होती. जेम्सला कैदेतसुद्धा पडावे लागले असते कदाचित.

हे सारे आपल्याला चांगले समजते आहे अशा थाटात तो हिरवा पोपट जेम्स-कडे पाहात होता. जेम्सने पवित्रा बदलून त्याची समजूत काढण्याचे ठरविले. गोड बोलून तो त्याची मनधरणी करू लागला. पोपट शांत होता. जेम्सला सार्जंटने सांगितलेल्या एका गोष्टीची आठवण झाली. हा पोपट म्हणे शब्द जितक्या लवकर शिकतो तितक्याच लवकर तो विसरूनही जातो. तसे झाले तर देवच पावला, असा विचार जेम्सच्या मनात येतो आहे तोच त्या पोपटाने शीळ मारून माँटीचा घोशा करायला सुरुवात केली !

जेम्सला वाटले पिंजरा उघडून त्याला खिडकीतून सोडून द्यावे. पण लगेच त्यातला मूर्खपणा त्याच्या लक्षात आला. अल्जियर्सच्या गजबजलेल्या रस्त्यांतून माँटीच्या नावाने कोकलत तो फिरला असता तर केवढा अनर्थ कोसळला असता! तेव्हा जेम्सला आपल्या खोलीकडे परतल्यावाचून गत्यंतरच नव्हते.

काही वेळानंतर सार्जंट त्याच्या खोलीत आला. पलीकडच्या दिवाणखान्यातून 'माँटी' 'माँटी' असा शुकध्वनी आला. जेम्सने सार्जंटकडे पाहिले. सार्जंटने जेम्सकडे पाहिले आणि तो सहज म्हणाला, "शब्द फार चटकन शिकतो तो पोपट. कालच आम्ही माँटीबद्दल बोलत होतो ते ऐकलं असणार या हरामखोरानं !"

जेम्स स्तंभित होऊन त्याच्याकडे बघत राहिला. जरा वेळाने म्हणाला, "सार्जंट-साहेब त्या पोपटाला गुप्ततेची शपथ घ्यायला लावा जरा." सार्जंटने चमत्कारिक नजरेने जेम्सकडे पाहिले आणि तो निघून गेला. आपले गुपित त्याला समजले होते किंवा काय याचा नेमका पत्ता जेम्सला कधीही लागला नाही.

रात्रभर जेम्सचा डोळ्याला डोळा लागला नाही. दुपारपर्यंतचा उरलेला वेळ कसा काढावा याचे जेम्सला मोठे संकट पडले. वरच्या मजल्यावर एक खोली होती. त्या खोलीला एक सज्जा होता. जेम्स त्या सज्जात जाऊन भोवतालचा देखावा पाहात बसला. पण अकरा वाजता ब्रिगेडियर डडले क्लार्क त्याच्या खोलीत आला. त्याने विचारले, "जेम्स, आता तू सज्जात होतास का थोडा वेळ ?"

" होय साहेब. "

" पण मी तुला बाहेर येऊ नको म्हणून बजावलं होतं ना? मग? बरं पण पुन्हा तशी चूक करू नकोस. कोणी तुला पाहिलं तर आजवरची तुझी बहुमोल कामगिरी धुळीला मिळेल. "

अशी काळजी घेण्याचे कारण असे होते की, त्या बंगल्यात वेळोवेळी बड्या माणसांच्या निवासाची व्यवस्था केली जाते हे एक उघडे गुपित होते. त्यामुळे त्याच्यावर शत्रूच्या गुप्तहेरांची नजर असे. मॉंटीसारखा दिसणारा पण निश्चितपणे मॉंटी नसलेला कोणी त्यांच्या दृष्टीला पडला असता तर तोतयाच्या कारस्थानाचा इमला कोसळला असता.

डडले क्लार्कने जेम्सला त्याचे कागदपत्र आणि कैरोपर्यंत विमानप्रवास करण्याचा सैनिकी पास दिला. कैरो हे शहर मुद्दामच निवडले असावे. त्या गजबजलेल्या शहरात जेम्सकडे कोणाचे लक्ष जाणे संभवनीय नव्हते. कैरोमध्ये त्याला कोण भेटेल, त्याची पुढील व्यवस्था कशी होईल यासंबंधी एक अक्षरही त्याला कळविण्यात आले नाही. पण गुप्तहेर खात्याचा हा खाक्या जेम्सला आता चांगलाच परिचित झाला होता.

ते बोलत असतानाच हेवुड आला. त्याने शुभेच्छा व्यक्त केल्या आणि जेम्सचा निरोप घेतला. गेले काही दिवस हेवुड बरोबर असण्याची जेम्सला सवय झाली होती. त्यामुळे तो निघून गेल्यावर जेम्सला आपला आधार तुटल्यासारखे झाले.

तीन वाजता बंगल्याबाहेर एक अमेरिकी मोटार उभी राहिली. एक सशस्त्र मेजर खाली उतरून बंगल्यात शिरला.

" आपण लेफ्टनंट जेम्स काय?" त्याने जेम्सला विचारले.

" होय. मीच जेम्स. "

तो मेजर हलक्या सुरात म्हणाला, " मी मोटारीचा दरवाजा उघडतो. तू एका झटक्यात आत बैस. बंगल्याबाहेर पडताना मान खाली घाल आणि रुमालाने नाक पुसत राहा. समजलं ? "

काही क्षणांतच, आपले सामान घेऊन जेम्सने मोटारीत उडी मारली. दरवाजा बंद झाला. मेजर ड्रायव्हरशेजारी बसला. मोटार चालू झाली.

मोटार अल्जियर्सच्या विमानतळावर पोहोचली. जेम्स खाली उतरला. मेजरने त्याचा निरोप घेतला. मेझॉं ब्लॉंशेचा हा विमानतळ अमेरिकेच्या ताब्यात होता. ब्रिटिश वातावरणापेक्षा ते वातावरण वेगळे होते. परंतु जेम्स त्याला सरावलेला होता.

कोठून तरी एक तरुण कॅप्टन आला आणि त्याने एक बंद पाकीट जेम्सच्या हातात दिले. अगदी सर्वस्वी अपरिचित माणूस कोठून तरी उपटणे आणि त्याने गूढ

पत्र देणे वा तोंडी निरोप सांगणे हे या धाडसी मोहिमेत सारखेच घडत होते. जेम्सने पाकीट उघडले. ब्रिगेडियर हेवुडने दूरदृष्टीने जेम्सला थोडे पैसे पाठविले होते.

थोड्याच वेळात जेम्स विमानात चढला. विमानातील इतर प्रवाशांकडे जेम्सचे फारसे लक्ष गेले नाही. तो आपल्याच विचारात मग्न होता. प्रत्यक्ष कामगिरीवर असताना, ही कामगिरी संपली म्हणजे आपल्याला कसे आरामात स्वस्थ राहता येईल याचे रम्य चित्र जेम्स रेखाटीत असे. आता त्याची कामगिरी जवळजवळ संपल्यातच जमा होती. तरी त्याच्या मनाला स्वस्थता नव्हती. शत्रू चाणाक्ष असेल तर कदाचित अजूनही त्याची आपल्यावर पाळत असेल, कैरोला पोहोचल्यावर बहुधा शत्रूचे हस्तकच आपले स्वागत करतील, अशा कल्पना जेम्सच्या डोक्यात खेळत होत्या. गुप्ततेचे ओझे माणसाची कशी केविलवाणी अवस्था करते याचा प्रत्यय जेम्सला आला.

रात्री साडेदहाला विमान कैरोला पोहोचले. कागदपत्र दाखवून जेम्स बाहेर पडला आणि आपल्याला भेटायला येणाऱ्या अज्ञात इसमाची प्रतीक्षा करीत बसला. कितीतरी वेळ गेला, पण कोणीच आले नाही. विमानतळावर आता सामसूम झाली होती. तेथील दोन पोलिस जेम्सकडे संशयाने पाहू लागले होते. जेम्स बिचारा चुळबुळत बसून राहिला होता. कैरोची त्याला काहीही माहिती नव्हती. आणि बाहेर पडल्यावर कोणी कादगपत्र मागितले म्हणजे ? 'विशिष्ट पगारकाम' हे त्याच्या कामाचे स्वरूप निश्चित संशयास्पद होते. बरे एखादी कथा त्याने जुळवून सांगितली असती तर तिच्या खऱ्याखोट्याची शहानिशा व्हायला वेळ लागला नसता.

आणखी पंधरा मिनिटे कोणी आले नाही तर सरळ जवळच्या वाय्. एम्. सी. ए. च्या (यंग मेन्स ख्रिश्चन असोसिएशन) कार्यालयाचा पत्ता विचारायचा आणि तेथे सोय लावायची, असे जेम्सने ठरवले. पंधरा मिनिटे गेली. जेम्स निग्रहाने उठला. इतक्यात एक देखणा मेजर त्याच्याच दिशेने आला आणि हात पुढे करत म्हणाला, "हॅलो, तूच जेम्स ना ?... मला माफ कर. फार उशीर झाला मला. पण अल्जियर्समधून तुझ्या येण्याची वार्ता आम्हाला आता एक तासापूर्वीच मिळाली..... तू फार दमला असशील प्रवासानं. आपण मस्तपैकी जेवू आता." असे म्हणून त्याने जेम्सचे सामान उचलले. सामान उचलणारा मेजर आणि त्याच्या शेजारून चाललेला ओढलेल्या चेहऱ्याचा, पगारखात्यातील एक लेफ्टनंट ही जोडगोळी मोठी विनोदी दिसली असली पाहिजे. जेम्सला साहजिकच सैन्यात अवतरलेल्या लोकशाही तत्त्वांवर टीका करणाऱ्या एका व्यंग्यचित्राची आठवण झाली : व्यंग्यचित्रात एक जनरल बंद पडलेल्या मोटारीखाली उताणा पडून ती दुरुस्त करण्याचा यत्न करीत होता आणि जवळच मोटारचा ड्रायव्हर आरामात सिगारेट फुंकीत उभा होता !

मोटारीत बसल्यावर मेजरने आपली ओळख करून दिली. त्याचे नाव टेरेन्स

केन्यॉन असे होते. कैरोला खास कामासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांची व्यवस्था लावण्याचे काम त्याच्यावर सोपवलेले होते. जेम्सच्या निवासाची व्यवस्था तर त्याने आपला पाहुणा म्हणून स्वतःच्या फ्लॅटवरच केली होती.

टेरेन्स केन्यॉन मोठा समजूतदार असामी होता. कसलाही प्रश्न विचारून त्याने जेम्सला अडचणीत टाकले नाही. जेम्सच्या राहण्या-जेवणाची त्याने उत्तम व्यवस्था ठेवली. यथाशक्ती त्याचे मनोरंजनसुद्धा केले.

पण एकदोन दिवसातच जेम्सला कैरोचा कंटाळा आला. घरची आठवण आता त्याला तीव्रतेने होऊ लागली. पण हुकूम मिळाल्याशिवाय हलण्याचे स्वातंत्र्य त्याला नव्हते.

एका रात्री त्याचा दात भयानक दुखू लागला. त्याने टेरेन्सला सांगितले. टेरेन्सने त्याला सैनिकी दंतवैद्याकडे पाठविले. तिकडे जाताना अकस्मात जेम्सला पूर्वीची लिसेस्टरमधील दात उपटण्याची कथा आठवली. गॅसच्या अंमलाखाली तेव्हा त्याने गुप्त गोष्टींचा घडाघड पाढा वाचला होता. त्याचीच पुनरावृत्ती याही वेळी झाली तर? जेम्सला दरदरून घाम सुटला. दंतवैद्याकडे न जाता तो तसाच परत फिरला. पण दात दुखायचा थांबेना. तेव्हा त्याला दंतवैद्याकडे जाणे भाग पडले. जेम्स त्यांच्याकडे गेला तेव्हा त्यांचे काही काम चालले होते. म्हणून जेम्स प्रतीक्षालयात काही मासिके चाळत बसला. मनावर पडलेले तोतयाच्या कारस्थानाचे दडपण विसरण्याचा तो प्रयत्न करीत होता.

जेम्सचा दात काढायला तब्बल वीस मिनिटे लागली. शुद्धीवर आल्यावर जेम्सच्या लक्षात आले की दंतवैद्य त्याच्याकडे फार चमत्कारिक नजरेने पाहात आहेत. तो घाबरला. त्याने घाईघाईने दंतवैद्यांना विचारले, "डॉक्टर, गुंगीत असताना मी काही बोलत होतो काय हो?"

"सारखाच बोलत होतास तू. व्याख्यानच चाललं होतं म्हणेनास तुझं."

"व्याख्यान? अरे बापरे! कोणत्या विषयावर?"

"सहा आठवड्यांत छाती भरदार कशी करावी, या विषयावर!"

म्हणजे दंतवैद्यांच्या प्रतीक्षालयात वाचलेल्या मासिकातील व्यायामविषयक एक लेखच गुंगीमध्ये जेम्सच्या तोंडून पुन्हा सशब्द झाला होता!!

कैरो शहरात पगारखात्याची एक मोठी शाखा होती. तेथे जेम्सला ओळखणारी काही माणसे असण्याचा संभव दृष्टिआड करता येण्यासारखा नव्हता. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणे जेम्स कटाक्षाने टाळत असे. मग तो नाईल नदीच्या काठी असलेल्या निर्जन बागांतून वेळ काढीत असे. एके दिवशी मात्र घेझिरा क्लबमध्ये जेम्स व टेरेन्स जेवायला गेले आणि एक विकट प्रसंग ओढवला. जेवण संपवून ते कॉफी पीत असता एकदम एक माणूस पुढे येऊन म्हणाला, "हॅलो जेम्स, तू इकडे कसा काय आलास?"

तोंड फिरवून जेम्सने त्याला टाळण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा काही उपयोग होण्यासारखा नव्हता. तो माणूस भलताच चिकट होता. लिसेस्टरलासुद्धा जेम्स त्याला नेहमी टाळायचा, पण आता त्याने तोच प्रश्न ठासून विचारला. त्यामुळे जम्सला प्रत्युत्तरादाखल काहीतरी बोलणे भागच पडले.

"आलो असाच–"

"मग लंडनची काय वार्ता ? तुझे नाटचप्रयोग वगैरे चालू आहेत की नाही ?"

"माफ कर मित्रा. पण कालच माझा एक दात काढलाय. त्यामुळं बोलण्याचा त्रास होतोय मला."

पण त्या 'मित्रा'ला वाटले की जेम्स थट्टाच करतोय. त्याने शेजारी बसकण मारली. आता मात्र टेरेन्सला राहवले नाही. टेरेन्सने त्याला निग्रहपूर्वक सांगितले की दात उपटताना जेम्सच्या तोंडाला जखम झाली आहे, त्यामुळे त्याला बोलायला लावू नये. त्यानंतर नाइलाजाने त्या मित्राने तेथून काढता पाय घेतला.

तेव्हापासून जेम्सने कानाला खडा लावला. पुन्हा म्हणून त्या क्लबकडे तो वळला नाही. पण त्रासाची गोष्ट अशी होती की कोठेही गेले तरी त्याला ओळखणारी माणसे भेटण्याची भीती होती. कारण लिसेस्टरचे पगारखाते हे सर्वांत मोठे व मध्यवर्ती पगारखाते होते आणि ठिकठिकाणी असलेल्या उपशाखांतून काम करू लागण्यापूर्वी कित्येकांनी सुरुवातीला लिसेस्टर येथे उमेदवारी केलेली होती. शिवाय कोणाला कसलीही सूचना न देता एका सुप्रभाती जेम्स अचानक अंतर्धान पावला होता. त्यामुळे त्याच्याबद्दल सगळ्यांना कुतूहल वाटणे साहजिक होते. वस्तुस्थिती अशीच होती की लिसेस्टरमध्ये जेम्स हा सर्वांचा चर्चाविषय झाला होता.

एके दिवशी शेफर्डस हॉटेलमध्ये जेम्स टेरेन्सची प्रतीक्षा करीत बसला होता. इतक्यात हॉटेलचा मॅनेजर त्याच्याजवळून घाईघाईने गेला आणि सूचनाफलकावर त्याने एक भलेमोठे बातमीपत्र लावले. लोकांनी लगेच त्यासमोर गर्दी केली. बातमीपत्रात पुढील मजकूर होता : 'डी–दिनाच्या मोहिमेला सुरुवात–दोस्तांची जोरदार मुसंडी–शत्रुसैन्याची पीछेहाट.'

बातमी वाचताच लोकांच्या उत्साहाला उधाण आले. प्रचंड कल्लोळ करून त्यांनी बातमीचे हार्दिक स्वागत केले. त्यांच्या मनावरचे केवढे तरी दडपण उचलले गेले होते.

जेम्स गर्दीपासून थोडा बाजूला झाला. त्याच्या मनात आनंद मावत नव्हता. या मोहिमेच्या यशाला आपले परिश्रम किती कारणीभूत झाले असतील, याचा विचार त्याच्या मनात आला. युद्ध संपेपर्यंत त्यासंबंधी त्याला काहीच कळले नाही. युद्धानंतर मात्र, आपल्या तोतयागिरीने शत्रू कसा फसला, रोमेलच्या चिलखती गाड्यांच्या पलटणी दूर नेल्यामुळे प्रतिकार क्षीण कसा झाला, याची रोमांचकारी कहाणी त्याला समजली.

सुमारे पंधरा दिवस लोटले. एके दिवशी टेरेन्स म्हणाला, " जेम्स, तुझी इंग्लंडला जाण्याची व्यवस्था करण्याचा हुकूम आला आहे, त्याप्रमाण तुझे कागदपत्रसुद्धा तयार झाले आहेत. "

त्यांचे हे बोलणे चालले असतानाच एक स्त्री–अधिकारी तेथे आली. इंग्लंडमध्ये कोणाला तरी तिला एक खोके पाठवावयाचे होते. जेम्स ते नेईल काय असे ती विचारीत होती. जेम्सने रुकार दिल्यानंतर तिने बिस्किटांच्या पुड्यासारखा एक पुडा जेम्सच्या हातात ठेवीत म्हटले, " ज्याला हे द्यायचं आहे त्याचा पत्ता वर लिहिलेला नाही. इंग्लंडला पोचल्यावर वरचा कागद फाडा. मग आत लिहिलेला पत्ता दिसेल तुम्हाला. त्या पत्त्यावर पोचवायचंय हे पुडकं. "

जेम्सने कसलेही प्रश्न विचारले नाहीत. गुप्त कामगिरीचाच हा एक भाग असावा असे त्याला वाटले आणि गुप्ततेचे सारे संकेत त्याला माहीत झाले होते. त्याने ते पुडके ताब्यात घेतले.

" ते पुडकं फार फार महत्त्वाचं आहे, आणि प्राणपणानं त्याचा तुम्हाला सांभाळ करावा लागेल. कराल ना ?"

होकार देण्यावाचून जेम्सला गत्यंतरच नव्हते.

संध्याकाळी व्यथित अंतःकरणाने जेम्सने टेरेन्सचा निरोप घेतला. कैरोमधील

[ पृष्ठ ६१ वर ]

काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे

अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

के. टी. डोंगरे ॲण्ड कं., प्रा. लि.,

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

डोंगरे बालामृताचे

# शांतता



सतीष दुभाषी । सौ. सुलभा देशपांडे ।

तेंडुलकरांचे नवे नाटक हा मराठी नाट्यरसिकांच्या दृष्टीने नेहमीच एक कुतुहलाचा विषय असतो. नाटककाराने कुठलातरी सामाजिक पोटतिडकीचा विषय हाताळलेला असणार हे आता सवयीने सर्वांना माहीत झालेले आहे. व्यावसायिक तडजोडीची तमा न बाळगता तेंडुलकर आपली नाट्यवस्तू शक्यतितक्या सच्च्या स्वरूपात जिद्दीने मांडतील याविषयीही प्रेक्षकांच्या मनात फारशी शंका नसते.

**शं. गो. साठे**

प्रेक्षकांचे हे सर्व अंदाज बिनचूक आहेत हेच त्यांच्या 'शांतता ! कोर्ट चालू आहे' या नव्या नाटकाने पुन्हा एकदा पटवून दिले आहे. अभिरूप न्यायालयाचा अडीच तासांचा खेळ मांडून त्यात, एका सुशिक्षित कुमारिकेची ससेहोलपट होत असता,

आजूबाजूचे बघे लोक गंमत म्हणून स्वत:ची करमणूक कशी करून घेतात याचे विदारक चित्र नाटककाराने रेखाटले आहे.

लेखनदृष्टया तेंडुलकरांचे हे नाटक एकसंध आहे; म्हणजे पहिल्या अंकाचा पडदा उघडल्यापासून नाटकातील घटना सुरू होते ती, शेवटचा पडदा पडेपर्यंत अखंड चालू राहते. नाटकाचे तीन अंक पाडून ' रंगायन 'ने प्रेक्षकांची मध्यंतरातली चहापाण्याची सोय पाहिली असावी. आधीच्या अंकातला शेवटचा धागा पुढच्या अंकाच्या सुरुवातीला पुन्हा पकडून, नाटयवस्तूचा अविच्छिन्नपणा कायम राखण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही एका सलग वस्तूचे तीन तुकडे पाडल्यामुळे, वाहता ओघ मधेच बांध टाकून अडवल्यासारखे वाटते. ' रंगायन 'सारख्या प्रयोगशील संस्थेने या नाटकाचा एकअंकी, अत्रुटीत प्रयोग एकदा करून पाहावा असे सुचवावेसे वाटते.

या नाटकात दोन प्रवाह आहेत. एक वरवरचा संथ खेळकर प्रवाह आणि दुसरा गुदमरलेल्या भावनांचा, भिन्न प्रवृत्तीच्या संघर्षातून निघणाऱ्या कल्लोळाचा. यापैकी कुठल्यातरी एका टोकावर स्थिर पाय रोवून मधूनच दुसऱ्या टोकाच्या दिशेने झुकल्यासारखे दाखवून पुन्हा मुक्कामाच्या ठिकाणी यावयाचे – ही कसरत अवघड असली तरी पुष्कळ नाटकांतून ती आढळते. परंतु, परस्पर विरुद्ध टोकांकडे सतत हेलकावे घेत राहायचे आणि तरीही नाटयवस्तूचा समतोल ढळू द्यावयाचा नाही ही गोष्ट सोपी नव्हे. या नाटकातली पात्रे एक खेळ सुरू करतात, क्षणभर खेळ विसरला जातो – ओरबाडलेल्या व्यथेची जखम वाहू लागते तोच पुन्हा, ' हा खेळ आहे ' याची जाणीवपूर्वक आठवण ठेवून पात्रे पुन्हा हसू लागतात, वरवरचे बोलू लागतात. दोन टोकांमधले हे हेलकावे तेंडुलकरांच्या लेखणीने समर्थपणे पेलले आहेत; नाटकाची आकृती गतिमान आणि डौलदार होण्यास त्यामुळे मदतच झाली आहे.

खटल्यातील साक्षीपुराव्याचा पसारा मांडून तेंडुलकरांना जे सांगावयाचे तेही चिंतनीय आहे. समाजातील बहुसंख्य व्यक्ती सामान्य, खुज्या असतात, तरीही, एखादे सावज कोंडीत सापडलेले आढळले की, संस्कृतिसंरक्षण, सामाजिक नीति-मूल्यांचे जतन या नावाखाली, प्रत्येकजण स्वत:कडे न्यायाधीशाची भूमिका घेऊन, दुसऱ्याला शिक्षा फर्मावण्यात कसा आसुरी आनंद मानतो हे तेंडुलकरांनी आपल्या नेहमीच्या उपरोधिक, धारदार संवादांनी दाखविले आहे. दुसऱ्याच्या व्रणावर टोच मारण्यासाठीच माणसाची प्रवृत्ती, विवेकाला न जुमानता मधूनच उफाळून येते. न्यायाधीशाची पांघरलेली झूल भिरकावून देऊन, काशीकर, ' माझी साक्ष काढा ' अशी वकिलाला अधीरपणे गळ घालतात. हा ' टच् ' अतिशय बोलका आहे. दाराची कडी आपोआप लागते, हे नाटकाच्या सुरुवातीलाच दाखवणे, पहिल्या अंकातील

पोंक्षे–कर्णिक यांचे लीला बेणारेबद्दलचे सूचक उद्गार वगैरे – पुढील घटनेस पूरक असे बारीकसारीक दुवे आधीपासून हेतुपूर्वक पेरले आहेत. पिक टाकण्यास वेळ किती लागतो याची चर्चा, काशीकर दाम्पत्यामधील चकमकी अशासारख्या बारक्या प्रसंगामुळे नाटकातील खेळकर वातावरण टिकून राहते. कोर्टात फारसे काम नसलेला सुखात्मे वकील, लुटुपुटीची का होईना, एक केस हाती सापडताच, त्यामागील 'खेळ' विसरून ती हिरिरीने लढवितो – त्यामुळे नाटक अपरिहार्यपणे शेवटच्या उत्कर्षबिंदूपर्यंत खेचले जाते.

## वैशिष्टयपूर्ण नाटक

लीला बेणारे आपली व्यथा इतर पात्रांसमोर व्यक्त करू शकत नाही; त्यामुळे न्यायाधीशाने तिला कैफियत मांडण्यासाठी दिलेल्या वेळात ती स्वतः गप्प राहते; तिची व्यथा प्रेक्षकांसमोर बोलकी होते – या दृष्टीने तिचे शेवटचे 'स्वगत' चपखल बसले आहे. पण तिचे सर्व म्हणणे ऐकून घेतल्यावरही असे वाटत राहते की, एखाद्या ऑफिसात कारकून किंवा इस्पितळात नर्स अशासारखी तिची नोकरी असती तर तिची समस्या तिच्यापुरतीच मर्यादित राहिली असती; परंतु नव्या, संस्कारक्षम पिढीसमोर 'शिक्षिका' या नात्याने ती वावरते असे नाटककाराने दाखविल्यावर, तिच्या आचार–स्वातंत्र्यावर काही मर्यादा पडणे अपरिहार्य आहे; त्यामुळ लीला बेणारेबद्दल सहानुभूती वाटूनही असे धगधगते जीवन जगणारी अविवाहित स्त्री, भावी पिढीचा 'मार्गदर्शक' या नात्याने पत्करताना रूढिप्रिय समाजाने खळखळ केली तर, त्यात लीला बेणारेवर भयंकर अन्याय झाला असे म्हणवत नाही. लीला बेणारेची व्यथा कोणती – हा नाटकाच्या बांधेसूदपणाच्या दृष्टीने गौण मुद्दा आहे; तरीही तिचे आत्मसमर्थन थोडे लटकेच पडते.

या नाटकातील पात्रे जवळजवळ सर्व प्रयोगभर सतत प्रेक्षकांसमोर वावरतात; एंट्री–एक्झिट्सचा फाफटपसारा त्यात नाही. अशा नाटकाच्या प्रयोगात 'टीमवर्क'ला जास्तच महत्त्व येते. 'रंगायन'चे सर्व कलावंत आपापल्या भूमिका योग्य वजन देऊन करतात. (मधूनच सतीश दुभाषी वकिलाच्या भूमिकेच्या आहारी जात आहेत असे वाटते.) सौ. सुलभा देशपांडे यांनी लीला बेणारे हिचे व्यक्तिमत्त्व स्वतंत्रपणे आणि तन्मयतेने साकार केले. श्री. अरविंद देशपांडे यांचे मार्गदर्शन डोळस आहे. पहिल्या व दुसऱ्या अंकाच्या शेवटी लीला बेणारेला कोंडीत पकडल्याचा क्षण त्यांनी नेमका टिपला आहे. तिचे शेवटच्या अंकातील 'स्वगत' संपल्यावर, न्यायाधीशाच्या मागच्या खिडकीतून प्रकाशझोत टाकला आहे तो मात्र खटकतो. नाटकाचा शेवटही, अपेक्षित परिणामावर पूर्णविराम देऊन जात नाही असे वाटत राहते.

एकंदरीत लेखन आणि प्रयोग या दोन्ही बाबतींत तेंडुलकरांचे 'शांतता !' हे नवे नाटक वैशिष्टयपूर्ण आहे यात शंका नाही. मराठी रंगभूमीच्या प्रगतीच्या दृष्टीने हा एक उल्लेखनीय प्रयत्न आहे. सरकारी नाटयस्पर्धेत अशा डोळस प्रयत्नांची योग्य ती बूज राखली जाऊ नये हे त्या यंत्रणेस खासच भूषणावह नाही. O

 पान ५७ वरून

अल्पकालीन वास्तव्यात त्यांचा चांगला स्नेह जमला होता. समजूतदार टेरेन्सने जेम्सच्या कामगिरीबद्दल कधीही, कसलीही चौकशी केली नव्हती. आणि शिवाय जेम्सला कंटाळा येऊ नये यासाठी हरप्रयत्न केला होता.

त्यानंतर जेम्स विमानदलाच्या कार्यालयात गेला. त्याच्या कागदपत्रांची बारकाईने तपासणी झाली आणि विमानतळावर नेण्यासाठी येणाऱ्या मोटारीची वाट पाहात तो तेथेच बसला. त्याला तेथेच, कार्यालयातच बसलेला पाहून तपासणीकारकुनाने तिरसट स्वरात फर्मावले, " इथं काय बसलात तुम्ही ? इतर सगळे उतारू बसलेत तिथं बाहेर बसलात तर बरं होईल. "

शरीरातील एखादी गुप्त कळ दाबल्यासारखा जेम्स ताडकन उभा राहिला. आपोआप त्याचे हात मागे गुंफले गेले आणि मॉंटीच्या अधिकारवाणीने तो उत्तरला, " मी कुठं बसावं ते तुम्ही सांगायला नको मला. आणि इतक्या उद्धटपणे तर निश्चितच नको. लक्षात ठेवा, अधिकाऱ्यांशी बोलताना अदबीनंच बोललं पाहिजे तुम्हाला. "

तो कारकून भीतीने खुर्चीला खिळून राहिला. ते पाहून जेम्स पुन्हा कडाडला, " बसलात काय शुंभासारखे ? उभे राहा नीट. "

कारकून तत्परतेने उभा राहिला. भीतीने त्याची बोबडी वळली होती. जेम्स शांतपणे वळला आणि बाहेर पडला तेव्हा कुठे त्याच्या लक्षात आले की पुन्हा एकवार त्याच्या अंगात जनरल मॉंटगोमेरी संचारला होता !

एक गोष्ट निश्चित खरी होती. ही कामगिरी पार पाडल्यानंतर त्याच्या व्यक्तिमत्त्वात बदल घडला होता. अधिकाराचा, आत्मविश्वासाचा एक रुबाब त्याच्या शब्दांत आणि वागण्यात आला होता. जनरल मॉंटगोमेरीचा गणवेष टाकल्यानंतर त्या परिणामातून बाहेर पडण्याची जेम्सने शिकस्त केली; पण ते त्याला जमले नसावे. कारण तो टेरेन्सशी बोलत असताना मध्येच टेरेन्सचा चेहरा चमत्कारिक, गोंधळलेला होई. त्याचे कारण स्पष्ट होते. त्या काही क्षणांपुरता जेम्सच्या बोलण्यावागण्यातून मॉंटी डोकावत असे. कारस्थान पार पडल्यावर, अगदी सुरुवातीला, गुप्ततेच्या बंधनामुळे, मॉंटीचे अनुकरण करताना जेम्स बुजत असे; पण एकदा नॉर्मंडीमध्ये दोस्तांच्या प्रचंड फौजा उतरल्याची उत्साहवर्धक बातमी आल्यावर मात्र, जरूर नसतानाही, जेम्सकडून मॉंटीचे सहज आणि परिणामकारक अनुकरण होई.

इंग्लंडमधून जिब्राल्टरपर्यंत जनरल मॉंटगोमेरी म्हणून जेम्सने केलेला पहिला विमानप्रवास विलक्षण होता. आता लेफ्टनंट क्लिफ्टन-जेम्स म्हणून केलेला परतीचा कैरो-इंग्लंड प्रवाससुद्धा, अगदी वेगळ्या अर्थाने, विलक्षणच होता !

[ अपूर्ण ]

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

१८ ते २४ मे राशि-भविष्य

**मेष :** अनुकूल ग्रहस्थितीचा साक्षात्कार गेल्या आठवड्यापासूनच होऊ लागला असेल. हा आठवडा तर अनन्यसाधारण यश देणारा जाणवेल. या आठवड्यातील शुक्र-हर्षल त्रिकोणाची ही सारी कृपा.

शैक्षणिक यश लाभेल, सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल, औद्योगिक प्रगती तर इतकी वाढेल की, असा यशस्वी काल कित्येक महिन्यांत तुम्ही अनुभवलेला नसेल.

उद्योगधंद्यांतील नव्या तंत्रमंत्राचा अंगीकार कराल, कला-क्रीडा क्षेत्रातील आजवरचे सारे विक्रम मोडून काढाल. नोकरीतील बदली-बढतीचे योग दृष्टिक्षेपात येतील. साडेसातीची फारशी दखल घेण्याचे कारण नाही.

दि. १९ ते २२ मे या कालावर लक्ष केंद्रित करा.

**वृषभ :** गेल्या महिन्याभरातील तुमच्या बऱ्याचशा व्यथा-विवंचना या आठवड्यात मिटू शकतील. परिस्थिती हाताबाहेर जाऊ न देण्यात तुमच्या कर्तृत्वाचाच भाग अधिक. सारी स्थगित कामे गती घेऊ लागतील. उद्योगधंद्यातील प्रगतीच्या हुकलेल्या संधी पुन्हा लाभतील. चुकूनही कधी न बोलणारी माणसे या आठवड्यात आस्थेने विचारपूस करू लागतील. वारे अनुकूल वाहू लागलेले आहे. प्रयत्नांची शिकस्त केलीत तर यश घे घे म्हणून पाठीशी लागेल. २३ मेचा शुक्र-हर्षल त्रिकोण संपत्ती, प्रतिष्ठा, अधिकार हवं ते देऊन जाईल.

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल, वैज्ञानिक संशोधनात भाग घ्यावा लागेल.

दि. २१ ते २३ मे अपेक्षित लाभ देणारा काल.

**मिथुन :** सूर्य-मंगळ व्ययात आले आणि तुमचे गाडे घसरले. चालत्या गाड्याला खीळ घालणे हेच मुळी त्यांचे कार्य. पण तुमच्यातील निर्धार याच वेळी पेटून उठल, अपयशातूनही यश शोधण्याची तुमची प्रवृत्ती याच वेळी उपयोगास येईल.

वाढत्या खर्चाला आळा घालण्यात यशस्वी व्हाल. वचारिक संघर्षाच्या कालीच तुमच्यातील सदसद्विवेक बुद्धीला जाग येईल.

नोकरीधंद्यातील अडचणी दूर करणे आता फारसे अवघड नाही असे वाटू लागेल. यांत्रिक व्यवहारधंद्यात प्रगती होण्याची लक्षणे २३ मेच्या रवि-हर्षल त्रिकोणापासून दिसू लागतील.

**कर्क** : लाभस्थानी सूर्य-मंगळ-शुक्र अशी ग्रहस्थिती वर्षा दीड वर्षातून एखाद्याच वेळी निर्माण होत असते, आणि त्यामुळे ती अपेक्षासाफल्याची ठरते.

गेल्या ५–६ महिन्यांपासून ज्या ज्या गोष्टींसाठी आपण जिवाचे रान केलेत त्या त्या गोष्टी या काली झटपट यशस्वी ठरू लागतील. आणि त्यामुळेच ग्रह म्हणून काही अदृश्य शक्ती कार्य करीत असते त्याचा आपणास हातोहात प्रयत्न येईल. प्रामुख्याने १६ ते २३ मे या कालखंडावर लक्ष केंद्रित करा. तुमचा सारा अनिष्ट काल आता इतिहासजमा झाल्यासारखाच आहे. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल. नवे स्नेहसंबंध जुळून येतील.

दि. २१ ते २३ मे विशेष यश देणारा काळ.

**सिंह** : बरेचसे ग्रह भाग्यातून दशमात सरकत आहेत आणि तेच तुमचे यश वृद्धिगत करू शकतील. या महिन्यात पैसा बरा मिळेल. पण पैशापेक्षा प्रतिष्ठाच खूप उंचावेल. या काळी तुमचा सामाजिक दबदबा आणि व्यावसायिक आब खूपच वाढीस लागेल.

अधिकारप्राप्ती, राजकीय पुढारीपण, कलाक्षेत्रातील अत्युच्च स्थानाची प्राप्ती इत्यादी गोष्टी या काली घडाव्यात. तुमच्या राशीतील गुरूच्या भव्यतेचा साक्षात्कर आताच घडू शकेल.

मुळातच आपण ऐश्वर्यसंपन्न माणसे, त्यातून अनेक ग्रहांचे पाठबळ लाभलेले. आता तुम्हांला कोणत्याच गोष्टीची उणीव भासणार नाही.

दि. २०, २३, २४ मे या काली सर्व काही घडावे.

**कन्या** : मंगळाच्या पाठोपाठ सूर्य–शुक्रही आपल्या भाग्यस्थानी असताना माघार घण्याचा, घोळ घालीत बसण्याचा प्रसंग येईलच कसा? या आठवड्यात बढती-बदलीचे योग आकस्मिकपणे येतील. दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवावे लागेल. नवा व्यवसायधंदा उभारण्यात यश लाभेल.

साहित्यिक, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींना तर आता कुणालाही डरायचे कारण नाही.

नव्या योजना आकार घेऊ लागतील. यांत्रिक व्यवहारात अपेक्षेबाहेर मोठा लाभ उठवू शकाल, आणि राजकीय क्षेत्रातील व्यक्तींनाही आघाडीवर राहण्याचा मान मिळू शकेल.

दि. १८, २०, २३ मे अपेक्षित यशाचे दिवस.

**तूळ :** अष्टमस्थानी ग्रह आले की, कर्तृत्व निष्प्रभ ठरते, प्रज्ञा बोथट नबते. इच्छाशक्ती दुबळया बनू लागतात. एकटा गुरू तुम्हाला सावरून धरील ही आशा खोटी.

या वेळी धावपळ, धडपड खूपच करावी लागेल, थोरांचे सहकार्य मिळविण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल, उद्योगधंद्याचे तंत्र बदलावेच लागेल. पैशाबरोबरच प्रकृतीलाही या वेळी जपण्याला हवे. तुमच्या स्वैर मनोवृत्तीला आळा घातला नाहीत तर अनवस्था प्रसंग ओढवल्याशिवाय राहणार नाही.

दूरच्या प्रवासाचे टाळा, व्यवसायधंद्यांत साहस करण्याचे विचार डोक्यात मुळीच आणू नका. न पेलण्यासारख्या जबाबदाऱ्या उचलण्याचे धाडस मुळीच करू नका. दि. २० ते २३ काहीसा अनुकूल काल

**वृश्चिक :** सूर्य-मंगळांचे आव्हान स्वीकारणे ही काही साधी सोपी गोष्ट नाही. उलट मी म्हणेन अशा वेळी माघार घेणच शहाणपणाचे ठरेल.

या वेळी वादविवाद, संघर्ष, मतभेद यांना अगदी ऊत येईल. नको त्या माणसाशी संबंध येतील. होऊ नये, त्या गोष्टी व्हायला लागतील. पराभव, अपेक्षाभंग असले काही प्रकार घडून येण्याची भीती वाटू लागेल.

नोकरीधंद्यातील सहकाऱ्यांशी आणि मार्गदारीशी खटकू लागेल, सहज काही बोलावे आणि त्याचा पराचा कावळा व्हावा असे पदोपदी जाणवायला लागेल.

या काळी राजकीय क्षेत्रातून अंग काढून घ्यावे हे बरे दूरचा प्रवासही टाळणे परिणामी हिताचे ठरेल. दि. २३–२४ हे दिवस काहीसे स्वास्थ्याचे.

**धनू :** गेल्या १५ २० दिवसांपासूनच आपण प्रगतीकडे वाटचाल करीत आहात. या आठवड्यात आपला वेग आणखीन वाढेल. आता आपले इप्सीत सिद्धीस जाण्यास वेळ नाही. अनंत कामाचे डोंगर आपणास उपसावे लागणार आहेत. सामा-


गुटगुटीत मुले जिथे दिसतात

**तिथे समजावे बालकांच्या आरोग्यासाठी त्या घरी अर्कशालानिर्मित**

**शिशुजीवन**

**वापरात असते. सर्वत्र मिळते.**

बालकांचे विकारांवर गुणकारी तसेच चांगले शक्तिवर्धक

**आयुर्वेदीय अर्कशाला लि., सातारा**

विक्री केंद्र– कोल्हापूर, मुंबई, अकोला,

नांदेड, हुबळी, हैद्राबाद.

[ मावळा, सातारा. ]

जिक-राजकीय क्षेत्रात सतत आघाडीवर राहण्याचा मान या कालापासूनच लाभेल. विरोधकांना ठोकरून काढणे आता फारसे अवघड नाही याची खात्री वाटू लागल. शेती, रसायनिक द्रव्ये, सौदर्य-प्रसाधने अशा व्यवसायांत आजवर कधी मिळाले नाही, एवढे यश सहजासहजी मिळवू शकाल. आपल्या बऱ्याचशा आशा आकांक्षा या वेळी सफल झाल्याशिवाय राहणार नाहीत. दि. १९ ते २२ मे आशादायक काल.

**मकर** : आता आणि यापुढेही काही काल मकर राशीची माणसे सतत आघाडीवर राहावीत अशीच अंतरिक्षीय ग्रहांची इच्छा दिसते. आपल्या कार्यक्रमात नव्या योजनांची भर पडेल, आणि त्या अपेक्षेबाहेर यशस्वी करून दाखवल्या जातील.

आपल्या पंचमस्थानी अनेक ग्रह येत आहेत, आलेले आहेत. ते आपणास कोणत्याही गोष्टींची उणीव भासू देणार नाहीत. स्थावरचा प्रश्न सुटेल, उद्योगधंद्याचे क्षेत्र विस्तारेल, वाहनांची विवंचनाही मिटेल.

तात्पर्य या आठवड्यातील शुक्र-हर्षल त्रिकोणावर (२३ मे) आपण आपले सारे लक्ष केंद्रित करा. हवं ते त्या काळी मिळेल.

**कुंभ** : मंगळ—सूर्य दोन्हीही उग्र ग्रह चतुर्थात, ते स्वास्थ्य हिरावून घेतील, चालत्या गाड्याला खीळ घालण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करतील. प्रत्येक पाऊल विचारान, सावधपणे टाकलेत तर विरोधकांचे डाव उधळले जातील.

या कालात बरीचशी कामे गति शून्य बनतील, स्थावराच्या कटकटीमुळे मस्तकशूळ उठेल, नोकरीधंद्यांतही अपेक्षित यश दिसेनासे होईल. फक्त एकटा गुरूच काय तो तुमच्या बाजूस असल्यामुळे त्याच्या सहकार्यामुळे आपण या अडीअडचणीमधूनही पार पडाल. प्रामुख्याने कौटुंबिक अनारोग्य आणि सांपत्तिक ताण पदोपदी जाणवेल.

दि. २२,—२३ मेपासून वातावरण निवळू लागेल.

**मीन** : पराक्रमांतील समर्थ ग्रहांकडे पाहून तुमच्या बाबतीत असे आवर्जून म्हणावेसे वाटते की, साडेसातीसारख्या आत्यंतिक अनिष्ट कालालाही आपण नमवलेत आता साडेसातीचा शनी सहसा तुमच्या वाटेस जाण्याचे साहस करणार नाही.

या ८—१५ दिवसांत वरचेवर प्रवास करावा लागेल. अनंत रेंगाळलेली कामे हातावेगळी करावी लागतील. नव्या योजना यशस्वी करण्यासाठी अनेकांच्या गाठी भेटी घ्याव्या लागतील.

आगामी १५—२० दिवसांत तुम्ही जाल तेथे आणि कराल त्यात यशस्वी व्हाल. २१ ते २३ मे विशेष यशदायी काळ.

○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649




इतिहासाला एक धक्का
देण्याची, तरुणपणी
उच्चारलेली प्रतिज्ञा
लेनिनने साकार
करून दाखविली.

विसाव्या शतकाच्या
इतिहासाला लेनिनची
स्मृति विसरता येणार नाही.

आपल्या अनन्य साधारण
कर्तृत्वाने लेनिनने रशियाचा
चेहरा मोहरा पार बदलून टाकला.

अशा या लोकोत्तर पुरुषाच्या
जीवनकार्याचे दर्शन घडविणारी
प्रदीर्घ लेखमाला

# व्होल्गा जेव्हा लाल होते

लेखक— वि. स. वाळिंबे

या लेखमालेतील शेवटचा लेखांक
पुढील अंकात प्रसिद्ध होत आहे.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री ग. माजगावकर.